आपले राज्य, आपले दैनिक

गोवन वार्ता

पणजी - गोवा | मंगळवार, दि. २२ सप्टेंबर २०२६ | RNI: GOAMAR/2015/65705 | www.goanvarta.net | वर्ष १२ | अंक ९५ | पाने १० | किंमत ₹८

क्रीडा वार्ता पान १० वर

- सुवर्णपदकासाठी भारत-श्रीलंका आमनेसामने
- झहीर खान बनला चेन्नई सुपर किंग्सचा नवा मुख्य प्रशिक्षक

पाऊस

मागील २४ तासांत

०.०१ मिलीमीटर

०.०० इंच

१ जूनपासून आतापर्यंत

१९८१.७ मिलीमीटर

७८.०१ इंच

- राज्यात सोमवारी काही ठिकाणी तुरळक पावसाची शक्यता.

थोडक्यात

टेक्सासमध्ये हनुमान मूर्तीवरून वाद

गोवन वार्ता ■ वॉशिंग्टन : अमेरिकेतील टेक्सास राज्याच्या ह्युस्टनजवळील शुगर लँड येथील श्री अष्टलक्ष्मी मंदिराबाहेर उभारण्यात आलेल्या ९० फूट उंच हनुमान मूर्तीवरून सध्या मोठा वाद निर्माण झाला आहे. टेक्सासमधील ख्रिश्चन कंझरवेटीव्हकडून या विशाल मूर्तीला विरोध दर्शवला जात असून, यावरून टेक्सास राज्यात मोठा वाद सुरू आहे.

'एसआयआर' भस्मासुर बनला : खरगे

गोवन वार्ता ■ नवी दिल्ली : एसआयआर या मुद्द्यावरून काँग्रेसने पुन्हा एकदा केंद्रातील मोदी सरकारला लक्ष्य केले आहे. ही एक दोषपूर्ण प्रक्रिया असून ती आता भस्मासुर बनली आहे आणि ती आपल्याच लोकांना विळख्यात घेत आहे, असा आरोप काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केला. बिहारमधून सुरू झालेला एसआयआरचा मुद्दा आता दिल्लीत पोहोचला आहे. काँग्रेस पक्ष पहिल्या दिवसापासून या प्रक्रियेला दोषपूर्ण का म्हणत होता, हे कदाचित आता सत्ताधाऱ्यांना समजू लागले आहे, असे मल्लिकार्जुन खरगे यांनी सोमवारी 'एक्स' या समाजमाध्यमावर केलेल्या पोस्टद्वारे निवडणूक आयोगावरही टीका केली आहे.

संपादकीय

शेती संरक्षणासाठी दीर्घकालीन व्यवस्था

विरंगुळा -महेश दिवेकर



स्थानिक पक्ष राज्यात सत्तेवर असल्यास श्रेष्ठींना भेटायला दिल्लीला कसे जाणार?

सरकारकडून अधिसूचना जारी : हरकतींसाठी १५ दिवसांची मुदत

पंचायतींच्या 'ट्रेड लायसन्सला' आता शुल्काची मर्यादा

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
पणजी

दुकान, हॉटेल आणि इतर उद्योगांसाठी परवाना शुल्क आकारण्याचे स्वातंत्र्य पंचायतींना असले तरी, यापुढे या शुल्कावर कमाल मर्यादा निश्चित करण्याचा प्रस्ताव आहे. सरकारने निश्चित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक शुल्क आता कोणत्याही पंचायतीला आकारता येणार नाही.

राज्यात 'अ' आणि 'ब' दर्जाच्या पंचायती असून त्यांच्यासाठी वेगवेगळी कमाल शुल्क मर्यादा निश्चित केली जाणार आहे. यानुसार 'अ' दर्जाच्या विकसित पंचायतींना 'ब' दर्जाच्या पंचायतींपेक्षा अधिक शुल्क आकारण्याची मुभा असेल. यासंदर्भात पंचायत राज कायद्याच्या नियमांमध्ये बदल करणारी प्रस्तावित अधिसूचना जारी करण्यात आली आहे. संबंधितांना हरकती आणि सूचना सादर करण्यासाठी १५ दिवसांची मुदत देण्यात आली असून, मुदत संपल्यानंतर आलेल्या सूचनांचा विचार करून कमाल परवाना शुल्क निश्चित केले जाईल.

व्यावसायिक शुल्काबाबतचा प्रस्तावित मसुदा तयार करण्यात आला आहे. नवीन नियमांनुसार, परवाना शुल्क न भरता उद्योग किंवा व्यवसाय सुरू केल्यास ५ हजार रुपयांपर्यंत दंडाची तरतूद करण्यात आली आहे. तसेच, परवाना शुल्काबाबत पंचायत मंडळाला रीतसर ठराव संमत करणे बंधनकारक असणार आहे.



न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर निर्णय

यापूर्वी शुल्कावर कोणतीही मर्यादा नसल्याने दुकान, हॉटेल, सुपर मार्केट, पेट्रोल पंप आदींसाठी पंचायती आपल्या सोयीनुसार शुल्क आकारत होत्या. कळंगुट पंचायतीने एका व्यापारी आस्थापनाला मोठ्या प्रमाणात शुल्क आकारले होते. ते भरणे शक्य न झाल्याने संबंधित व्यापाऱ्याने न्यायालयात याचिका दाखल केली. त्यावेळी न्यायालयाने पंचायत संचालनालयाकडे शुल्क निश्चितीच्या निकषांबाबत विचारणा केली होती. त्यानंतर न्यायालयाच्या निर्देशानुसार संचालनालयाने कमाल परवाना शुल्क निश्चित करण्याचा निर्णय घेतला.

'अ','ब' दर्जाच्या पंचायतींसाठी प्रस्तावित कमाल शुल्क

व्यवसाय / आस्थापने	'अ' पंचायत	'ब' पंचायत
दुकान/व्यावसायिक आस्थापने :		
१५ चौ.मी.पर्यंत	रु. ५० प्रति चौ.मी.	रु. ३० प्रति चौ.मी.
१५ ते ५० चौ.मी.	रु. ८० प्रति चौ.मी.	रु. ५० प्रति चौ.मी.
५० ते १०० चौ.मी.	रु. १२० प्रति चौ.मी.	रु. ८० प्रति चौ.मी.
१०० चौ.मी.पेक्षा अधिक	रु. १५० प्रति चौ.मी.	रु. १०० प्रति चौ.मी.
मेगा रिटेल स्टोअर/शोरूम	रु. २०० प्रति चौ.मी.	रु. १२० प्रति चौ.मी.
कॉर्पोरेट/बँक कार्यालय	रु. २०० प्रति चौ.मी.	रु. १२० प्रति चौ.मी.
खासगी क्लिनिक/कन्सल्टन्सी	रु. १०० प्रति चौ.मी.	रु. ६० प्रति चौ.मी.
नक्षत्री हॉटेल	रु. २,००० प्रति रूम	रु. १,५०० प्रति रूम
गेस्ट हाऊस/बुटीक हॉटेल	रु. ८०० प्रति रूम	रु. ५०० प्रति रूम
लॉज/होम स्टे	रु. ४०० प्रति रूम	रु. २५० प्रति रूम
एसी रेस्टॉरंट	रु. २०० प्रति चौ.मी.	रु. १५० प्रति चौ.मी.
जनरल रेस्टॉरंट	रु. १०० प्रति चौ.मी.	रु. ७० प्रति चौ.मी.
बेकरी/चहाचा गाडा	रु. ५० प्रति चौ.मी.	रु. ३० प्रति चौ.मी.
कॅसिनो/ऑफशोर कॅसिनो	रु. ५,००० प्रति चौ.मी.	रु. ३,५०० प्रति चौ.मी.
क्लब/डिस्कोथेक	रु. १,५०० प्रति चौ.मी.	रु. १,००० प्रति चौ.मी.
मल्टिप्लेक्स/थिएटर	रु. १५० प्रति चौ.मी.	रु. १०० प्रति चौ.मी.
मोबाईल गाडा	रु. १,२०० प्रति चौ.मी.	रु. ६०० प्रति चौ.मी.
बीच शॅक	रु. १५,००० प्रति हंगाम	रु. १०,००० प्रति हंगाम
वॉटर स्पोर्ट्स	रु. १०,००० वार्षिक	रु. ७,००० वार्षिक
कारखाना/उद्योग	रु. १०० प्रति चौ.मी.	रु. ७० प्रति चौ.मी.
ऑटो गॅरेज/वर्कशॉप	रु. ८० प्रति चौ.मी.	रु. ५० प्रति चौ.मी.
स्टोन क्रशर	रु. २५,००० वार्षिक	रु. १५,००० वार्षिक
गॅस गोदाम/रसायने	रु. ३०० प्रति चौ.मी.	रु. २०० प्रति चौ.मी.
स्क्रॅप यार्ड/जंक यार्ड	रु. १५० प्रति चौ.मी.	रु. १०० प्रति चौ.मी.
फिश/मीट प्रक्रिया	रु. १२० प्रति चौ.मी.	रु. ८० प्रति चौ.मी.
टेलिकॉम टॉवर्स	रु. ५०,००० वार्षिक	रु. ३०,००० वार्षिक
पेट्रोल पंप	रु. ३०,००० वार्षिक	रु. २०,००० वार्षिक
इतर व्यावसायिक आस्थापने	रु. ६० प्रति चौ.मी.	रु. ४० प्रति चौ.मी.

पर्वरी उड्डाणपुलाचे 'एंट्री-एक्झिट पॉईंट' आठवड्याभरात होणार खुले

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीत निर्णय : नागरिकांना दिलासा

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
पणजी



■ नारायण पिसुर्लेकर

पर्वरीवासीय आणि इतर वाहनचालकांसाठी पर्वरीहून अटल सेतू तसेच उड्डाणपुलावर जाण्यासाठीचे 'एंट्री' आणि 'एक्झिट पॉईंट' आठवड्याभरात खुले करण्यात येणार आहेत. रम्बलर, सीसीटीव्ही कॅमेरे आणि गतिदर्शक सूचना फलक बसविल्यानंतर उड्डाणपुलाचा वापर अधिक सुरक्षित व सुलभ होईल. आठ दिवसांत उड्डाणपुलाबाबतच्या सर्व समस्या दूर करून वाहतूक सुरळीत केली जाईल, असे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी सांगितले.

उड्डाणपुलाचे उद्घाटन झाले असले, तरी पर्वरीतील 'एंट्री' आणि 'एक्झिट पॉईंट' बंद असल्यामुळे स्थानिकांची मोठी गैरसोय होत आहे. अटल सेतूवरून येणाऱ्या वाहनांना पर्वरीत जाण्यासाठी थेट गिरीपर्यंत जाऊन पुन्हा मागे वळावे लागते. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या नेतृत्वाखाली एक विशेष बैठक पार पडली. या बैठकीला सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री दिगंबर कामत, पर्यटनमंत्री व पर्वरीचे आमदार रोहन खंवटे यांच्यासह सार्वजनिक बांधकाम, वाहतूक आणि पोलीस खात्याचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत विविध उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली.

एका आठवड्यात हे मार्ग खुले केले जातील. अटल सेतूवरून म्हापशाकडे जाणाऱ्या वाहनांना पर्वरीत उतरण्यासाठी एक स्वतंत्र 'एक्झिट पॉईंट' उपलब्ध करून दिला जाईल. तसेच उड्डाणपुलावरून जाणाऱ्या आणि येणाऱ्या वाहनांसाठी अटल सेतू आणि पर्वरीत जाण्यासाठी योग्य 'एक्झिट' व्यवस्था केली जाईल. यासाठी आवश्यक ठिकाणी रम्बलर, कॅमेरे आणि वाहनांची गती दर्शविणारे सूचना फलक बसविण्यात येतील आणि पर्वरीवासीयांची समस्या आठ दिवसांत दूर होईल, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री दिगंबर कामत यांनी दिली.

जबाबदारी निश्चित करण्याची मागणी

उड्डाणपुलाच्या नियोजनातील त्रुटींबद्दल जबाबदारी निश्चित करण्यात यावी, अशी मागणी पर्यटनमंत्री व पर्वरीचे आमदार रोहन खंवटे यांनी केली. ज्या अधिकाऱ्यांनी उड्डाणपुलाचा डीपीआर तयार केला होता, ते अधिकारी सध्या सार्वजनिक बांधकाम खात्यात कार्यरत नाहीत. असे असले तरी, या कामातील त्रुटींसाठी नेमके कोण जबाबदार आहे, हे शोधून काढणे आवश्यक आहे, असे पर्यटनमंत्री व पर्वरीचे आमदार रोहन खंवटे यांनी सांगितले.

दुचाकींबाबतचा निर्णय प्रलंबित : उड्डाणपुलावरील वाहतुकीचे नियोजन आयआयएम नागपूर आणि आयआयटी खरगपूर या संस्थांमधील तज्ज्ञांशी सल्लामसलत करून करण्यात आले आहे. मात्र, या मार्गावर दुचाकींना प्रवेश देण्याबाबत अद्याप कोणताही अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही.



कार्यक्रमाचे दीप प्रज्ज्वलन करून उद्घाटन करताना राज्यपाल पुसापती अशोक गजपती राजू, राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल व इतर.

न्यायदानातील अनावश्यक उशीर कमी करणे गरजेचे

राज्यपाल पुसापती अशोक गजपती राजू

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
पणजी

न्यायदानाच्या प्रक्रियेस विलंब झाल्यास नागरिकांवर त्याचा आर्थिक, सामाजिक आणि मानसिक परिणाम होऊ शकतो. यामुळे वेळेत न्याय मिळणे आवश्यक आहे. यासाठी या प्रक्रियेत अनावश्यक उशीर करणे कमी झाले पाहिजे. तसेच तंत्रज्ञानाचा वापर करून ही प्रक्रिया सुलभ झाली पाहिजे असे मत राज्यपाल पुसापती अशोक गजपती राजू यांनी व्यक्त केले.

केंद्रीय न्याय आणि कायदा खात्यातर्फे आयोजित दिशा २.० योजनेअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या क्षेत्रीय कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी केंद्रीय कायदा राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल व अन्य अधिकारी उपस्थित होते.

हातकातरो खांबासह १५ पुरातत्त्वीय स्थळे संरक्षित स्मारके म्हणून घोषित होणार

अधिसूचना जारी : दोन महिन्यांत मागवल्या सूचना, आक्षेप

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
पणजी

गोवा सरकारने जुने गोवे येथील 'हातकातरो खांब' यासह राज्यातील १५ पुरातत्त्वीय स्थळांना संरक्षित स्मारके म्हणून घोषित करण्यासाठी अधिसूचना जारी केली आहे. या सर्व स्थळांना अंतिम मान्यता देण्यापूर्वी नागरिकांकडून सूचना आणि आक्षेप मागवण्यात आले आहेत.

पुरातत्त्व खात्याने गोव्यातील सात तालुक्यांमधील १५ पुरातत्त्वीय स्थळांना संरक्षित स्मारकाचा दर्जा देण्यासाठी हा मसुदा प्रसिद्ध केला आहे. या मसुद्यावर आक्षेप किंवा सूचना नोंदवण्यासाठी इच्छुक व्यक्तींना दोन महिन्यांची मुदत देण्यात आली असून, त्यानंतर ही सर्व स्थळे संरक्षित स्मारके म्हणून अधिकृतपणे घोषित केली जातील.

या मसुद्यात तिसवाडी तालुक्यातील जुने गोवे येथील हातकातरो खांब, मळार व शिरदोण येथील होवरी, चिंबल येथील माउंट कार्मेल सायबिणीच्या कॉन्व्हेंटचे अवशेष आणि गोवा वेल्हा येथील गोपाकापट्टण बंदराचे अवशेष यांचा समावेश आहे. तसेच, सांगे तालुक्यातील नेतुर्ली गावातील जाकीची होवरी या स्थळाचाही यात अंतर्भाव करण्यात आला आहे.

डिचोली तालुक्यातील कुडणे येथील सूर्य मंदिराचे अवशेष व थडगी, दाबोळी-मुरगाव येथील दगडात कोरलेली टाकी आणि मडगाव-सासष्टी येथील श्री दामोदर मंदिराची टाकी यांचा या मसुद्यात समावेश आहे. या एकूण १५ स्थळांपैकी ११ स्थळे खासगी जागेत असून उर्वरित ४ स्थळे सरकारी जागेत आहेत.



केपे, फोंडा तालुक्यातील स्मारके

केपे तालुक्यातील पिर्ला गावातील बावळ्याचे मळ, बाळ्ळीतील बाळ्ळी मठ आणि कोड्डे गावातील सासोरे खड्डे देवळाचे अवशेष संरक्षित केले जाणार आहेत. फोंडा तालुक्यातील खांडोळा येथील तामसुली होवरी आणि कवळे येथील मर्दनगड किल्ला या स्थळांचाही संरक्षित स्मारकांच्या यादीत समावेश करण्यात आला आहे.

काँग्रेसच्या 'गोवा राखण यात्रे'ला आजपासून सुरुवात

समारोपाला राहुल गांधी राहणार उपस्थित

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
पणजी

विधानसभा निवडणुकीच्या तयारीसाठी आणि भाजप सरकारच्या कारभाराविरोधात जनजागृती करण्यासाठी काँग्रेसतर्फे मंगळवारपासून 'गोवा राखण यात्रा' सुरू केली जात आहे. पणजीतील आंबेडकर पार्क येथून या यात्रेचा शुभारंभ होणार असून, यात्रेच्या माध्यमातून काँग्रेसचे अनेक राष्ट्रीय नेते गोव्याला भेट देतील.

प्रदेश काँग्रेस अध्यक्ष गिरीश चोडणकर यांनी पत्रकार परिषदेत या यात्रेची सविस्तर माहिती दिली. यात्रेत राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि प्रियांका गांधी सहभागी होणार असून, सोनिया गांधी यांच्यासह इतर नेत्यांनाही निमंत्रण देण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेला विधिमंडळ पक्षनेते युरी आलेमाव आणि गोव्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे हेदेखील उपस्थित होते.

यात्रा राज्यातील सर्व ४० मतदारसंघांतून प्रवास करणार आहे. मंगळवारी पणजी आणि ताळगाव मतदारसंघातून यात्रेला सुरुवात होईल. दररोज दुपारी २.३० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत ही यात्रा विविध मतदारसंघांतून जाईल आणि सायंकाळी ६ वाजता संबंधित मतदारसंघात नागरिकांशी संवादाचा कार्यक्रम आयोजित केला जाईल. त्यानंतर २३ सप्टेंबर रोजी प्रियोळ मतदारसंघात सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल या यात्रेला झेंडा दाखवणार आहेत.

कुंकळ्ळीत यात्रेचा होणार समारोप

या यात्रेचा समारोप १८ ऑक्टोबर रोजी कुंकळ्ळी मतदारसंघात होणार आहे. या समारोपाच्या कार्यक्रमाला काँग्रेस नेते राहुल गांधी यांची विशेष उपस्थिती असणार आहे.

पणजी बाजारात कांदा ७५ रुपये किलो

आवक घटल्याने महागाईचा फटका

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
पणजी

सोमवारी पणजी बाजारात भाजीपाल्याचे दर चढेच असल्याचे पाहायला मिळाले. बेळगावमधून होणारी आवक कमी झाल्यामुळे कांद्याच्या दरात एका आठवड्यात प्रतिकिलो १५ रुपयांची वाढ झाली असून, तो ७५ रुपये किलोवर पोहोचला आहे. मागणीच्या तुलनेत पुरवठा नसल्याने पुढील काही दिवस कांद्याचे दर आणखी वाढण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी वर्तवली आहे.

बाजारात आल्याचे दर वधारले असून ते ३०० रुपये किलो झाले आहेत, तर लसूण ४०० ते ५०० रुपये किलो दराने विकला जात आहे. नारळाचे दरही वाढलेलेच असून, लहान नारळ ४० रुपये, मध्यम आकाराचा ५० रुपये आणि मोठा नारळ ६० रुपये प्रति नग या दराने उपलब्ध आहे.

बाजारात वालपापडीचे दर दर्जानुसार ८० ते १२० रुपये किलो आहेत. फ्लॉवर ५० रुपये, कोबी ४० रुपये, तर मिरची आणि ढब्बू मिरची दर्जानुसार १०० ते १२० रुपये किलोने विकली जात आहे. बटाटा आणि टोमॅटो प्रत्येकी ४० रुपये, गवारी ८० रुपये, लहान वांगी ६० रुपये, तर मोठी वांगी ८० रुपये किलो आहेत. गाजर, कारले आणि बीट प्रत्येकी ८० रुपये किलो दराने विकले जात आहेत. दुधी भोपळा ५० रुपये प्रति नग आहे. मटार १५० ते १८० रुपये, दोडका १०० रुपये आणि भेंडी ८० रुपये किलो आहे. पालेभाज्यांमध्ये शेपू ३० रुपये जुडी, तर कोथिंबीर २० रुपये जुडी दराने उपलब्ध आहेत.

तीन अल्पवयीन ताब्यात : सोशल मीडियावरील ३२ खात्यांवरही कारवाई

बिहारच्या जमुईमध्ये अल्पवयीनांसोबत गैरवर्तन

गोवन वार्ता ■ न्यूज डेस्क
पाटणा

बिहारमधील जमुई येथे १९ सप्टेंबर रोजी दोन अल्पवयीन मुलांसोबत (मुलगा आणि मुलगी) घडलेल्या गैरवर्तन प्रकरणाच्या तपासाला गती मिळाली आहे. याप्रकरणी आतापर्यंत तीन अल्पवयीन संशयितांना ताब्यात घेण्यात आले, असे बिहारचे कायदा आणि सुव्यवस्था विभागाचे एडीजी के. एस. अनुपम यांनी पाटणा येथे सांगितले.

या प्रकरणाची नोंद जमुई पोलीस ठाण्यात करण्यात आली असून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) कलम १२८, ७४, ७५ आणि पोक्सो कायद्याच्या कलम ८ आणि १२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या तपासासाठी विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना करण्यात आली असून, त्यावर जमुईच्या एसडीपीओंचे नियंत्रण आहे. आतापर्यंत ७ ते ८ तरुणांची नावे तपासात समोर आली असून, या घटनेत जो कोणी सहभागी असेल त्याच्यावर कारवाई केली जाईल, तसेच आरोपींच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीचीही चौकशी केली जात आहे, असे एडीजी के. एस. अनुपम यांनी सांगितले. घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात शेअर केला जात आहे. पीडित मुलगा आणि मुलगी दोघेही अल्पवयीन असल्याने त्यांचा चेहरा दाखवणे हा गुन्हा आहे. त्यामुळे व्हिडिओ प्रसारित करणाऱ्या अनेक खात्यांची ओळख पटवून आतापर्यंत फेसबुकची १३, इन्स्टाग्रामची १२ आणि एक्सची ७ खाती हटवण्याची कारवाई करण्यात आली आहे.



घटनेचे ठिकाण अन् राजकीय पडसाद

ही घटना जमुई-लखीसराय मुख्य मार्गापासून सुमारे तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या डोंगराळ भागात सायंकाळी घडली असून, पोलीस घटनास्थळावरील गस्तीच्या व्यवस्थेचीही तपासणी करणार आहेत. दरम्यान, या घटनेनंतर विरोधी पक्षनेत्यांनी सरकारवर जोरदार टीका केली असून, बिहारच्या कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्याकडून कोणतीही प्रतिक्रिया यावर आलेली नव्हती. या घटनेबद्दल राजकीय पक्षांसह विविध स्तरांतील लोकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

शेती बंधाऱ्यांच्या दुरुस्तीचा संपूर्ण भार सरकार उचलणार

महसूल खात्याकडून अधिसूचना जारी

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
पणजी

गोव्यातील शेतीशी संबंधित संरक्षक बंधाऱ्यांच्या दुरुस्ती व मजबुतीकरणाचा १०० टक्के खर्च उचलण्याचा महत्त्वाचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यासंदर्भात महसूल खात्याने अधिकृत अधिसूचना जारी केली असून, यामुळे संरक्षक बंधाऱ्यांच्या कामांना गती मिळण्यासह शेतकऱ्यांवरील आर्थिक भार हलका होणार आहे.

हा निर्णय 'गोवा कृषी टेनन्ट कायदा, १९६४' मधील कलम २६ च्या उपकलम (३) मधील तरतुदीनुसार घेण्यात आला आहे. यानुसार संरक्षक बंधाऱ्यांच्या दुरुस्ती अथवा मजबुतीकरणासाठी येणाऱ्या प्रस्तावित खर्चाची संपूर्ण रक्कम सरकारकडून थेट योगदान म्हणून दिली जाणार आहे.

या निर्णयांतर्गत प्रत्येक कामाच्या प्रस्तावासाठी वित्त खात्याची पूर्वमान्यता घेणे बंधनकारक राहणार आहे. सरकारच्या या पावलामुळे संरक्षक बंधाऱ्यांच्या नियमित देखभाल व दुरुस्तीचा आर्थिक भार कमी होण्यास मदत होणार असून, बंधाऱ्यांच्या संरक्षणासाठी आवश्यक असलेल्या कामांना गती मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



थोडक्यात

चोर्ला-कणकुंबी मार्गावर वनमानवाचा रस्ता अपघातात मृत्यू

गोवन वार्ता ■ वाळपई : चोर्ला-कणकुंबी मार्गावरील डेल्टा रिसॉर्टजवळ सोमवारी एका वनमानवाचा (स्लेंडर लॉरीस) रस्ता ओलांडताना वाहनाच्या धडकेत मृत्यू झाल्याचे आढळून आले. हा मृत वनमानव विवेकानंद पर्यावरण जागृती फौजचे सदस्य रमेश झर्मेकर यांनी पाहिला. वनमानव हा निशाचर आणि वृक्षवासी प्राणी आहे. तो रात्री एकट्याने हालचाल करतो. जंगलातून जाणाऱ्या रस्त्यांमुळे झाडांच्या छतामध्ये खंड पडल्यास त्याला झाडावरून खाली उतरून रस्ता ओलांडावा लागू शकतो. त्यामुळे रात्रीच्या वेळी वाहनांच्या धडकेचा धोका वाढतो. वाहनचालकांनी वेग कमी ठेवून रस्त्यावर अचानक दिसणाऱ्या वन्यजीवांकडे विशेष लक्ष द्यावे, असे आवाहन विवेकानंद पर्यावरण जागृतीने केले आहे.

सहवेदना

चंद्रशेखर रेडकर

गोवन वार्ता ■ वास्को : सडा येथील जीआरबी कॉलनीतील चंद्रशेखर गंगाराम रेडकर उर्फ मामा (४६) यांचे अल्पशा आजाराने सोमवारी (दि. २१) पहाटे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दुपारी १ वाजता बोगदा येथील हिंदू स्मशानभूमीत अंतिमसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे पत्नी व दोन मुली असा परिवार आहे.



शकुंतला पाटील

गोवन वार्ता ■ पणजी : ज्येष्ठ पत्रकार तसेच 'भांगरभूंय'चे वरिष्ठ उपसंपादक प्रदीप पाटील यांच्या मातोश्री शकुंतला पुंडलिक पाटील (८०) यांचे सोमवारी अल्पशा आजाराने निधन झाले. मंगळवारी दुपारी कुडचडे येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पुत्र प्रदीप, डॉ. सुधीर, डॉ. समीर, सुना व नातवंडे असा परिवार आहे.



श्रीपाद होबळे

गोवन वार्ता ■ म्हापसा : दत्तवाडी, म्हापसा येथील ज्येष्ठ नागरिक श्रीपाद यदुवीर होबळे (९२) यांचे अल्पआजाराने सोमवारी दुपारी निधन झाले. त्याच दिवशी सायंकाळी वैकुंठधाम स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.



गोपाळ नाईकविरुद्ध गुन्हा नोंद : कर्नाटकातील व्यापाऱ्याची फसवणूक

कॅसिनोत 'गेमिंग टेबल'देण्याच्या आमिषाने १ कोटींचा गंडा

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
पणजी

कॅसिनोत 'अंदर बाहर गेमिंग टेबल' सुरू करून देण्याचे आमिष दाखवून कर्नाटकातील व्यावसायिकाची तब्बल १ कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी पणजी पोलिसांनी गोपाळ नाईक (कुंडई-फोंडा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पर्वरी गोळीबार प्रकरणात फरार असलेल्या गोपाळ नाईकने गोवा कोस्टल रिसॉर्ट्स अँड रिक्रिएशन प्रा. लि.चे व्यवस्थापकीय संचालक अशोक वाडिया यांच्याशी आपले निकटचे संबंध असल्याचे भासवून संबंधित व्यावसायिकाचा विश्वास संपादन केल्याचा आरोप आहे. दरम्यान नाईक याला नोटीस जारी करून २३ रोजी सायंकाळी पोलीस स्थानकात हजर राहण्यास सांगितले आहे.

पणजी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणी कर्नाटकातील ललित भुरथ या व्यावसायिकाने तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार तक्रारदार भुरथ यांना गोव्यातील कॅसिनो व्यवसायात स्वारस्य होते. याची माहिती मिळाल्यानंतर गोपाळ नाईक याने त्यांच्याशी संपर्क साधून स्वत:ला गोवा कोस्टल रिसॉर्ट्स अँड रिक्रिएशन प्रा. लि. व्यवस्थापकीय संचालक अशोक वाडिया यांच्याशी निकटचे संबंध असल्याचे भासवले व कॅसिनोमध्ये 'अंदर बाहर गेमिंग टेबल' सुरू करून देण्याची तसेच त्यातून मोठा आर्थिक परतावा मिळवून देण्याची हमी त्याने दिली. या आमिषाला भुलवून नाईक याने १ डिसेंबर २०२५ रोजी भुरथ यांच्याकडून एकूण १ कोटी रुपये उकळले. मात्र, रक्कम दिल्यानंतरही ठरल्याप्रमाणे कॅसिनोमध्ये गेमिंग टेबल सुरू झाले नाही.

मात्र, मोठी रक्कम देऊनही ठरल्याप्रमाणे कॅसिनोमध्ये गेमिंग टेबल सुरू झाले नाही. काही दिवस वाट पाहिल्यानंतर जेव्हा तक्रारदाराने आपल्या पैशांची मागणी केली, तेव्हा संशयिताने टाळाटाळ करण्यास सुरुवात केली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तक्रारदाराने पणजी पोलिसात तक्रार दाखल केली.

उद्या पोलीस स्थानकात हजर राहण्याची नोटीस



या प्रकरणी निरीक्षक विजयकुमार चोडणकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक नितीन नाईक यांनी गोपाळ नाईक याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. त्यानंतर तपास उपनिरीक्षक रोहन मडगावकर यांच्याकडे वर्ग करण्यात आला. पोलिसांनी गोपाळ नाईक याला नोटीस बजावून २३ सप्टेंबर रोजी सायंकाळी पोलीस स्थानकात हजर राहण्याचे निर्देश दिले आहेत.

तारक आरोलकर यांच्या छातीत दुखू लागल्याने इस्पितळात दाखल

आसगाव जमीन फसवणूक प्रकरणात होते न्यायालयीन कोठडीत

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
म्हापसा



आसगाव येथील जमीन फसवणूक प्रकरणातील संशयित आरोपी आणि म्हापशाचे माजी नगरसेवक तारक आरोलकर यांना छातीत दुखू लागल्याने सोमवारी म्हापसा येथील उत्तर गोवा जिल्हा इस्पितळात उपचारासाठी दाखल करण्यात आले. सध्या त्यांच्यावर पुरुष वार्डमध्ये उपचार सुरू आहेत. गुन्हा शाखेने अटक केल्यानंतर सध्या आरोलकर हे कोलवाळ कारागृहातील न्यायालयीन कोठडीत होते.

आरोलकर यांनी छातीत दुखत असल्याची तक्रार केल्यानंतर कारागृह प्रशासनाने त्यांना जिल्हा इस्पितळात आणले. आपत्कालीन विभागात तपासणी केल्यानंतर डॉक्टरांनी पुढील उपचारांसाठी त्यांना इस्पितळात दाखल केले.

तक्रारीनुसार, आसगाव येथील सर्व्हे क्र. ३७/४ मधील जमिनीचा मालक व अधिकृत व्यक्ती असल्याचे भासवून आरोलकर यांनी फिर्यादीचा विश्वास संपादन केला. बनावट विक्रीकरार दाखवून जमीन खरेदीसाठी ४० लाख रुपये आगाऊ घेतले; मात्र पुढील विक्री व्यवहार पूर्ण केला नाही किंवा रक्कम परत केली नाही, असा आरोप आहे. संबंधित जमीन जोजफ मारियान डिसोझा उर्फ जुझे एम. डिसोझा यांच्या मालकीची असल्याचे समोर आल्यानंतर तक्रार दाखल करण्यात आली.

दरम्यान, फिर्यादी पंकज बजाज (दिल्ली) यांच्या तक्रारीवरून गुन्हा शाखेने १७ ऑगस्ट रोजी आरोलकर यांच्याविरुद्ध भादंसंच्या कलम ४२०, ४०६, ४६७, ४६८ व ४७१ अंतर्गत गुन्हा नोंदविला होता. त्यानंतर १९ ऑगस्ट रोजी त्यांना अटक करण्यात आली.

इतर प्रकरणांतही गुन्हे दाखल

- ओबीसी दाखल्यासाठी वडिलांचा कथित बनावट जन्मदाखला सादर केल्याप्रकरणी आरोलकर यांच्याविरुद्ध आणखी एक गुन्हा दाखल आहे.
- तोरसे-पेडणे येथील जमीन विकण्याचे भासवून मुरगावातील महिलेकडून ४१.८५ लाख रुपये घेतल्याच्या आरोपावरून म्हापसा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.
- धारगळ येथील जमीन विक्रीच्या नावाखाली बंगळुरूतील रिअल इस्टेट कंपनीची ८ कोटी रुपयांची फसवणूक केल्याच्या आरोपावरून कर्नाटकातील सदाशिव पोलिसांनी त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

३.९६ कोटींच्या 'मनी लॉंड्रिंग'प्रकरणी पाच जणांविरुद्ध पुरवणी आरोपपत्र

अमली पदार्थ तस्करीशी संबंधित प्रकरण; ईडीकडून कारवाई

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
पणजी

आंतरराज्य आणि आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ तस्करीशी संबंधित ३.९६ कोटी रुपयांच्या कथित मनी लॉंड्रिंगप्रकरणी अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) पाच अतिरिक्त आरोपींविरुद्ध पुरवणी आरोपपत्र दाखल केले आहे. ईडीच्या पणजी क्षेत्रीय कार्यालयाने १८ सप्टेंबर रोजी उत्तर गोवा मुख्य जिल्हा व सत्र न्यायालयातील पीएमएलए विशेष न्यायालयात ही कारवाई केली.

निहाल वडाक्कनचेरी नाझर, प्रसोभ पी. के., अल्फिन थॉमस, धीरज मॅथ्यूज आणि निशांत प्रताप यांचा पुरवणी आरोपपत्रात समावेश करण्यात आला आहे. त्यांच्याविरुद्ध 'प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉंड्रिंग ॲक्ट', २००२ मधील कलम ४४ व ४५ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

यापूर्वी १६ मार्च रोजी ईडीने मुख्य आरोपी मधुपान सुरेश शशिकला याच्यासह सात जणांविरुद्ध मुख्य तक्रार दाखल केली होती. उत्तर गोवा अँटी-नार्कोटिक सेलने १५ ऑक्टोबर २०२४ रोजी नोंदवलेल्या एफआयआरच्या आधारे ईडीने तपास सुरू केला होता.

ईडीच्या तपासानुसार, संशयितांनी २०१६ पासून आंतरराज्य व सीमापार अमली पदार्थांच्या तस्करीतून सुमारे ३.९६ कोटी रुपयांची अवैध कमाई केली. संशयितांनी हा पैसा विविध बँकिंग माध्यमांतून दुबईला पाठवून त्याचे 'यूएसडीटी' या क्रिप्टोकरन्सीत रूपांतर करण्यात आल्याचा ईडीचा दावा आहे. त्यानंतर या डिजिटल चलनाचा वापर डार्क वेबद्वारे अमली पदार्थ खरेदीसाठी केला जात असल्याचे तपासात समोर आल्याचे ईडीने म्हटले आहे.

संशयित निहालच्या जामिनाला आव्हान

संशयित निहाल व्ही. एन. उर्फ निहाल याच्या ड्रग्स तस्करी आणि मनी लॉंड्रिंग प्रकरणात थेट सहभाग असल्याचा दावा करून ईडीने गोवास्थित मुंबई उच्च न्यायालयात त्याच्या जामिनाला आव्हान दिले होते. हे आव्हान उच्च न्यायालयाने फेटाळून लावले आहे. याबाबतचा आदेश न्या. एस. जी. चपळगावकर यांनी दिला. संशयित निहाल व्ही. एन. याने ड्रग्ज तस्करीतून ३.९६ कोटींहून अधिक रकमेचा व्यवहार केला. सदर रक्कम मनी लॉंड्रिंग असल्याचा दावा ईडीने केला.

आरोलकरच्या अटकपूर्व जामिनावर आज सुनावणी

सत्र न्यायालयाच्या निवाड्यावरील आव्हान अर्जावर उच्च न्यायालयात सुनावणी

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
म्हापसा

तोरसे, पेडणे येथील ५१,५६० चौरस मीटर जमीन विकण्याचे आश्वासन देऊन जुवारीनगर, मुरगाव येथील महिलेची ४१ लाख ८५ हजार ७५० रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी साईच्छा डेव्हलपर्सचे मालक संशयित तारक आरोलकर यांनी दाखल केलेल्या अटकपूर्व जामीन अर्जावर मंगळवार, २२ सप्टेंबर रोजी सुनावणी होणार आहे. सोमवारी २१ सप्टेंबर रोजी म्हापसा अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयात या अर्जावर सुनावणी झाली. यावेळी म्हापसा पोलिसांनी आपले म्हणणे न्यायालयात सादर केले. त्यानंतर न्यायालयाने सुनावणी मंगळवारपर्यंत तहकूब केली.

या प्रकरणी म्हापसा पोलिसांनी ११ सप्टेंबर रोजी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी संध्या भंडारे सिक्वेरा (जुवारीनगर, मुरगाव) यांनी २१ ऑगस्ट रोजी पोलिसांत तक्रार दिली होती.

रोलकर याला अटक केली होती. तक्रारीनुसार, आरोलकर यांनी फिर्यादीच्या आईशी संपर्क साधून तोरसे, पेडणे येथील 'रुमडाची पाणी' या नावाने ओळखली जाणारी ५१,५६० चौमी जमीन विकण्याचे आश्वासन दिले. या व्यवहारासाठी त्यांच्याकडून ४१ लाख ८५ हजार ७५० रुपये घेतल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. मात्र, आश्वासनाप्रमाणे जमिनीचे विक्रीपत्र करून न दिल्याने फसवणूक झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.



आसगाव जमीन फसवणूक प्रकरणात २५ रोजी सुनावणी

आसगाव येथील जमीन फसवणूक प्रकरणात म्हापसा न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळल्याच्या निवाड्याला तारक आरोलकर यांनी आव्हान दिले आहे. या याचिकेवर २५ सप्टेंबर रोजी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयात सुनावणी होणार आहे. दिल्ली येथील पंकज बजाज यांची ४० लाख रुपयांची फसवणूक केल्याच्या तक्रारीवरून गुन्हा शाखेने १९ ऑगस्ट रोजी आरोलकर यांना अटक केली होती.

बनावट जन्म दाखला प्रकरणही उच्च न्यायालयात

मागासवर्गीय (ओबीसी) दाखला मिळवण्यासाठी वडिलांचा बनावट जन्म दाखला सादर केल्याप्रकरणी दाखल गुन्ह्यातही आरोलकर यांनी अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. मात्र, सत्र न्यायालयाने हा अर्ज फेटाळला. या निवाड्याला आरोलकर यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले असून, या याचिकेवर मंगळवार, २२ सप्टेंबर रोजी सुनावणी होणार आहे. फ्रान्सिस कार्व्हालो यांच्या तक्रारीच्या आधारे गुन्हा शाखेने हा बनावटगिरीचा गुन्हा दाखल केला आहे.

पर्वरी उड्डाणपुलावर ह्युंदाई क्रेटाला कारची धडक, दोघे जखमी

गोवन वार्ता ■ न्यूज डेस्क
पणजी

पर्वरी येथील नव्याने वाहतुकीसाठी खुल्या करण्यात आलेल्या एलिव्हेटेड उड्डाणपुलावर अपघातांचे सत्र सुरूच असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. २१ सप्टेंबर रोजी पहाटे सुमारे १.३०च्या सुमारास या उड्डाणपुलावर रस्ता अपघात घडला, ज्यामध्ये दोघे जण जखमी झाले आहेत.

उड्डाणपुलावरून जात असताना एका भरधाव पांढऱ्या रंगाच्या हॅचबॅक कारने समोर चाललेल्या काळ्या रंगाच्या ह्युंदाई क्रेटा गाडीला मागून जोरदार धडक दिली. यात दोन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे. अपघातात जखमी झालेल्या दोन्ही व्यक्तींना तातडीने उपचारासाठी बांबोळी येथील गोवा वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन अपघातग्रस्त वाहने बाजूला केली. हा अपघात नेमका कोणत्या कारणांमुळे घडला याचा तपास पर्वरी पोलीस करत आहेत.

यल्लम्मा डोंगरावरील अनधिकृत दुकाने, भेसळयुक्त अन्नपदार्थ विकणाऱ्यांवर बडगा

जिल्हा प्रशासनाची कारवाई : दोषींवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
बेळगाव

सौंदत्ती येथील प्रसिद्ध यल्लम्मा डोंगर परिसरातील अनधिकृत दुकाने आणि भेसळयुक्त अन्नपदार्थ विक्रेत्यांविरोधात जिल्हा प्रशासनाने कडक कारवाई केली. मंदिर प्राधिकरणाच्या मुख्य अधिकारी प्रभावती फक्कीरपूर आणि जिल्हाधिकारी मोहम्मद रोशन यांच्या नेतृत्वाखाली ही तपासणी करण्यात आली.

किराणा दुकाने, पूजा साहित्य केंद्रे आणि उपाहारगृहांची अचानक तपासणी केली असता मुदत संपलेली शीतपेये, कालबाह्य खाद्यपदार्थ, निकृष्ट साहित्य तसेच नियमबाह्य पद्धतीने औषधविक्री होत असल्याचे आढळले. काही ठिकाणी शौचालयांचा साठवणूक व स्वयंपाकघरासाठी वापर होत असल्याचेही निदर्शनास आले. संबंधित दुकानांचा वीज व पाणीपुरवठा खंडित करण्यात आला.

दोषींवर एफआयआरचे आदेश

कर्तव्यात कसूर करणारे अधिकारी तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात एफआयआर दाखल करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. यल्लम्मा देवस्थानच्या विकासासाठी २१५ कोटींचा प्रकल्प सुरू असून, पुढील ६ ते ८ महिन्यांत आधुनिक सुविधा उभारण्याचे नियोजन आहे.



यलाम्मा डोंगरावरील दुकानांवर कारवाई करताना अधिकारी.

मोखर्ड येथे मृतावस्थेत सापडलेल्या वृद्ध बहिणींवर अंत्यसंस्कार

काणकोण पोलिसांना शवचिकित्सा अहवालाची प्रतीक्षा

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
काणकोण




मोखर्ड-काणकोण येथील मूळ घरात मृतावस्थेत आढळलेल्या वयोवृद्ध रेखा कामत (७८) व मेधा कामत (७२) या बहिणींवर सोमवारी मडगाव हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. उत्तरीय तपासणीनंतर दोन्ही मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले, अशी माहिती काणकोण पोलीस स्थानकाचे निरीक्षक तेरॉन डिकॉस्टा यांनी दिली.

दोन्ही बहिणींचे मृतदेह सापडलेल्या घराची पोलिसांनी तपासणी केली असता सुसाईड नोट आणि ३० हजार १०० रुपये आढळले. या रकमेचा उपयोग अंत्यसंस्कारासाठी करावा, असा उल्लेख सुसाईड नोटमध्ये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

तसेच क्लिनिकल रसायन असलेली अर्धवट भरलेली बाटलीही आढळली.

या क्लिनिकल रसायनाचे सेवन केल्यामुळे दोन्ही बहिणींचा मृत्यू झाला असावा, असा प्राथमिक अंदाज काणकोण पोलिसांनी व्यक्त केला आहे. त्यांना सुमारे पाच दिवसांपूर्वी मृत्यू आला असावा, असाही अंदाज आहे. मात्र, मृत्यूचे नेमके कारण शवचिकित्सा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.



संशयिताविरोधात प्रथमदर्शनी पुरावे असल्याचे न्यायालयाचे निरीक्षण

'एमडीएमए'तस्करीप्रकरणी आरोपमुक्ततेचा अर्ज फेटाळला

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
पणजी

पाटो-पणजी येथील एमडीएमए तस्करीप्रकरणी संशयित साजीर मोहम्मद अली याने दाखल केलेला आरोपमुक्ततेचा अर्ज मेरशी येथील विशेष एनडीपीएस न्यायालयाने फेटाळून लावला. जप्त करण्यात आलेले एमडीएमए व्यावसायिक प्रमाणात असून, आरोपपत्रानुसार संशयिताविरोधात प्रथमदर्शनी पुरावे उपलब्ध असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले. याबाबतचा आदेश न्या. शिल्पा पंडित यांनी दिला.

या प्रकरणी गोवा पोलिसांच्या गुन्हा शाखेने १७ मे २०२५ रोजी गुन्हा दाखल केला होता. पाटो-पणजी येथील केंद्रीय ग्रंथालयासमोरील पार्किंगमध्ये अमली पदार्थांचा व्यवहार होणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पहाटे ३.३०च्या सुमारास तत्कालीन पोलीस उपअधीक्षक राजेश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक नितीन हळर्णकर यांच्या पथकाने कारवाई करून केए-२०-एमबी-११५९ क्रमांकाची बलेनो कार अडवली. कारची झडती घेतली असता १२ लाख रुपये किमतीचे ९१.९३४ ग्रॅम एमडीएमए आढळून आले. पोलिसांनी साजीर मोहम्मद अली, मोहम्मद अहमद सुहेल आणि मोईद्दीन अब्दुल्ला अश्शिन यांना ताब्यात घेतले. त्यांच्याविरोधात एनडीपीएस कायद्याच्या कलम २२(क) आणि २९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हा शाखेने तपास पूर्ण करून आरोपपत्र दाखल केले. त्यानंतर न्यायालयाने मोहम्मद अहमद सुहेल आणि मोईद्दीन अब्दुल्ला अश्शिन यांच्याविरोधात सबळ पुरावे नसल्याने त्यांना आरोपमुक्त केले. मात्र, साजीर अलीनेही आरोपमुक्ततेसाठी अर्ज केला होता. अलीच्या वकिलांनी तो कर्नाटकातील मच्छी व्यावसायिक असून कामानिमित्त गोव्यात आला होता, असा दावा केला. पोलिसांनी त्याचे अपहरण करून खोट्या प्रकरणात अडकविल्याचा आरोपही करण्यात आला. या दाव्याच्या समर्थनार्थ सीसीटीव्ही फुटेज सादर करण्यात आले.



आरोप निश्चित करण्याचे आदेश

सरकारी वकील एस. प्रभुदेसाई यांनी संशयिताकडून व्यावसायिक प्रमाणातील अमली पदार्थ जप्त झाल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकल्यानंतर न्यायालयाने सीसीटीव्ही फुटेजचा उल्लेख आरोपपत्रात नसल्याचे नमूद केले. हा मुद्दा खटल्याच्या सुनावणीदरम्यान मांडता येईल, असे स्पष्ट करत न्यायालयाने आरोपमुक्ततेचा अर्ज फेटाळून लावला आणि आरोप निश्चित करण्याचे आदेश दिले.

थोडक्यात

'ओंकार'ची दहशत



सिंधुदुर्गमधील कास-मडुरे येथे एक शेतकरी माडावर चढून नारळ पाडत असताना 'ओंकार' हत्ती तेथे पोहोचला. हत्ती निघून गेल्यानंतरच तो व्यक्ती खाली उतरला.

राज्यात तीन दिवस पावसाची शक्यता

गोवन वार्ता ■ पणजी :
अंदमानच्या समुद्रात तयार झालेला कमी दाबाचा पट्टा व अन्य वातावरणीय कारणांमुळे राज्यात २२ ते २४ सप्टेंबर दरम्यान पावसाची शक्यता आहे. हवामान खात्याने या तीन दिवसांत वादळी वाऱ्यासह मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. दरम्यान, सोमवारी राज्यातील तापमान वाढ कायम होती. पणजीत कमाल ३२.४ अंश, तर किमान २५.८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. हे पणजीतील सप्टेंबर महिन्यातील दहावे सर्वाधिक किमान तापमान ठरले आहे. सोमवारी मुरगावमध्ये कमाल तापमान ३२.८ अंश व किमान तापमान २५.९ अंश सेल्सिअस राहिले. पुढील सहा दिवस राज्यातील कमाल तापमान ३१ ते ३३ अंश, तर किमान तापमान २५ ते २६ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे.

'जीसुडा'तर्फे ५७.६१ लाखांची निविदा : म्हापशातील कचरा समस्येवर उपाय

कुचेली येथील कचरा प्लांटमध्ये उभारणार नवी एमआरएफ शेड

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
म्हापसा



येथील शहरातील घनकचरा व्यवस्थापन पायाभूत सुविधा बळकट करण्याच्या उद्देशाने म्हापसा पालिकेने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत कुचेली कचरा प्लांटमध्ये ४०० चौरस मीटर जागेत मटेरियल रिकव्हरी फॅसिलिटी (एमआरएफ) उभारण्याचा प्रस्ताव मांडला आहे. सध्याची सुविधा क्षमतेपेक्षा जास्त कचऱ्याच्या भाराखाली असल्याने ही योजना पालिकेने आखली आहे.

यासाठी गोवा राज्य नागरी विकास एजन्सीने (जीसुडा) या प्रस्तावित सुविधेसाठी ५७.६१ लाख रुपये अंदाजित खर्चाची निविदा जारी केली आहे. म्हापसा नगरपालिकेची कचरा व्यवस्थापनाची एमआरएफ सुविधा कुचेली येथे कार्यरत आहे. कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करण्याच्या उद्देशाने येथे कन्व्हेयर बेल्ट आणि बेलिंग मशीनने सुसज्ज एमआरएफ शेड, ओल्या कचऱ्यासाठी ५ टीपीडी (टन प्रति दिवस) क्षमतेचा बायो-मिथेनेशन प्लांट, १.५ टीपीडी क्षमतेचा इन्सिनरेटर आणि वजन काटा (वे-ब्रिज) उभारण्यात आला होता. मात्र कचऱ्याच्या प्रमाणात झालेली वाढ आणि आसगाव पठारावरील कचरा डेपो बंद झाल्यामुळे सध्याच्या या कचरा सुविधेवर मोठा ताण निर्माण झाला आहे. पालिका अधिकाऱ्यांनी माहिती दिली की, सध्या एमआरएफ केंद्रावर पुनर्वापर करण्यायोग्य कचऱ्याचा १०-१२ टन साठा जमा होतो, जो केंद्राच्या हाताळणी क्षमतेपेक्षा जास्त आहे. परिणामी, जागा आणि पायाभूत सुविधांच्या कमतरतेमुळे कचरा विलगीकरण, वर्गीकरण, बेलिंग आणि पुनर्वापर करण्यायोग्य कचऱ्याची योग्य साठवणूक यांसारख्या कामांच्या सुरळीत आणि पद्धतशीर संचालनावर परिणाम होत आहे.

कंपोस्टिंग युनिट, लिचेट टँकचाही प्रस्ताव

नवीन एमआरएफ व्यतिरिक्त नगरपालिकेने कुचेली येथील घनकचरा व्यवस्थापन (एमएसडब्लू) जागेवर ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी ३०.२७ लाख रुपये अंदाजित खर्चाचा कंपोस्टिंग युनिट उभारण्याचा प्रस्तावही मांडला आहे. या प्रस्तावात बायो-मिथेनेशन प्लांटच्या परिसराचा विकास आणि एमएसडब्लू जागेवर निर्माण होणारे लिचेट (कचऱ्यातून झिरपणारे दूषित पाणी) गोळा करण्यासाठी लिचेट टँकच्या बांधकामाचाही समावेश आहे.

विरोध करण्याच्या नादात काँग्रेसने राजकीय सभ्यतेच्या सीमा ओलांडल्या!

राहुल गांधींच्या कार्यक्रमातील मिमिक्रीवर मुख्यमंत्र्यांची टीका

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
पणजी



काँग्रेस पक्ष आणि राहुल गांधी राजकीय टीका करताना पातळी सोडून वागत असून त्यांनी राजकीय सभ्यतेच्या सर्व सीमा ओलांडल्याचा घणाघाती आरोप मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी केला आहे.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या मध्य प्रदेशातील इंदूर येथे आयोजित 'छात्रों की गूंज' या युवा संवाद कार्यक्रमात घडलेल्या एका वादग्रस्त प्रसंगामुळे देशभरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. कार्यक्रमात सादर करण्यात आलेल्या एका मिमिक्रीवरून सर्व स्तरांतून तीव्र प्रतिक्रिया उमटत असून भाजप आणि काँग्रेसमध्ये जोरदार आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत.

मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी या घटनेवर अत्यंत तीव्र शब्दांत संताप व्यक्त केला आहे. लोकशाही व्यवस्थेत राजकीय विरोध आणि मतभेद असणे स्वाभाविक व आवश्यक आहे. विरोधकांनी सरकारच्या धोरणांवर प्रश्न विचारावेत, निर्णयांना आव्हान द्यावे आणि जोरदार वादविवाद करावा. परंतु विरोध करताना राजकीय चर्चेचा स्तर थेट एखाद्याच्या आई-वडिलांवर किंवा घरातील ज्येष्ठांवर वैयक्तिक टीका करण्यापर्यंत घसरणे अत्यंत दुर्दैवी व निंदनीय आहे, असे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. वैयक्तिक हल्ले करणे ही भारतीय संस्कृती आणि लोकशाही मूल्यांच्या विरोधी असून प्रत्येक पक्षाने ज्येष्ठांचा व माता-पित्यांचा सन्मान राखणे ही प्राथमिक जबाबदारी आहे. काँग्रेसने अशा गलिच्छ राजकारणापासून दूर राहावे, असा इशारा मुख्यमंत्र्यांनी दिला.

इंदूर येथील कार्यक्रमातील प्रकार...

इंदूरमधील या कार्यक्रमात स्टँड-अप कॉमेडियन पुलकित मणि यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या बोलण्याच्या शैलीची, हावभावांची आणि विदेशी नेत्यांशी संवाद साधण्याच्या पद्धतीची नक्कल केली. 'माय फ्रेंड, हाऊ आर यू?' अशा संवादांवर राहुल गांधी यांनीही विनोदी शैलीत उत्तरे दिली. या मिमिक्रीमध्ये परराष्ट्र धोरणासह काही अलीकडील घटनांचा संदर्भ देण्यात आला होता. या कार्यक्रमाचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रचंड व्हायरल झाल्यानंतर वादाला तोंड फुटले.

आप-गोवा फॉरवर्डच्या युतीमुळे काँग्रेसच्या पोटात दुखतेय!

'आप'चे गोवा अध्यक्ष वाल्मिकी नाईक यांचा आरोप

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
पणजी

आम आदमी पार्टी आणि गोवा फॉरवर्ड यांची 'गोवा फर्स्ट' युती आगामी निवडणुकीत यशस्वी ठरेल. या युतीबाबत फेरविचार करण्याच्या ज्या चर्चा आणि तर्क-वितर्क लावले जात आहेत, ते चुकीचे आहेत. या गोवा फर्स्ट युतीमुळे काँग्रेसच्या पोटात दुखत असून आमची ही युती चांगल्या प्रकारे पुढे जात आहे, असे 'आप'चे गोवा अध्यक्ष वाल्मिकी नाईक यांनी सांगितले.

गोवा फर्स्ट युतीबाबत गोवा फॉरवर्ड फेरविचार करण्यास तयार आहे, अशा काही चर्चा सुरू होत्या. यावर उत्तर देताना आपचे वाल्मिकी नाईक म्हणाले की, फेरविचाराच्या गोष्टी या गोवा फॉरवर्डच्या अंतर्गत बाबी असून त्यांनीच त्या सोडवायला हव्यात.

कोणतेही बदल झालेले नाहीत!

विजय सरदेसाई यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, सध्या कोणतेही बदल झालेले नाहीत आणि तर्क-वितर्क लावण्याची गरज नाही. घेतलेल्या निर्णयानुसारच आम्ही पुढे जात आहोत. येणाऱ्या निवडणुकीत ही युती यशस्वी होईल असा आम्हाला विश्वास आहे, असे स्पष्टीकरण वाल्मिकी नाईक यांनी दिले.

भाजपकडूनही युती लक्ष्य!

जागावाटप, किमान समान कार्यक्रम यांसारख्या विविध विषयांवर आमची चर्चा सुरूच आहे. जेव्हा ही युती झाली तेव्हा काहींच्या पोटात दुखू लागले व त्यांची धांदल उडाली. एक मजबूत विरोधी आघाडी तयार झाल्यामुळे केवळ विरोधकच नव्हे, तर भाजपनेसुद्धा या युतीला लक्ष्य करण्यास सुरुवात केली आहे, असे वाल्मिकी नाईक यांनी सांगितले.

पर्वरीत 'आयआयएम' कसा उपाय काढणार?

उड्डाणपुलाच्या तांत्रिक त्रुटींवरून 'आप'चा सरकारला प्रश्न

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
पणजी

पर्वरी उड्डाणपुलातील तांत्रिक त्रुटी सुधारण्यासाठी नियुक्त केलेल्या आयआयएम नागपूरची पात्रता काय आहे, ते सांगावे. पर्वरी उड्डाणपूल ही एक अभियांत्रिकी समस्या आहे आणि यात व्यवस्थापन संस्था काय करू शकते? फक्त दोष स्वत:वरून झटकण्यासाठी आयआयएम नागपूरची नियुक्ती करण्यात आली आहे, असा आरोप आम आदमी पक्षाचे गोवा अध्यक्ष वाल्मिकी नाईक यांनी केला आहे.

पर्वरी उड्डाणपुलाच्या सर्व्हिस रस्त्याजवळ आयोजित पत्रकार परिषदेत नाईक बोलत होते. या वेळी 'आप'चे नेते मान्युएल कार्दोझ उपस्थित होते.

ज्या त्रुटी अगदी स्पष्टपणे समोर आल्या आहेत, त्या दुरुस्त करण्यासाठी आयआयएम नागपूरला बोलावले आहे. तांत्रिक विश्लेषण करण्यासाठी आयआयएम नागपूरकडे कसली पात्रता आहे? अभियांत्रिकी विषयासाठी तुम्ही व्यवस्थापन क्षेत्रातील लोकांना का आणत आहात? असा प्रश्न नाईक यांनी केला.

दरम्यान, फक्त सूचना फलकांसाठी १.८२ कोटी रुपये इतका खर्च दाखवला आहे. त्याशिवाय निविदेत ३४३ दिव्यांच्या खांबांचा समावेश आहे, परंतु प्रत्यक्षात १७४ खांबच उभारण्यात आले आहेत. उरलेले खांब कुठे गेले ते जनतेला सांगावे. या पुलाचे आधी घाईघाईत उद्घाटन करून आता तज्ज्ञ नेमले आहेत; पण पुलाचे अलाइनमेंटचे काम सुरू असताना हे तज्ज्ञ कुठे गेले होते? असा प्रश्न काँग्रेस नेते बर्डे यांनी विचारला आहे.

टॉयलेट, बस स्टॉप कुठे गेले? : संजय बर्डे

काँग्रेसचे नेते संजय बर्डे यांनी माहिती अधिकारांतर्गत निविदा अहवालातील गंभीर विसंगती उघडकीस आणल्या. निविदेमध्ये उड्डाणपुलाखाली दोन टॉयलेट, सर्व्हिस रस्त्याच्या बाजूला ९४ बस स्टॉप आणि पदपथावर पेव्हर्सचा उल्लेख होता, हे सर्व कुठे गेले याचे उत्तर पर्वरीचे आमदार रोहन खंवटे यांनी द्यावे, असे आव्हान बर्डे यांनी दिले आहे.

फक्त आणि फक्त निवडणुकांसाठी या प्रकल्पाचे घाईघाईने उद्घाटन करण्यात आले आहे. तीन-चार महिन्यांत निवडणुका असल्याने विकास कसा केला आहे हे दाखवण्यासाठी कोणत्याही प्रकारचे नियोजन आणि सुरक्षेचे फलक नसताना हा प्रकल्प खुला केल्यामुळे येथे गोंधळ आणि आपत्ती निर्माण झाली आहे.

- वाल्मिकी नाईक, आपचे गोवा अध्यक्ष

'भारत नेट'अंतर्गत ग्रामपंचायतीच्या वीज जोडण्यांना शासकीय दर्जा

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
पणजी

सुधारित 'भारत नेट' उपक्रम अंतर्गत ग्राम पंचायत आणि गावांमध्ये देण्यात आलेल्या वीज जोडण्यांना आता अधिकृत शासकीय जोडण्यांचा दर्जा दिला जाणार आहे. मात्र यासाठी केंद्रीय वीज खात्याने जारी केलेल्या सर्व नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी केलेली असणे आवश्यक आहे. याबाबत वीज खात्याने परिपत्रक जारी केले आहे. याशिवाय ब्रॉडबँड पायाभूत सुविधांच्या विकासाला गती देण्यासाठी तसेच प्रशासकीय विलंब टाळण्यासाठी वीज खात्यातर्फे नवीन मार्गदर्शक सूचना लागू करण्यात आल्या आहेत.

सुधारित 'भारत नेट' उपक्रमाचा विस्तार वेगाने करण्यासाठी खात्याने हा धोरणात्मक निर्णय घेतला आहेत. नवीन नियमांनुसार, प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी वीज खात्याने एकच केंद्रीय अर्ज (सीएएफ) स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे. या एकखिडकी पद्धतीमुळे विविध ठिकाणी आवश्यक असलेल्या अनेक वीज जोडण्यांसाठी अधिकृत संस्थांना एकच अर्ज करणे शक्य होणार आहे. यामुळे अर्जाच्या प्रक्रियेत लागणारा वेळ कमी होणार आहे.

याशिवाय एकाच अर्जदाराच्या अनेक प्रकल्पांची मासिक वीज बिले एकत्रित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

टेलिकॉम सर्व्हिस प्रोव्हायडर्स (टीएसपी), इन्फ्रास्ट्रक्चर प्रोव्हायडर्स (आयपीआय) आणि भारत ब्रॉडबँड नेटवर्कच्या अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांना या सुविधेचा लाभ घेता येईल. अशा संस्थांना सर्व प्रक्रियांचे पालन करणे आवश्यक आहे. खात्याचे मुख्य अभियंता स्टीफन फर्नांडिस यांनी जारी केलेल्या या आदेशाची त्वरित अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

'इनफ इज इनफ'तर्फे नागरिकांशी संवाद कार्यक्रमांचे आयोजन

जाहीर सभांचे आयोजन : विद्यार्थी, युवकांना करणार मार्गदर्शन

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
पणजी

'इनफ इज इनफ'तर्फे राज्यभरात विविध 'आऊटरी'च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये एनजीओ आणि समविचारी नागरिकांशी चर्चा, विद्यार्थी तसेच युवकांना मार्गदर्शन आणि गाव पातळीवरील कायदेशीर अडचणी व समस्या सोडवण्यासाठी जाहीर सभांचे आयोजन यांचा समावेश आहे. गोव्याचे भवितव्य जपण्यासाठी सर्वांनी या कार्यक्रमांना उपस्थित राहावे, असे आवाहन स्वप्नेश शेर्लेकर यांनी केले.

सोमवारी पणजीत पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी गोविंद शिरोडकर आणि देवीदास आमोणकर उपस्थित होते.

शेर्लेकर यांनी सांगितले की, 'इनफ इज इनफ'तर्फे २२ सप्टेंबर रोजी मडगाव येथील ग्रेस चर्च हॉलमध्ये, तर २३ सप्टेंबर रोजी म्हापसा येथील कोमुनिदाद हॉलमध्ये बैठका घेण्यात येणार आहेत. दोन्ही बैठका सायंकाळी ५ वाजता सुरू होतील. या बैठकात समविचारी एनजीओ आणि बुद्धिजीवींशी संवाद साधला जाईल. आमच्या चळवळीसोबत अधिकाधिक लोक, संघटना जोडणे हा आमचा हेतू आहे. अधिक लोक असल्यास सरकारवरील दबावदेखील वाढू शकतो. संघटित पद्धतीने काम केल्यास गोव्याचे हित अधिक प्रमाणात जपणे शक्य होईल.

गोविंद शिरोडकर यांनी सांगितले की, आमच्या चळवळीत विद्यार्थी, युवकांचा सहभाग महत्त्वाचा आहे. यासाठी आम्ही गांधी जयंतीनिमित्त २ ऑक्टोबर रोजी युथ कन्व्हेन्शनचे आयोजन केले आहे. यामध्ये राज्यभरातील महाविद्यालयिन युवकांना सहभागी करून घेण्याचा आमचा प्रयत्न असेल. यासाठी आम्ही विविध महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पत्र लिहिणार आहोत. ३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता चोडण ग्रामपंचायतीमध्ये बैठक घेण्यात येईल. सर्व कार्यक्रमांमध्ये न्या. फेर्दिन रिबेलो मार्गदर्शन करणार आहेत.

'चार्टर' मान्य करणाऱ्या पक्षांना पाठिंबा!

आमोणकर यांनी सांगितले की, 'इनफ इज इनफ'तर्फे १० मुद्द्यांचे 'चार्टर' जारी करण्यात आले आहे. हे चार्टर जे मान्य करतील त्या सर्व राजकीय पक्षांना आमचा पाठिंबा असणार आहे. एनडीझेडबाबत सरकारने एक घोषणा केली आहे. मात्र आम्हाला केवळ तोंडी आश्वासन नको. ही घोषणा ऑर्डर स्वरुपात जारी करणे आवश्यक आहे.

काँग्रेस-भाजपमध्येच पाळी मतदारसंघात २००८ साली लढत!

गोवन वार्ता ■ न्यूज डेस्क
पणजी

२००८ च्या पाळी मतदारसंघातील पोटनिवडणुकीवरून मगोपचे नेते आणि मंत्री सुदिन ढवळीकर यांनी केलेला दावा भाजपचे माजी खासदार तथा एनआरआय आयुक्त नरेंद्र सावईकर यांनी फेटाळून लावला आहे. २००८ मधील पाळी पोटनिवडणुकीत महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाचा कोणताही अधिकृत किंवा प्रमुख उमेदवार रिंगणात नव्हता आणि त्या निवडणुकीत भाजपचे उमेदवार डॉ. प्रमोद सावंत व काँग्रेसमध्येच थेट लढत झाली होती, असे सावईकर यांनी सांगितले. तत्कालीन आमदार गुरुदास गावकर यांच्या निधनामुळे २००८ मध्ये तिथे पोटनिवडणूक पार पडली होती. या निवडणुकीत काँग्रेसतर्फे प्रताप गावस आणि भाजपतर्फे डॉ. प्रमोद सावंत यांच्यात थेट सामना झाला होता. या निवडणुकीत प्रताप गावस विजयी झाले होते.

आगामी निवडणूक 'मगो'च्याच उमेदवारीवर लढणार : जीत

भाजपमध्ये प्रवेश करण्याच्या चर्चांना नकार

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
पणजी



मी मगो पक्षात असून मगो पक्षातच राहणार आहे. तसेच आगामी निवडणूकसुद्धा मगोतर्फेच लढविणार असल्याचे मांद्रेचे मगो आमदार जीत आरोलकर यांनी स्पष्ट केले. ते भाजपमध्ये प्रवेश करणार अशी चर्चा होती. या पार्श्वभूमीवर मगो पक्षातर्फेच निवडणूक लढविणार असल्याचे त्यानी स्पष्ट केले आहे.

आमदार जीत आरोलकर व भाजप नेत्यांदरम्यानची जवळीक वाढली आहे. पंधरा दिवसापूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली पश्चिम विभागीय राज्यांची बैठक झाली. या बैठकीला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे गोव्यात आले होते. मोपा विमानतळावर त्यांचे स्वागत करण्याची जबाबदारी आमदार जीत आरोलकर यांच्यावर सोपविण्यात आली होती. याच दरम्यान जीत आरोलकर भाजपमध्ये प्रवेश करणार अशी चर्चा सुरू झाली. मुख्यमंत्र्यांच्या सांगण्यावरून देवेंद्र फडणवीस यांच्या स्वागतासाठी आपण मोपा विमानतळावर गेलो होतो. त्यांच्याशी माझा पूर्वीपासून परिचय आहे, असेही त्यावेळी जीत आरोलकर यांनी सांगितले होते.

सोमवारी पणजीत बोलताना आगामी निवडणूक मगो पक्षातर्फेच मांद्रेतून लढविणार असल्याचे वक्तव्य त्यांनी केले.

वन खात्याची माहिती : चार वर्षांत अज्ञातांविरुद्ध ७ गुन्हे, ९०,८९० रुपये दंड

राज्यात खारफुटींच्या नुकसानीची २९ प्रकरणे

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
पणजी

गेल्या चार वर्षांत साडेसहाशे पेक्षा जास्त खारफुटींचे नुकसान केल्याप्रकरणी २९ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. या २९ पैकी ७ गुन्हे अज्ञात व्यक्तींविरुद्ध नोंदवण्यात आले आहेत. तसेच ६ प्रकरणे निकाली काढून नियमभंग करणाऱ्यांना ९०,८९० रुपये दंड ठोठावल्याची माहिती वन खात्याने दिली आहे.


वन खात्याने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, गोव्यात २०२१-२२ ते २०२४-२५ या काळात ६५६ खारफुटींचे नुकसान झाले आहे. त्यापैकी ५८ खारफुटी कापण्यात (काटछाट) आल्या, तर ५९८ खारफुटी तोडण्यात आल्या.



खारफुटींच्या नुकसानीविरोधात स्थानिक पोलीस ठाण्यांमध्ये २९ गुन्हे दाखल झाले आहेत. त्यातील २० प्रकरणांचा तपास सुरू असून ३ प्रकरणांचा तपास पूर्ण झाला आहे आणि ६ प्रकरणांत दंड आकारून प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

२०२१-२२ या वर्षात ११२ प्रकरणे नोंदवली गेली होती, २०२२-२३ मध्ये या आकड्यात मोठी वाढ होऊन ३८० प्रकरणे नोंदवली गेली, २०२३-२४ मध्ये हे प्रमाण कमी होऊन १२० प्रकरणे नोंदवली गेली, तर २०२४-२५ मध्ये यात मोठी घट होऊन ४४ प्रकरणे नोंदवली गेली.

खारफुटींच्या नुकसानीविरोधात आकारलेला दंड



पहिल्या डीपीआरमध्ये पर्वरीसाठी होते एंट्री, एक्झिट पॉईंट्स!

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
पणजी

पर्वरी उड्डाणपुलाचा जो पहिला डीपीआर होता, त्यात पर्वरीसाठी एंट्री आणि एक्झिट पॉईंट्स होते. ठराविक अंतरानंतर उड्डाणपुलावरून खालच्या रस्त्यावर उतरण्यासाठी तसेच वर चढण्यासाठी पॉईंट्स देण्यात आले होते, असे आमदार नीलेश काब्राल यांनी सांगितले. पहिल्या डीपीआरमध्ये बराच बदल करूनच निविदा जारी करण्यात आली आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

आमदार नीलेश काब्राल हे यापूर्वी सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री होते. त्यांच्या कार्यकाळातच पर्वरी उड्डाणपुलाचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता.

विसर्जनानंतरचा कचरा



सात दिवसांच्या गणेशमूर्तींचे विसर्जन झाल्यानंतर करंझाळे-पणजी येथील समुद्रकिनाऱ्यावर फुले, हार, नारळ, केळी आणि प्लास्टिकचा कचरा विखुरलेला दिसून आला. ■ नारायण पिसुर्लेकर



शेतीची प्रगती ही केवळ पिकांवर नसते, तर तिचे योग्य नियोजन, पाणी व्यवस्थापन आणि जमिनीच्या संरक्षणावर अवलंबून असते. **- डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

संपादकीय

शेती संरक्षणासाठी दीर्घकालीन व्यवस्था

समुद्राच्या खाऱ्या पाण्याला शेतीत येण्यापासून रोखण्यासाठी गोव्यात असलेल्या संरक्षण बंधाऱ्यांची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. गोव्यातील शेतीचे हे वैशिष्ट्यही आहे. त्यामुळेच गोव्याच्या शेतीची एक वेगळी ओळख आहे. गेल्या काही वर्षांत समुद्राच्या खाऱ्या पाण्यामुळे गोव्यातील कितीतरी शेती पडीक झाली आहे. शेतकऱ्यांनी कंटाळून शेतीच सोडून दिली आहे. खाजन जमिनी पारंपरिक शेती व्यवस्थेचा भाग असल्या तरी गेल्या काही वर्षांत शेतीचे प्रमाण घटत चालले आहे; शेतात खारे पाणी घुसून जमीन नापीक होणे हे यामागचे मोठे कारण आहे. कारण या शेतीचे भवितव्य फक्त कष्टकरी शेतकऱ्यावर अवलंबून नाही, तर ती सुरक्षित ठेवणाऱ्या बंधाऱ्यांवरही अवलंबून आहे. हा बंधारा जर मजबूत असेल तरच खाजन शेती सुरक्षित राहू शकते. बंधाऱ्याला भगदाड पडले तर समुद्राचे खारे पाणी शेतात शिरून संपूर्ण शेतीच धोक्यात येते. गेल्या काही वर्षांमध्ये हीच बाब खाजन बंधाऱ्यांबाबत होत आहे. त्यामुळेच तिसवाडी, बार्देश, पेडणे, सासष्टी आणि मुरगावमध्ये अनेक ठिकाणी आज शेती पडीक दिसते. लोकांनी समुद्राशी संघर्ष करत बसण्यापेक्षा शेतीच करण्याचे सोडून दिले. शेतकऱ्यांची संख्या घटत आहे. मात्र त्यांना मदतीचा हात दिला तर पुन्हा शेती पुनरुज्जीवित होऊ शकते. सरकारच्या महसूल खात्याने बंधारे दुरुस्त करण्यासाठीचा संपूर्ण खर्च उचलण्याची अधिसूचना काढल्यामुळे यापुढे गोव्यातील काही बंधारे दुरुस्त होऊ शकतात आणि ज्यांनी शेती करणे बंद केले आहे असे काही शेतकरीही पुन्हा शेतीकडे वळू शकतात.

बंधारे दुरुस्तीसाठी सरकार नव्वद टक्के खर्च उचलायचे, पण अनेक शेतकरी संघटनांनी उर्वरित दहा टक्के खर्च न उचलल्यामुळे त्यांची नावे थकबाकीदारांमध्ये येत होती. त्यामुळे पुन्हा बंधारे दुरुस्त करायचे झाले, तर अडथळे यायचे. थकीत असलेल्यांना मदतही नाकारली जात होती. यातून पुढे शेतीच सोडून देणे असे प्रकार व्हायचे. राज्यात पाचशेपेक्षा जास्त बंधारे आहेत जे शेतीसाठी वरदान ठरले आहेत, मात्र सतत समुद्राच्या पाण्याला रोखणारे अनेक बंधारे फुटतात. त्यातून शेती खराब होते आणि दुरुस्ती वेळेवर होत नसल्यामुळे पुढे हा प्रश्न आणखी जटील होतो. तिसवाडी आणि सासष्टीमध्ये सर्वाधिक बंधारे आहेत. बार्देश, फोंडा आणि पेडणे या तालुक्यांतही मोठ्या प्रमाणात बंधारे आहेत. एकदा बंधाऱ्याला भगदाड पडले की त्यानंतर शेतीचे दुष्टचक्र सुरू होते. असा प्रकार घडल्यानंतर मामलेदारांकडून कृषी संचालनालयाला कळविले जाते. त्यानंतर बंधाऱ्याची पाहणी करून भगदाड बुजविण्यासाठी योग्य योजनेनुसार कार्यवाही केली जाते. यात दोन प्रकारे मदतीची योजना होती. एका योजनेत काही कामे करायची झाली, तर त्यासाठी ५० टक्के सरकारी अर्थसहाय्य मिळायचे. दुसऱ्या योजनेत सरकार ९० टक्के मदत करायचे, पण दहा टक्के खर्च टेनंट असोसिएशनकडून वसूल केला जायचा. मात्र ही रक्कम फेडण्यासाठी शेतकऱ्यांना अनंत अडचणी यायच्या. त्यामुळे सरकारने बंधारे दुरुस्त करण्यासाठी १०० टक्के खर्च उचलण्याचा जो निर्णय घेतला आहे, तो शेतीच्या संवर्धनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. अशा निर्णयामुळे गोव्यातील शेतीला चालना आणि प्रोत्साहनही मिळेल. यापुढे बंधारे दुरुस्ती ही सरकारची जबाबदारीच ठरणार आहे, त्यामुळे खाजन शेतीसाठी हा मोठा लाभदायक निर्णय आहे.

सरकारने बंधारे दुरुस्त करण्यासाठी १०० टक्के खर्च उचलण्याचा जो निर्णय घेतला आहे, तो शेतीच्या संवर्धनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. अशा निर्णयामुळे गोव्यातील शेतीला चालना आणि प्रोत्साहनही मिळेल. यापुढे बंधारे दुरुस्ती ही सरकारची जबाबदारीच ठरणार आहे, त्यामुळे खाजन शेतीसाठी हा मोठा लाभदायक निर्णय आहे.


खाजन शेतीत खारे पाणी शिरल्यानंतर संपूर्ण जमीन नापीक होऊ शकते. शेतकऱ्यांना बंधाऱ्याची दुरुस्ती वेळेवर जमली नाही किंवा सरकारने वेळेवर दुरुस्ती केली नाही, तर शेतीवर पाणी सोडण्याची वेळ येते. तिसवाडी, बार्देश आणि सासष्टीमध्ये अनेक ठिकाणी अशा प्रकारे खाजन शेती नापीक झाली आहे. हल्ली रस्त्याच्या कडेला नापीक दिसणारी शेती ही अशाच कारणांमुळे पडीक राहिली आहे. शेती पुनरुज्जीवित करायची असेल तर त्यासाठी सरकारने अशा बंधाऱ्यांची दुरुस्ती आता विनाविलंब करावी. १०० टक्के खर्च उचलण्यासाठी सरकारने घेतलेला हा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण असून गोव्यातील शेतीसाठी हा दीर्घकालीन लाभाचा निर्णय ठरणार आहे. ही फक्त योजना नाही तर खाजन शेतीच्या संवर्धनासाठी केलेली कायमस्वरूपी व्यवस्थाच आहे. शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेऊन शेती करण्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

अध्यात्म

भक्ती म्हणजे ईश्वराविषयी अत्यंत प्रेम

अनावर मनाला नामाचे ओंडके बांधावे,
म्हणजे भगवंताचे प्रेम येते.

एखाद्या मोठ्या यंत्रामध्ये एक चक्र सुरू झाले की बाकीची सर्व चक्रे आपापल्यापरी हळू किंवा जलद फिरू लागतात. त्याचप्रमाणे आपल्या मनाचे आहे. मनाची एक शक्ती काम करू लागली की तिच्याबरोबर इतर सर्व शक्तीदेखील हालचाल करू लागतात. मनाला आपल्या शक्तीने ताब्यात आणणे फार कठीण आहे. ते थोर माणसालाच जमण्यासारखे आहे. पारा समोर टाकला तर तो दिसतो, पण काठीने मारला तर तो मारला जात नाही. त्याचप्रमाणे, मन आहे हे समजते, पण ते आवरता येत नाही. म्हणूनच भगवंताला शरण जावे. आरशावर घाण पडली म्हणून साफ करण्याचा प्रसंग आला. अंत:करणाची घाण पुसण्याचे काम साधनाने होते. मिरच्या, मिरे, मीठ इत्यादी पदार्थ एकत्र करून जसा सुंदर मसाला तयार करतात, त्याप्रमाणे भगवंताच्या प्राप्तीसाठी तीन गोष्टींचा मसाला पाहिजे. शुद्ध आचरण, शुद्ध अंत:करण आणि भगवंताचे नामस्मरण, या त्या तीन गोष्टी आहेत. शुद्ध आचरण म्हणजे प्रामाणिकपणा, धार्मिक आचार आणि नीतीचे वर्तन. शुद्ध अंत:करण म्हणजे अभिमान नसणे, द्वेषमत्सर नसणे आणि सर्वजण सुखी असावेत अशी भगवंताची प्रार्थना करणे. भगवंताचे नामस्मरण म्हणजे भगवंताचा केव्हाही विसर न पडणे. नवऱ्याला देव आवडत नाही म्हणून बायकोने नामस्मरण सोडण्याचे कारण नाही. तिने नाम घेतले तर पत्नीधर्म सोडला असे होत नाही.



गोंदवलेकर महाराज

मनात येणारे भलतेसलते विचार हे नामाच्या प्रेमाला आडकाठी करतात. त्यांचा बंदोबस्त करण्याचा उपाय म्हणजे, या विचारांना थाराच देऊ नये म्हणजे झाले. एक मोठा पोलीस अंमलदार चोर पकडण्यात हुशार होता. तो असे करे की, चोर ज्या बाईच्या नादी असेल तिला फितुर करून घ्यायचा, म्हणजे चोर आपोआप नेमका सापडे. त्याचप्रमाणे आपले मन जिथे गुंतते तिथे भगवंताला ठेवला, की मन आपल्या ताब्यात आलेच म्हणून समजा. मनाचे संयमन करायला दोन उपाय आहेत : एक म्हणजे पातंजल योग आणि दुसरा म्हणजे भगवंताची भक्ती. पातंजल योग म्हणजे युक्ताहारविहार, नियमित राहणे, आणि इंद्रियांचा निरोध करणे. भगवंताची भक्ती म्हणजे ईश्वराविषयी अत्यंत प्रेम. या प्रेमाची साधने कोणती तर भगवंताचे नामस्मरण, त्याचे कथाकीर्तन, साधुसमागम आणि त्यातल्या त्यात सद्गुरूची कृपा, ही होत. भगवंताच्या स्मरणाशिवाय जी कर्मे होतात ती वाईट कर्मे होत. कोणताही खाण्याचा किंवा पिण्याचा पदार्थ भगवंताचे नाम घेतल्याशिवाय खायचा नाही, असा नेम ठेवला तर नाम आपोआप येते. कोणत्याही परिस्थितीत आपण नामस्मरणापासून ढळूच नये. जो नामात प्रपंच करील, त्याचा अभिमान नष्ट होऊन त्याला सुखासमाधानाचा लाभ झाल्यावाचून राहणार नाही.



प्रमोद ल. प्रभुगावकर

(लेखक ज्येष्ठ पत्रकार व राजकीय विश्लेषक आहेत)

विचारचक्र

वाहतूककोंडीवर पर्याय म्हणून उभारलेल्या पर्वरी उड्डाणपुलावरील अपघातांचे खापर संरचनेवर फोडण्याऐवजी, विरोधकांनी राजकारण न करता वाहनचालकांचा बेदरकारपणा, वेगावर नियंत्रण आणि सामूहिक जबाबदारी यांकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे.

पर्वरी उड्डाणपुलाचे त्रांगडे सोडविण्याची लगबग

पणजी - म्हापसा रस्त्यावरील प्रचंड वाहतूक व त्यामुळे विशेषत: पर्वरी भागात लागत असलेल्या वाहनांच्या रांगांमुळे होणारा खोळंबा गेली काही वर्षे सरकारची डोकेदुखी ठरला होता. मोपा आंतरराष्ट्रीय विमानतळ खुला झाल्यावर ही समस्या अधिक गंभीर बनली होती. त्यामुळेच पर्वरी ते गिरी दरम्यान उड्डाणपुलाची कल्पना पुढे आली. पाच कि.मी. हून थोडा अधिक लांबीचा हा उड्डाणपूल उभारण्याशिवाय दुसरा कोणताच पर्यायही नव्हता. कारण बगल रस्ता उभारण्यासाठी तेथे तशी जागा नव्हती व विद्यमान एनएच-६६ हा रस्ता रुंद करावा म्हटला, तर दोन्ही बाजूंना रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात बांधकामे उभी ठाकली होती. त्यामुळे हा उड्डाणपूल आखला गेला. त्यासाठी प्रचंड खर्च होणार होता, पण केंद्राच्या उदारवृत्तीमुळे त्याला मंजुरीही मिळाली. हरयानातील तत्पर ठेकेदारामुळे दोन वर्षांच्या मुदतीपेक्षा कमी वेळात ते बांधकाम पूर्णही झाले व सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री दिगंबर कामत यांनी चतुर्थीपूर्वी तो वाहतुकीस खुला करण्याबाबत केलेली घोषणा प्रत्यक्षातही आली. त्याचे मोठ्या दणक्यात उद्घाटनही केले गेले व तिसऱ्याच दिवशी तो वाहतुकीसही खुला केला गेला. पण कुठे तरी माशी शिंकली असावी. शुक्रवारी, ११ सप्टेंबर रोजी वाहतुकीस खुल्या झालेल्या या उड्डाणपुलावर दुसऱ्याच दिवशी शनिवारी एक अपघात होऊन त्यात दोन बळी गेले. सदर अपघात कसा झाला, त्याला जबाबदार कोण, याची शहानिशा न करताच जो तो त्या उड्डाणपुलाला व त्याच्या रचनेला दोष देताना दिसत आहे. त्यात सर्वांत अग्रेसर आहेत, ज्यांना अशा प्रकल्पाबाबत कसलीच माहिती किंवा ज्ञान नाही अशी मंडळी. या दिवसांत केवळ हाच अपघात नाही, तर असे अनेक अपघात होऊन बळी गेले आहेत, पण त्याबाबत कोणीच काही बोलताना दिसत नाहीत. पर्वरीतील त्या अपघाताचा मात्र गवगवा केला जाताना दिसत आहे. वास्तविक अपघात हा मुद्दाम केला जात नाही, पण बहुतेक अपघात हे बेदरकारीतून होत असतात. पर्वरीतील तसेच त्यानंतर परवा केरये - खांडेपार येथे कंटेनर व बुलेट मोटारसायकल यांच्यात झालेला अपघात हा अशा बेदरकारीतून झालेला आहे. त्याचा सहसा विचार होत नाही. पण पर्वरीतील अपघाताचे खापर उड्डाणपुलावर फोडण्याचा जो प्रकार होत आहे, ते पाहून संबंधितांची कीव करावीशी वाटते.



पर्वरीचे आमदार तथा मंत्री रोहन खवंटे यांनी तर "सदर पूल वाहतुकीस खुला करण्याबाबत आपणाला विश्वासात घेतलेले नाही," असे निवेदन करून वास्तविक स्वत:चेच हसे करून घेतले आहे. पुलाच्या उद्घाटनाच्या समारंभात त्यांनी केलेल्या भाषणाशी विसंगत असे त्यांचे हे निवेदन आहे, असे म्हणावे लागते. सदर पूल ठरलेल्या मुदतीपूर्वी पूर्ण करून वाहतुकीस खुला झाल्यामुळे बहुतेक विरोधकांची वाचाच बसली होती, पण या अपघातानंतर त्यांना कंठ फुटल्याचे दिसून येते. अपघाताबद्दल दु:ख अवश्य व्यक्त करा, पण असे अनेक पायाभूत प्रकल्प जर आपल्या राजवटीत साकारले असते, तर आज ज्या अडचणी उद्भवत आहेत त्या उद्भवल्याच नसत्या, हे त्यांनी मान्य करायला हवे. विशेषत: पर्वरीतील मुख्य रस्त्यालगत जर बांधकामे साकारली नसती, तर या उड्डाणपुलाची गरजच निर्माण झाली नसती हे वास्तव आहे. केवळ पर्वरीच नव्हे, तर राज्यातील अनेक मुख्य रस्त्यांलगत बहुमजली इमारती साकारल्याने अशा विकास प्रकल्पांसाठी त्या अडसर ठरत आहेत. हेच लोक अशा प्रकल्पांबाबत लोकांची दिशाभूल करताना वा त्यांना चिथावताना दिसत आहेत. पर्वरीतील त्या अपघातात दोन बळी गेल्याने लोकांमध्ये संतापाची भावना निर्माण होणे स्वाभाविकच आहे व त्यातूनच या पुलावरील वाहतुकीवर निर्बंध घातले गेले, तेही साहजिकच होते. पण त्या निर्बंधांचे अनेकांनी राजकारण केल्याचे गेला आठवडाभर समाजमाध्यमावरून दिसून येत आहे. या निर्बंधांमुळे सर्व्हिस रस्त्यावर पुन्हा वाहनांची वर्दळ वाढल्याचीही काहींची तक्रार आहे.

गोव्यात प्रत्येक नव्या व्यवस्थेबाबत सुरुवातीला असाच आरडाओरडा असतो, कारण नवा बदल वा व्यवस्था ही पचनी पडायला थोडा वेळ जात असतोच. काहींनी तर पर्वरीवासीयांना या उड्डाणपुलावर प्रवेश नसेल, तर त्याचा उपयोग तो काय, असा सवाल केलेला पहायला मिळते. वास्तविक या पुलाचा जो अव्यापारेषु व्यापार केला गेला आहे, तो पर्वरीतील सावळागोंधळ दूर करण्यासाठीच. पूर्वी प्रचंड आकाराच्या मालमोटारी, टँकर, लांबलचक कंटेनर यांच्यामुळे रस्त्यावर ज्या प्रचंड रांगा लागून गोंधळ होत होता, तो आता उड्डाणपुलावरून वाहने थेट जाऊ लागल्याने वाहतूक सुरळित झाली आहे, हे मान्य करावेच लागेल, म्हणूनच सांगावेसे वाटते की हा उड्डाणपूल पर्वरीतील रहिवाशांच्या वापरासाठी नव्हता, तर त्यांची रोजची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी होता व ती गैरसोय दूर झाल्याचे गेल्या काही दिवसात जाणवतही आहे. ती पूर्णत: दूर होण्यासाठी आणखी काही दिवस जावे लागतील. तोपर्यंत प्रत्येकाला थोडी कळ सोसावी लागेल. जुवारी पूल पूर्ण झाल्यानंतर आगशी - कुठ्ठाळी भागात आज जो सुसह्यपणा आला आहे त्यावरून ते दिसून येईल. गेल्या आठवड्यातील अपघातानंतर पर्वरी उड्डाणपुलावर घातलेले निर्बंध हे तात्पुरते आहेत, आता तर नागपूर आयआयएमच्या तज्ज्ञांनी या प्रकल्पाचा अभ्यास सुरू केलेला असून त्रुटी लवकर दूर करण्याचे जाहीर केलेले आहे. त्यापूर्वी राज्य सरकारनेही अनेक उपाय घेतले आहेत, त्यामुळे या पथकाने केलेल्या शिफारसींची त्वरित अंमलबजावणी होणे स्वाभाविकच आहे. पण त्यानेही भागणार नाही. वाहन चालकाने संयम पाळला, वेगावर नियंत्रण ठेवले तर बहुतेक अपघात टळतील. काही दिवसांमागे सांकवाळ परिसरात अंतर्गत रस्त्यावर एका मर्सिडीसला झालेला अपघात व त्यात एका तरुणाचा गेलेला बळी गोव्यातील एकंदर रस्ताअपघातांचे बेसूर चित्र दाखवून देतो. खरे म्हणजे वाढते अपघात टाळणे ही आता सामूहिक जबाबदारी मानावी लागेल. वाहन चालक, सरकारी यंत्रणा, चांगले रस्ते या सर्वांवर ती जबाबदारी येते. केवळ रस्ते वा पुलांना दोष देऊन चालणार नाही. पर्वरी उड्डाण पुलावर झालेल्या त्या अपघाताचा म्हणूनच सर्व बाजूंनी अभ्यास होण्याची गरज आहे.

ऐकलंत का?



रामाचे नाव घेतल्यावर सपाला जितका त्रास व्हायचा, तितकाच बाबरलाही होत होता. बाबरच्या अनुयायांना उत्तर केवळ बजरंगबलीच देऊ शकतात.
- योगी आदित्यनाथ, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री



आम्ही निस्वार्थ मनाने काम करत आहोत. पण असे असताना देखील आमचे आलिशान आणि चांगले आयुष्य लोकांना का खटकत आहे? आम्ही चांगले आयुष्य जगू शकत नाही का?
- कंगना राणावत, भाजप खासदार



जातीआधारित भेदभाव आणि अस्पृश्यता हा हिंदू समाजावरील कलंक आहे. हा भेदभाव कायदे, प्रवचनांनी संपवता येणार नाही, त्यासाठी वैयक्तिक वर्तनात बदल केला पाहिजे.
- दत्तात्रय होसबळे, आरएसएसचे महासचिव



एखादा अधिकारी वेळेवर आणि प्रामाणिकपणे काम करत असेल, तर आनंदाने सन्मान म्हणून त्याला काही देणे चुकीचे नाही.
- के. एम. शिवलिंगेगौडा, कर्नाटकचे मंत्री

राज्यरंग | हिमाचल प्रदेश

किशाऊ प्रकल्पाचा रखडलेला मार्ग सुकर

प्रसन्ना कोचरेकर

नवी दिल्ली येथे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, दिल्ली, हरियाणा आणि राजस्थान या सहा राज्यांमध्ये किशाऊ बहुउद्देशीय धरण प्रकल्पासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या झाल्याने यमुना खोऱ्यातील महत्त्वाकांक्षी जलप्रकल्पाचा मार्ग मोकळा झाला आहे. आंतरराज्यीय पाणीवाटप आणि प्रकल्पाच्या आर्थिक व्यवस्थापनाबाबत झालेल्या या सहमतीचा फायदा सहाही राज्यांना होणार असून, हिमाचल प्रदेशासाठीही हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे.

हिमाचल प्रदेशातील सिरमौर आणि उत्तराखंडातील देहरादून जिल्ह्यांच्या सीमेवर टोंस नदीवर किशाऊ धरण उभारण्यात येणार आहे. सुमारे २३२.६ मीटर उंचीचे कॉंक्रिट ग्रॅव्हिटी धरण बांधण्यात येणार असून, त्याची पाणी साठवण क्षमता १,५६२ दशलक्ष घनमीटर इतकी असेल. प्रकल्पातून सुमारे ६६० मेगावॅट जलविद्युत निर्मिती होणार आहे. त्याचबरोबर ९७ हजार हेक्टरहून अधिक कृषी क्षेत्राला सिंचनाची सुविधा उपलब्ध



होण्याची अपेक्षा आहे. या प्रकल्पाच्या जलघटकाच्या खर्चापैकी ९० टक्के खर्च केंद्र सरकार करणार आहे. उर्वरित १० टक्के खर्च उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, दिल्ली, हरियाणा आणि राजस्थान ही सहा राज्ये उचलणार आहेत. त्यामुळे जलघटकाच्या खर्चाचा अतिरिक्त आर्थिक भार हिमाचल प्रदेशावर मोठ्या प्रमाणात पडणार नाही. प्रकल्पातून दिल्ली, राजस्थान आणि उत्तर प्रदेशला पिण्यासाठी तसेच औद्योगिक वापरासाठी पाणी उपलब्ध होणार आहे. किशाऊ प्रकल्पातील एकूण १,४७६ दशलक्ष युनिट वीज निर्मितीपैकी ५० टक्के वीज उत्तराखंडला मिळणार आहे. हिमाचल प्रदेशासाठीही प्रकल्पाच्या पाणीवाटप आणि वीज घटकाशी संबंधित आर्थिक व्यवस्थेमुळे महत्त्वाचे फायदे होणार आहेत. जलवाटपाच्या सूत्रानुसार हिमाचल प्रदेशाच्या जलहिस्स्याचे वाटप दिल्ली आणि राजस्थानला करण्यात येणार आहे. त्याबदल्यात दिल्ली व राजस्थान हिमाचल प्रदेशाच्या वीज घटकातील हिस्स्याचा खर्च उचलणार आहेत. त्यामुळे प्रकल्पाच्या आर्थिक रचनेत हिमाचल प्रदेशाचा सहभाग आणि त्याला मिळणारा लाभ यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. किशाऊ प्रकल्पामुळे यमुना नदीच्या खोऱ्यात स्वच्छ पाण्याचा प्रवाह वाढण्यासही मदत होण्याची अपेक्षा आहे. यामुळे यमुना नदीच्या स्वच्छतेबरोबरच संबंधित राज्यांच्या दीर्घकालीन जलसुरक्षेला हातभार लागणार आहे.

टोंस ही यमुना नदीची सर्वांत लांब हिमालयीन उपनदी आहे. हिमाचल प्रदेशातील सिरमौर परिसरातून सुमारे १५० किलोमीटर प्रवाहित झाल्यानंतर कालसीजवळ ती यमुनेला मिळते. जौनसार भागात टोंस नदी उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेश यांच्यातील नैसर्गिक सीमाही ठरते.

किशाऊ धरण प्रकल्पासाठी हिमाचल प्रदेशाला अनेक दशकांपासून प्रतीक्षा होती. आता सहा राज्यांमध्ये झालेल्या सामंजस्यामुळे या प्रकल्पाच्या अंमलबजावणीला गती मिळण्याची शक्यता आहे.

वाचक पत्रे

जगाचा खरा आकार दर्शवणारा नकाशा येणार!

आपण शाळेपासून जो जगाचा नकाशा पाहत आलो आहोत, तो प्रत्यक्षात जगाचे हुबेहूब चित्र दाखवत नाही, असे म्हणणे मांडणाऱ्या नायजेरियन वंशाच्या केनियन कार्यकर्त्या २८ वर्षीय अबिम्बोला ओगुंडायरो यांनी सध्या संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार पारंपरिक मर्केटर प्रक्षेपणावर आधारित जगाच्या नकाशांमध्ये आफ्रिका खंडापेक्षा (क्षेत्रफळ ३ कोटी चौरस किमीपेक्षा अधिक) १४ पटीने लहान असलेला ग्रीनलँड (क्षेत्रफळ २१ लाख चौरस किमी) हा आफ्रिका खंडाएवढा किंवा त्याहूनही मोठा दाखवला जातो. मर्केटर नकाशामुळे आफ्रिकेतील गरीब देशांच्या तुलनेत युरोपमधील श्रीमंत आणि प्रभावशाली प्रदेश खूप मोठे दिसतात. तसेच युरोप आणि उत्तर अमेरिका खंडाचा आकारही दक्षिण गोलार्धातील आफ्रिका आणि दक्षिण अमेरिकेसारख्या खंडांपेक्षा प्रमाणाबाहेर मोठा दिसतो. वास्तविक पाहता आफ्रिका खंडात संपूर्ण अमेरिका, चीन, भारत आणि बहुतांश युरोप एकाच वेळी सामावू शकतात, इतका तो विशाल आहे. यासाठीच अबिम्बोला ओगुंडायरो यांनी 'आफ्रिका नो फिल्टर' या संस्थेच्या माध्यमातून 'करेक्ट द मॅप' ही मोहीम सुरू केली आणि मर्केटर नकाशाऐवजी सर्व खंडांचा अचूक आणि वास्तविक आकार असलेला 'इक्वल अर्थ प्रोजेक्शन' नावाचा नकाशा वापरण्याचे आवाहन केले. विशेष म्हणजे ४ सप्टेंबर २०२६ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने १६४ विरुद्ध १ अशा बहुमताने आफ्रिकेचा खरा आकार दर्शवणारा नवीन जगाचा नकाशा स्वीकारण्याचा ठराव मंजूर केला आहे. एका २८ वर्षीय आफ्रिकन तरुणीच्या 'जागतिक नकाशा दुरुस्त करा' या मोहिमेला लाभलेले यश निश्चितपणे कौतुकास्पद आहे.
- प्रदीप मोरे, ९७७३७२७२५९

जपानकडून प्रेरणा घेऊया, न्यूनगंड नको!

जपान म्हटले की स्वच्छता, शिस्त, राष्ट्रप्रेम, तंत्रज्ञान, वेळेचे भान आणि अचूक नियोजन यांचे उदाहरण भारतीयांसमोर दिले जाते. अनेकदा या गुणांचे इतके कौतुक केले जाते की, भारतीयांनी आपल्याकडे पाहताना न्यूनगंड बाळगावा, अशी परिस्थिती निर्माण होते. मात्र सध्या जपानमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धांच्या आयोजनातील त्रुटींमुळे जपानची 'परिपूर्ण नियोजन आणि व्यवस्थापनाचा आदर्श' ही प्रतिमा तितकीशी वास्तव नसल्याचे समोर आले आहे.

या स्पर्धेसाठी आलेल्या काही खेळाडूंना विमानतळावर अनेक तास अन्न-पाण्याविना ताटकळत राहावे लागले, काही खेळाडूंना अपुऱ्या आकाराच्या निवासव्यवस्थेचा सामना करावा लागला, सरावासाठी वाहतुकीच्या अडचणी निर्माण झाल्या आणि दक्षिण कोरिया–बांगलादेश हॉकी सामन्यात दक्षिण कोरियाऐवजी उत्तर कोरियाचे राष्ट्रगीत वाजवण्यात आले. म्हणजेच ज्या देशाला चोख नियोजन आणि अचूक व्यवस्थापनाचा आदर्श म्हणून मांडले जाते, तेथेही मोठ्या आयोजनात गंभीर त्रुटी होऊ शकतात.

यातून भारतीयांनी जपानची टिंगल करण्याऐवजी एक महत्त्वाचा धडा घ्यावा. कोणताही देश परिपूर्ण नसतो. तसेच 'जपानी लोक शिस्तप्रिय, आपण मात्र बेशिस्त', असा न्यूनगंड बाळगण्याचे कारण नाही. जपानच्या चांगल्या सवयी नक्की शिकूया; पण त्या आपल्यालाही अंगीकारता येतात, हा आत्मविश्वास ठेवूया. स्वच्छता, शिस्त, वेळेचे भान आणि सार्वजनिक जबाबदारी या कोणत्याही देशाच्या मक्तेदारीच्या गोष्टी नाहीत. त्या प्रत्येक भारतीयाच्या कृतीतून निर्माण होऊ शकतात. जपानकडून प्रेरणा घेऊया; पण स्वत:ला कमी समजून नव्हे, तर स्वत:ला अधिक चांगले घडवण्याच्या आत्मविश्वासाने!
- अनिकेत शेटे, पुणे

मुद्रक व प्रकाशक सागर लादे यांनी प्रुडंट मीडिया (गोवा) प्रा. लि. यांच्यातर्फे हे पत्र एलिगंट ऑफसेट, थिवी औद्योगिक वसाहत करासवाडा म्हापसा येथे **मुद्रित** करुन दुसरा मजला, फोर्थ इस्टेट (कामत मेट्रोपॉलीस) सांत इनेज, पणजी, गोवा. येथे **प्रकाशित** केले.

संपादक : **पांडुरंग गांवकर** (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी) सर्व हक्क सुरक्षित.
संपादकीय कार्यालय : दुसरा मजला, फोर्थ इस्टेट (कामत मेट्रोपॉलीस) सांत इनेज, पणजी, गोवा. **वृत्तविभाग :** ०८३२-२४०५९५०, **फॅक्स :** ०८३२-२४०५९५२, **ईमेल** : news.varta@thegoan.net, goanvarta@gmail.com **सावंतवाडी कार्यालय :** दै. कोकणसाद, हरिप्रिया अपार्टमेंट, एस.टी. बसस्थानकानजीक, मेन रोड, सावंतवाडी. **संपर्क :** ०२३६३२७२१९१, ९४२३३२११२६

सूचना : संपादकीय वगळता सर्व स्तंभ, वाचकांची पत्रे, लेख ही त्या त्या लेखकांची मते आहेत. दै. गोवन वार्ताचे संपादक, प्रकाशक आणि मालक यांची नव्हे. **वितरण चौकशी :** (०८३२) २४९०४०४, **ईमेल :** circulation@thegoan.net **जाहिरातविषयक चौकशी :** (०८३२) २४०५९८८ **ईमेल :** advertising@thegoan.net

थोडक्यात

आसोलीतील श्री देव नारायणाच्या भागवत सप्ताहाला सुरुवात

गोवन वार्ता ■ वेंगुर्ले : आसोली गावचे ग्रामदैवत श्री देव नारायणाचा वार्षिक अखंड हरिनाम भागवत सप्ताहारंभ २० सप्टेंबरपासून सुरू झाला आहे. या सप्ताहाला शेजारच्या गावांसह गोव्यातील असंख्य भाविक उपस्थिती लावतात. सप्ताह कालावधीत आसोली दशक्रोशीतील आरवली, सोन्सुरे, मोचेमाड, अणसूर, उभादांडा, गोडावणे, पाल, भेंडमळा, केपादेवी, तुळस, मातोंड, शिरोडा, आजगाव, फणसखोल, रेडी, सखैलेखोल, सागरतीर्थ, टेंबवाडी, टांक येथील भजनी मंडळे आपापली भजने सादर करतात. २६ रोजी दिंडीचा कार्यक्रम होणार आहे तर २७ रोजी दहीकाल्याने सप्ताहाची सांगता होणार आहे.



हरमल सार्वजनिक गणेशोत्सवात आज नाटक

गोवन वार्ता ■ हरमल : येथील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या ३३व्या उत्सवानिमित्त २२ रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सायं. ७.३० वा. गणेशोत्सव सभागृहात 'छू मंतर' या नाटकाचा प्रयोग होणार आहे. मंडळाचे अध्यक्ष अर्जुन गडेकर व कार्यक्रम समिती अध्यक्ष प्रदीप नाईक यांनी ही माहिती दिली. सकाळी १० वा. शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांना विनय गडेकर, अमित नाईक, संदीप नाईक आणि स्मृतिचिन्ह सहेली इंटरप्रायझेस यांचे सहकार्य लाभले आहे. सायं. ४ वा. सवेष अभिनय नाट्यगीत सादरीकरणाचा कार्यक्रम होणार आहे. यात गायक सूरज शेटगावकर, श्रद्धा जोशी आणि शारदा आरोंदेकर सहभागी होणार आहेत. त्यांना शिवानंद दाभोलकर व नितीन कोरगावकर साथसंगत करणार असून, परेश नाईक निवेदन करणार आहेत.

नागरिक संतप्त : आरोग्य खात्यासह पंचायतीकडे कारवाईची मागणी

मोरजीत हॉटेलचे सांडपाणी थेट ओहोळातून समुद्रात

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
पेडणे

मोरजी पंचायत क्षेत्रातील विठ्ठल-दासवाडा किनारी भागात काही हॉटेल्स, रिसॉर्ट्स आणि गेस्ट हाऊसमधील सांडपाणी पाईपद्वारे थेट ओहोळात तसेच समुद्रात सोडले जात असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. यामुळे समुद्रकिनाऱ्यावर प्रदूषण होण्या-बरोबरच स्थानिक आणि पर्यट-कांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. प्रशासनाने या प्रकाराची तातडीने पाहणी करून दोषी आस्थापनांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांक-डून केली जात आहे.

मोरजी समुद्रकिनारी भागात पर्यटन व्यवसायाचा झपाट्याने विस्तार होत आहे. येथे अनेक लहान-मोठी हॉटेल्स, रिसॉर्ट्स आणि गेस्ट हाऊसेस कार्यरत आहेत. पर्यटन हंगामात हंगामी स्वरूपाची, तसेच काही ठिकाणी कायमस्वरूपी बांधकामेही उभी राहत आहेत. काही आस्था-पनांच्या मालकांनी निर्माण होणाऱ्या सांडपाण्याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी आवश्यक व्यवस्था केली नसल्याचा आरोप आहे. काही व्यावसायिकांकडून सांडपाणी पाईपद्वारे थेट ओहोळात सोडले जाते आणि ते पुढे समुद्रात मिसळते, असे स्थानिकांनी सांगितले.

याबाबत संबंधित यंत्रणांकडे वारंवार तक्रारी करूनही अद्याप ठोस कारवाई करण्यात आली नसून मोरजी पंचायत, आरोग्य खाते, प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि संबंधित खात्यांनी संयुक्त पाहणी करून सांडपाणी निचऱ्याची व्यवस्था तपासावी, अशी मागणी होत आहे.



थेट समुद्रात सांडपाणी सोडल्यामुळे प्रदुषित झालेले पाणी.

आरोग्यासह पर्यावरणावर विपरीत परिणाम

उघड्यावर तसेच ओहोळात सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून डास व माशांचा प्रादुर्भाव वाढला आहे. यामुळे भूजल आणि समुद्राचे पाणी दूषित होऊन संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. याचा स्थानिक रहिवासी, पर्यटक, मच्छीमार आणि समुद्रकिनाऱ्याच्या पर्यावरणावरही अत्यंत विपरीत परिणाम होऊ शकतो.

दाबोळी-बोगमाळो चौक ते परुळेकर इस्पितळादरम्यान वाहतुकीची कोंडी

रस्त्यावर दुतर्फा वाहने उभी करण्यात येत असल्याने गैरसोय

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
वास्को

दाबोळी-बोगमाळो चौक ते परुळेकर नेत्रचिकित्सा इस्पितळ दरम्यान-च्या रस्त्यावर दुतर्फा वाहने उभी करण्यात येत असल्याने त्याठिकाणी वाहतूक कोंडी होण्याचे प्रकार होत आहेत. वाहतूक पोलीस समस्या दूर करण्यासाठी दुर्लक्ष करीत असल्याने वाहनचालकांमध्ये विविध प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

दाबोळी-बोगमाळो चौकातून व्होळांत, चिकोळणा, बोगमाळो तसेच इतर परिसरात जाणाऱ्या वाहनांची संख्या मोठी आहे. परिसरात उड्डाण पुलाचे काम सुरू असल्याने बांधकाम साहित्याची वाहतूक करणाऱ्या अवजड वाहनांची या मार्गावर सतत ये-जा सुरू आहे. चिकोळणातील मोकळ्या जागेत मोठ्या प्रमाणात खडी साठविण्यात आल्याने ती आणण्यासाठी व नेण्यासाठीही अवजड वाहने या मार्गाचा वापर करतात. त्यामुळे रस्ता मोकळा ठेवणे आवश्यक आहे.

यापूर्वी तत्कालीन वाहतूक पोलीस निरीक्षक नार्वेकर यांनी या समस्येची दखल घेत चारचाकी वाहने उभी करण्यास प्रतिबंध केला होता. त्यामुळे काही काळ वाहतूक सुरळीत झाली होती. मात्र, आता पुन्हा बेशिस्त पार्किंगचे प्रकार वाढले आहेत. काही वाहने दीर्घकाळ उभी असल्याने त्यावर धुळीचा थरही जमा झाला आहे. वाहतूक कोंडीची दखल घेऊन संबंधित यंत्रणेने या मार्गावरील पार्किंगला शिस्त लावावी, अशी मागणी वाहनचालकांकडून होत आहे.



रस्त्यावरच वाहने उभी केल्याने वाहतूक कोंडीत अडकलेली इतर वाहने.

बेशिस्त पार्किंगमुळे कोंडी

दाबोळी-बोगमाळो चौक ते परुळेकर इस्पितळादरम्यान दुचाकी आणि चारचाकी वाहने दुतर्फा उभी केली जातात. शिस्तबद्ध पार्किंगमुळे फारसा अडथळा निर्माण होत नसला, तरी उभ्या वाहनांच्या समोरच अन्य वाहने उभी केल्याने रस्ता अडविला जातो. संबंधित वाहनचालक परत येईपर्यंत इतर वाहने कोंडीत नाहक अडकून पडतात.

कोकण रेल्वेच्या सर्व स्थानकांवरील पाणी पिण्यायोग्य!

वैद्यकीय अधिकाऱ्यांची माहिती : विशेष तपासणी पूर्ण

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
मडगाव

उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोकणात येणाऱ्या लाखो भाविक आणि प्रवाशांच्या आरोग्याची खबरदारी घेत कोकण रेल्वे प्रशासनाने सर्व रेल्वे स्थानकांवरील पिण्याच्या पाण्याची विशेष तपासणी मोहीम पूर्ण केली आहे. या तपासणीत स्थानकांवर उपलब्ध करून देण्यात येणारे पाणी सुरक्षित आणि पिण्यायोग्य असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

गणेशोत्सवात प्रवाशांची वाढणारी गर्दी लक्षात घेऊन स्थानकांवरील पाणीपुरवठा व्यवस्थेची विशेष काळजी घेण्यात आली. त्याअंत-र्गत पाण्याच्या साठवण टाक्यांची स्वच्छता करून नियमित क्लोरीनेशन करण्यात आले. प्रवाशांना स्वच्छ व थंड पाणी मिळावे यासाठी वॉटर कूलरची सर्किट्स आणि टाक्यांचीही स्वच्छता करून आवश्यक दुरुस्ती करण्यात आली.

गरज असलेल्या स्थानकांवरील जुन्या व नादुरुस्त पाण्याच्या टाक्या बदलून नवीन टाक्या बसवण्यात आल्या. तसेच कोकण रेल्वेच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पथकाने विविध स्थानकांना भेट देऊन पाण्याचे नमुने घेतले. या नमुन्यांची प्रयोगशा-ळेत तपासणी करण्यात आली असून, पाणी पिण्यास सुरक्षित असल्याचे निष्पन्न झाले.



रेल्वे स्थानकावरील पिण्याच्या पाण्याची तपासणी करताना वैद्यकीय अधिकारी.

कुंकळ्ळीत महामार्गालगतच्या सदोष पदपथाची सुरक्षा समितीकडून पाहणी

अपघाताचा धोका वाढल्याने नागरिकांच्या तक्रारी

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
मडगाव

राष्ट्रीय महामार्ग ६६ लगत कुंकळ्ळी परिसरात नव्याने उभारण्यात आलेल्या सदोष पदपथांमुळे पादचाऱ्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर दक्षिण गोवा जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या पथकाने सोमवारी संबंधित भागाची प्रत्यक्ष संयुक्त पाहणी केली.

या पदपथांचे बांधकाम तांत्रिक-दृष्ट्या योग्य नसल्याने पादचाऱ्यांना सुरक्षितपणे चालण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध होत नसल्याच्या तक्रारी करण्यात आल्या होत्या. काही ठिकाणी पदपथांची उंची अयोग्य असून रुंदीही अनियमित आहे. या चुकीच्या रचनेमुळे पादचाऱ्यांना पदपथाऐवजी थेट महामार्गाच्या कडेने चालावे लागत असून, त्यामुळे अपघाताचा मोठा धोका निर्माण झाला आहे.

या संयुक्त पाहणीमध्ये सार्वजनिक बांधकाम खात्याचे साहाय्यक अभियंता जेरी वाझ, 'गोवा कॅन'च्या सचिव लॉर्ना फर्नांडिस आणि वाहतूक पोलीस निरीक्षक संजय दळवी यांच्यासह संबंधित शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

या पाहणीचा अहवाल तयार करून आवश्यक दुरुस्ती व तांत्रिक सुधारणांसाठी तो प्रशासनाकडे सादर केला जाणार आहे. त्यामुळे कुंकळ्ळीतील महामार्गालगतच्या पदपथांच्या सुरक्षिततेबाबत प्रशासन आता कोणती ठोस कार्यवाही करते, याकडे स्थानिकांचे लक्ष लागले आहे.



सदोष पदपथाची पाहणी करताना द. गोवा जिल्हा रस्ता सुरक्षा समिती पथक.

सुधारणा करण्याची मागणी

पाहणीदरम्यान पदपथांची उंची, रुंदी, रचना तसेच महामार्गावरील वाहतुकीच्या दृष्टीने पादचाऱ्यांची सुरक्षितता यांची सखोल तपासणी करण्यात आली. रस्ता सुरक्षेच्या सर्व निकषांनुसार या पदपथांमध्ये तातडीने आवश्यक त्या दुरुस्त्या व सुधारणा करण्यात याव्यात, अशी मागणी यावेळी उपस्थित प्रतिनिधींकडून करण्यात आली.

गौरवी गावसच्या 'म्हजीं शब्द फुलां' कोकणी निबंध संग्रहाचे प्रकाशन

गोवन वार्ता ■ न्यूज डेस्क
साखळी

चौथीच्या वर्गात शिकणाऱ्या १० वर्षांच्या गौरवी गोपिनाथ गावस हिच्या 'म्हजीं शब्द फुलां' या पहिल्या कोकणी निबंधसंग्रहाचे प्रकाशन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत आणि पद्मिनी फाऊंडेशनच्या अध्यक्षा सुलक्षणा सावंत यांच्या हस्ते कोठंबी-पाळी येथे झाले.'म्हजीं शब्द फुलां'मध्ये गौरवीने एकूण २९ निबंध लिहिले आहेत. गावातील सण-उत्सव, शाळेतील अनुभव, कुटुंब, परिसरातील भ्रमंती आणि दैनंदिन जीवनातील विविध विषय तिने बालसुलभ भाषेत मांडले आहेत. इयत्ता तिसरीपासून तिने लेखनाला सुरुवात केली. विशेष म्हणजे, तिने आधी वहीत निबंध लिहून नंतर स्वत: लॅपटॉपवर देवनागरी लिपीत त्याचे टंकलेखन केले.

मुख्यमंत्र्यांनी गौरवीचे कौतुक करत, 'असेच आता आणखी लिहित जा', असे प्रोत्साहन दिले. तिच्या लेखनाला आई गायत्री व वडील गोपिनाथ गावस यांचे सहकार्य लाभले आहे. यावेळी साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक डॉ. प्रकाश पर्येकर, प्रा. खुशाली प्रभू, साहित्यमंथन सत्तरीचे अध्यक्ष गोपिनाथ गावस आणि पुस्तकाचे मुखपृष्ठ निर्माते जयराम परब उपस्थित होते.



गौरवी गावस हिच्या पुस्तक प्रकाशनप्रसंगी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत. सोबत सुलक्षणा सावंत, डॉ. प्रकाश पर्येकर व इतर.

'आस्वाद'मध्ये यंदा रंगणार चित्रपटांवर गप्पांची मैफल

गोमंत विद्या निकेतनतर्फे २४ रोजी आयोजन

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
मडगाव

गोमंत विद्या निकेतन येथे 'आस्वाद' या उपक्रमाच्या पुढील सत्राचे आयोजन २४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता फोमेंतो ॲम्फिथिएटर येथे करण्यात आले आहे. या आगामी सत्रासाठी 'माझा आवडता चित्रपट' हा विषय निश्चित करण्यात आला असून, यामध्ये विविध चित्रपटांवर रसिकांचा मुक्त संवाद रंगणार आहे.

'आस्वाद' हा साहित्य, कला आणि संस्कृतीच्या विविध माध्यमांचा अनुभव घेण्यासाठी तसेच त्यावर मुक्त चर्चा करण्यासाठी आयोजित केला जाणारा उपक्रम आहे. या सत्रात सहभागी रसिक आपल्या मनापासून आवडलेल्या चित्रपटांविषयी संवाद साधणार असून, त्या चित्रपटाने आपल्याला का भावले, त्याने काय दिले याविषयी विचार मांडणार आहेत. चित्रपटाचा प्रकार, निर्मितीचा काळ किंवा भाषा याचे कोणतेही बंधन ठेवण्यात आलेले नाही. व्यावसायिक चित्रपट असो, कलात्मक चित्रपट असो, लघुपट असो किंवा एखादी दुर्लक्षित पण मनाजवळची कलाकृती असो; प्रत्येकाचा वैयक्तिक आस्वाद केंद्रस्थानी ठेवून ही चर्चा रंगणार आहे. चित्रपटप्रेमींनी आपल्या आवडत्या चित्रपटासह या अनौपचारिक आणि मुक्त संवादात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

उगवे येथे उद्या नामवंत कलाकारांचे भजन

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
पेडणे

उगवे-पेडणे येथील देवी माऊली मंदिरात सुरू असलेल्या अखंड भजनी सप्ताहानिमित्त २३ रोजी रात्री ९.३० वाजता गोव्यातील नामवंत कलाकारांचा भजनी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात शुभम नाईक, गितेश इंफाळकर आणि रोहित गावस भक्तिरसपूर्ण भजने सादर करणार आहेत. त्यांना प्रतीक देसाई (पखवाज) आणि अमोल गावस (हार्मोनियम) यांची संगीत साथ लाभणार आहे. या भजनी सप्ताहानिमित्त मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, या भजनी कार्यक्रमाचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिर समितीतर्फे करण्यात आले आहे.

गोकर्ण पर्तगाळ मठात उद्या 'शब्दसुरांचे देणे'

चातुर्मास सेवेनिमित्त विशेष आयोजन

गोवन वार्ता ■ न्यूज डेस्क
पणजी

श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळ जीवोत्तम मठात चातुर्मास सेवेनिमित्त बुधवार, २३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता 'अंतर्नाद क्रियेशन्स' निर्मित 'शब्दसुरांचे देणे' या विशेष संगीत मैफलीचे आयोजन करण्यात आले आहे. मठाच्या मध्वनारायण मंडपात ही सुरेल मैफल रंगणार असून, यामध्ये भावगीते, भक्तीगीते, नाट्यगीते आणि लोकप्रिय चित्रपट गीतांचा समावेश असणार आहे.

या मैफलीत गोवन आयडॉल गौतमी हेदे बांबोळकर आणि सुप्रसिद्ध युवा गायक ओंकार च्यारी आपल्या सुमधुर गायनाने रसिकांना मंत्रमुग्ध करणार आहेत. या गायक कलाकारांना यतीन तळावलीकर (तबला), बाळकृष्ण मेस्त (सिंथेसायझर), आकाश जल्मी (हार्मोनियम), केदार धामस्कर (पखवाज) आणि सुमुख केणी (तालवाद्य) हे वाद्यवृंद साथसंगत करणार आहेत.

या कार्यक्रमाचे संगीत संयोजन यतीन तळावलीकर यांनी केले असून, निवेदक म्हणून प्रदीप पंडित हे कार्यक्रमाची सूत्रे सांभाळणार आहेत. संगीतप्रेमी, रसिक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सुरेल मैफलीचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

बाणावलीतील फुटबॉल क्लबना दरवर्षी १ लाखांची मदत

आमदार व्हेंझी व्हिएगस यांची घोषणा : युवा खेळाडूंना प्रोत्साहन देण्यावर भर

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
मडगाव

बाणावली मतदारसंघातील फुटबॉल खेळाला चालना देण्याबरोबरच युवा खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी मतदारसंघातील सर्व नोंदणीकृत फुटबॉल क्लबना दरवर्षी १ लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यात येणार असल्याची घोषणा आमदार व्हेंझी व्हिएगस यांनी केली. दांडो मैदानावर आयोजित होली ट्रिनिटी ट्रॉफी फुटबॉल स्पर्धेदरम्यान ते बोलत होते.

गोवा फुटबॉल असोसिएशनकडे नोंदणीकृत असलेल्या बाणावली मतदारसंघातील सर्व फुटबॉल क्लबना आमदार निधीतून हे आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. दरवर्षी या निधीचे वितरण केले जाणार असून, क्लबच्या क्रीडा उपक्रमांना त्यातून आर्थिक पाठबळ मिळणार आहे.

युवा खेळाडूंच्या विकासासाठी केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष कृतीला महत्त्व दिले जात असल्याचे व्हिएगस यांनी सांगितले. वार्षिक आर्थिक सहाय्यामुळे बाणावलीतील फुटबॉल क्लबना त्यांच्या क्रीडा उपक्रमांना अधिक प्रभावीपणे चालना देता येणार असून, त्याचा स्थानिक युवा खेळाडूंना फायदा होण्याची अपेक्षा आहे.

स्थानिक खेळाडूंना दर्जेदार सुविधा

स्थानिक पातळीवर फुटबॉलला अधिक चालना देणे, युवा खेळाडूंना प्रोत्साहन देणे आणि क्लबना आवश्यक आर्थिक मदत उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे व्हिएगस यांनी सांगितले. बाणावलीत साकारण्यात आलेल्या अद्ययावत कोलवा फुटसाल मैदानाचाही त्यांनी यावेळी उल्लेख केला. स्थानिक खेळाडूंना त्यांच्या गावांमध्येच दर्जेदार क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

वीज खंडित

मडगाव : कुडतरी बँक डीटीसीवर दुरुस्ती काम करायचे असल्याने २३ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते संध्या ५ वाजेपर्यंत कुडतरी बँक भागात वीज पुरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे कुडतरी गोणसोय डीटीसीवर दुरुस्ती काम करायचे असल्याने २४ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते संध्या ५ वाजेपर्यंत कुडतरी गोणसोय भागात वीज पुरवठा केला जाणार नाही.

पणजी : ११ केव्ही धुळापी फिडरवर दुरुस्ती काम करायचे असल्याने २३ रोजी सकाळी ९ ते संध्या ५ वाजेपर्यंत धुळापी मैदान, कुडणेकर, चोपडेकर भागात, पीडीए कॉलनी, रॉयल कोर्टयार्ड, मांगादो, राजदीप, खोर्ली गार्डन, गौरीश परेरा, अझीझ चौहान, सिबा, गॅरेज, विट्टो आइस प्लांट, धाडियर, वलवाडो आणि धुळापी भागात वीज पुरवठा केला जाणार नाही.

उघड्या वीजवाहिन्यांमुळे धोका : कार्यालयाची दुरुस्ती करण्याची मागणी

शिरोडा येथील कदंब बसस्थानकाची स्थिती दयनीय

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
फोंडा

शिरोडा येथील कदंब बसस्थानका-च्या वापरात नसलेल्या कार्यालयाची दुरवस्था झाली असून, कार्यालयाचा मुख्य दरवाजा कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच भिंतीतून बाहेर आलेल्या वीजवाहिन्यांमुळे कर्मचाऱ्यांसह परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. कदंब महामंडळाने तातडीने दखल घेऊन कार्यालयाची दुरुस्ती करावी, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.

गेल्या काही वर्षांपासून कदंब बसस्थानकाचे कार्यालय वापराविना पडून आहे. देखभालीअभावी कार्यालयाचा मुख्य दरवाजा जीर्ण झाला असून, तो जमिनीवर कोसळण्याच्या स्थितीत आहे. त्यामुळे कार्यालयातील कागदपत्रे व इतर साहित्याच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. कार्यालयातील वीजवाहिन्या भिंतीबाहेर आल्या असून, त्यांना अनवधानाने स्पर्श झाल्यास विजेचा धक्का बसण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत दुर्घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण? असा सवाल स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे.

कदंब बसस्थानक गेल्या काही वर्षांपासून वापराविना पडून असून, महामंडळाच्या दुर्लक्षामुळे त्याची अवस्था बिकट झाली आहे. दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येते, अशी टीका काँग्रेस कार्यकर्ते शिवप्रसाद शिरोडकर यांनी केली.

ॲड. रामदास तेमयेकर यांनी सांगितले की, हे बसस्थानक पूर्णवेळ वापरात आणण्याची आवश्यकता आहे. महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे कार्यालयाचा दरवाजा आणि वीजवाहिन्यांची दुरवस्था झाली आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.



शिरोडा येथील कदंब बसस्थानकाच्या कार्यालयाचा मुख्य दरवाजा व भिंतीबाहेर आलेल्या वीजवाहिन्या.

नवे सुलभ शौचालय उद्घाटनाच्या प्रतीक्षेत

शिरोडा येथील कदंब बसस्थानकाजवळ लाखो रुपये खर्चून उभारण्यात आलेले सुलभ शौचालय गेल्या दीड-दोन वर्षांपासून उद्घाटनाच्या प्रतीक्षेत आहे. बांधकाम पूर्ण होऊन वीजजोडणी देण्यात आली असली, तरी अद्याप पाण्याची नळजोडणी झालेली नाही. कदंब बसस्थानकाच्या आवारात आधीच एक शौचालय असताना त्याच्या जवळच नवीन शौचालय उभारण्यात आल्याने नागरिकांकडून प्रश्न उपस्थित होत आहेत. दरम्यान, जुन्या शौचालयाची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून, नवीन शौचालय उद्घाटनानंतर तरी त्याची नियमित देखभाल होणार का, असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे.

स्मृती आठवणी
जाहिरातीसाठी संपर्क :
0832-2405988
84118 59291

बारावा दिवस
स्व. गुरुदास दामोदर आसोलकर
नवेवाडे वास्को गोवा.
आदरणीय आसोलकर भावोजी, ४० वर्षे तुमच्या सान्निध्यात आम्ही होतो, कधीच तुमच्या तोंडुन कुणासही अपशब्द निघाला नाही, शांत, संयमी स्वभाव, उदार व्यक्तिमत्व, मदतकार्यास तत्पर, समजुतदार, तुमची निगर्वी वागणुक आमच्या हृदयात आजन्म राहील. आम्हा सर्वांची तुम्हास साश्रुपुर्ण नयनांनी भावपूर्ण श्रद्धांजली. तुमच्या पवित्र आत्म्यास चिरशांती प्राप्त होवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.
सासु: श्रीमती सुशीला गजानन मोरुडकर.
मेहुणी/साडु: सौ. सुनिता संतोष वायंगणकर. सौ. सरीता वसंत गांवकर. श्रीमती. विणा सुनील अग्रे. मेहुणा/भावजय: सौ. मिलन एकनाथ मोरुडकर. सौ. सुविधा संतोष मोरुडकर. सौ. रिषा विपुल मोरुडकर.
भाचरे: मृदुला, प्राची, सुजय, वरद, वैभवी, सोहम, अमोघ व श्रेयस सडा मुरगांव.

बार्देश तालुक्याला भेडसावतेय भटकी गुरे, कुत्र्यांची समस्या

ठोस तोडगा काढण्यास पंचायतींना अपयश

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
म्हापसा

म्हापसा शहरासह बार्देश तालुक्यात बेवारस गुरे आणि भटक्या कुत्र्यांची समस्या कायम आहे. म्हापसा पालिकेसह तालुक्यातील काही पंचायतींनी भटकी गुरे ताब्यात घेऊन ती ठेवण्यासाठी गोशाळेसोबत करार केलेला आहे. तरीही रस्त्यांवर ठिय्या मारणाऱ्या गुरांची संख्या कमी झालेली नाही.

राष्ट्रीय महामार्ग पर्वरी ते कोलवाळ राष्ट्रीय महामार्ग, करासवाडा ते अस्नोडा राज्य महामार्ग व तालुक्यातील प्रमुख असलेल्या एमडीआर आणि अंतर्गत रस्त्यांवर नेहमीच बेवारस गुरे बसलेली असतात. या गुरांमुळे विशेषत: रात्रीच्यावेळी राष्ट्रीय महामार्ग हा वाहन वाहतुकीला धोक्याचा बनला आहे आणि वारंवार अपघाताच्या घटना घडत आहेत. वाहनांच्या धडकेत अनेक गुरे दगावली गेली असून वाहनांचे नुकसान आणि वाहनस्वारांना दुखापती होण्याचे प्रकार घडले आहेत. हीच स्थिती म्हापसा ते डिचोली हमरस्त्यावर आहे.

पर्वरी, पर्रा, कळंगुट, कांदोळी, हडफडे- नागवा, हणजूण-कायसूव, आसगाव, मार्ना -शिवोली, हळदोणा, बस्तोडा, उसकई, गिरी, सांगोल्डा, साळगाव, सुकूर, पेन्हा दी फ्रान्स, साल्वादोर द मुंद, पिळर्ण, नेरूल, रेईश-मागूश, कोलवाळ, नादोडा, रेवोडा, पिर्ण, सिरसई, थिवी, वेर्ला- काणका, मयडे, नास्नोळा, कामुर्ली, सडये, ओशेल या सर्वच गावांमध्ये आणि म्हापसा शहरात भटकी गुरे तसेच कुत्र्यांची समस्या गंभीर आहे.

रेबीज लसीकरण मोहीम राबवल्यानंतर जागोजागी कुत्र्यांची संख्या वाढते. रात्रीच्यावेळी ही कुत्री विशेषत: दुचाकीस्वारांना मोठी डोकेदुखी ठरत आहेत. मोठ्या प्रमाणात कुत्र्यांचा वाहतुकीला अडथळा तसेच गुरांकडून शेताची नासाडी होत आहे.

समुद्रकिनारी भागात बेवारस गुरांची समस्या जटील

समुद्रकिनारी भागात देखील बेवारस कुत्री तसेच गुरांची समस्या जटील बनलेली आहे. समुद्रकिनारी फेरफटका मारणाऱ्या पर्यटक आणि स्थानिक रहिवाशांसाठी भटकी कुत्री उपद्रवी ठरत आहेत. पर्यटकांना कुत्र्यांकडून चावा घेण्याचे प्रमाणही वाढत आहे.



पर्वरी बायपासवर बसलेली मोकाट गुरे.



मोकाट गुरे, कुत्र्यांचे संकट!

मडगाव, म्हापसा आणि पेडणे तालुक्यांसह गोव्यातील विविध भागांत मोकाट गुरे व भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला आहे. प्रमुख रस्ते, बाजारपेठा आणि किनारपट्टी भागांत गुरे व कुत्र्यांचे कळप दिसत असल्याने वाहनचालक, पादचारी आणि स्थानिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून प्रशासनाच्या उपाययोजनांकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

भटकी कुत्री, पाळीव प्राण्यांचे करणार वॉर्डनिहाय सर्वेक्षण

राज्य सरकारचा उपक्रम : १ ते १५ ऑक्टोबर दरम्यान सर्वेक्षण

गोवन वार्ता ■ न्यूज डेस्क
पणजी

गोव्यात भटक्या प्राण्यांच्या आणि जनावरांच्या व्यवस्थापनासाठी राज्य सरकारने एक मोठे पाऊल उचलले आहे. पशुसंवर्धन आणि पशुवैद्यकीय सेवा संचालनालयाने घेतलेल्या निर्णयानुसार, संपूर्ण गोव्यात वॉर्ड आणि परिसर निहाय भटक्या कुत्र्यांचे, पाळीव कुत्र्यांचे आणि रस्त्यांवर फिरणाऱ्या जनावरांचे सर्वेक्षण केले जाणार आहे. आगामी १ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर या कालावधीत राज्यातील शहरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून ही मोहीम राबवली जाईल.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करत हे राज्यव्यापी सर्वेक्षण हाती घेण्यात आले आहे.

मोहिमेपूर्वी प्रत्येक वॉर्डमधील पशूप्रेमी आणि स्वयंसेवकांना आपापल्या भागातील पंच, नगरसेवक किंवा कॉर्पोरेटर यांच्याशी संपर्क साधून भटके कुत्रे व जनावरांची प्राथमिक माहिती पुरवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

संबंधित वॉर्डचे प्रतिनिधी आणि स्वयंसेवक घरोघरी जाऊन प्रत्यक्ष पाहणी करणार आहेत. यामध्ये प्रत्येक घरातील पाळीव कुत्र्यांची संख्या, त्यांचे लिंग आणि त्यांची नसबंदी झाली आहे की नाही, याची सविस्तर नोंद घेतली जाईल.

महामार्ग आणि रस्त्यांवर आढळणाऱ्या भटक्या जनावरांची माहिती देखील या सर्वेक्षणात समाविष्ट केली जाणार आहे.

प्रशासनाने सर्व नागरिक, विशेषत: प्राण्यांना खाऊ घालणारे स्वयंसेवक आणि पशूप्रेमींना या महत्त्वाच्या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून स्थानिक स्वराज्य संस्थांना अचूक माहिती देण्याचे आवाहन केले आहे. या सर्वेक्षणातून मिळालेल्या अचूक आकडेवारीमुळे भविष्यात प्राण्यांची नसबंदी व इतर नियमन योजना प्रभावीपणे राबविण्यास मदत होणार आहे.

मोरजीसह पेडणे तालुक्यात बेवारस कुत्र्यांचा वाढता उपद्रव

पाळीव प्राण्यांवर हल्ले : नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
पेडणे

मोरजी पंचायत क्षेत्रासह पेडणे तालुक्यात, विशेषत: मांद्रे मतदारसंघातील किनारपट्टी भागात बेवारस कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असून नागरिक आणि पर्यटकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न बनत आहे. रस्ते, बाजारपेठा आणि निवासी परिसरात टोळक्याने फिरणाऱ्या या कुत्र्यांकडून नागरिकांचा पाठलाग करणे, चावा घेणे तसेच पाळीव प्राण्यांवर हल्ले करण्याच्या घटना घडत असल्याने संबंधित यंत्रणांनी तातडीने ठोस उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

मोरजी हा आंतरराष्ट्रीय पर्यटन नकाशावर असलेला किनारी भाग आहे. येथे देशी-विदेशी पर्यटकांची मोठी वर्दळ असते. अनेक पर्यटक तसेच स्थानिक नागरिक भूतदया म्हणून बेवारस कुत्र्यांना अन्न देतात. मुक्या प्राण्यांना अन्न देणे चुकीचे नाही. मात्र, त्याचबरोबर त्यांच्या वाढत्या संख्येचे नियोजन, निर्बीजीकरण, लसीकरण आणि नियंत्रण याकडेही प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.

बेवारस कुत्र्यांकडून एखाद्या नागरिकाला किंवा पर्यटकाला चावा घेतला, अपघात झाला किंवा लहान मुलांवर अथवा पाळीव प्राण्यांवर हल्ला झाला, तर त्याची जबाबदारी नेमकी कोण घेणार, असा प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

मोरजी पंचायत क्षेत्रातील अनेक वाड्यांमध्ये बेवारस कुत्री दिवस-रात्र घरोघरी फिरताना दिसतात. अन्नाच्या शोधात ती घरांच्या परिसरात येतात. रात्री टोळक्याने भुंकणे आणि ओरडणे यामुळे नागरिकांची झोपमोड होत असून काही ठिकाणी पहाटे व रात्री एकट्याने रस्त्यावरून जाणेही धोकादायक वाटत असल्याच्या तक्रारी आहेत.

या समस्येचा सर्वाधिक वेदनादायी भाग म्हणजे पाळीव प्राण्यांवर होणारे हल्ले. आमच्या घरातील पाळीव मांजरांपैकी आतापर्यंत सुमारे १५ मांजरांचा अशा कुत्र्यांच्या हल्ल्यांत बळी गेला आहे. अशा घटना वारंवार घडत असतील तर प्रशासनाने केवळ तक्रारींची वाट न पाहता स्वत:हून परिस्थितीची दखल घेण्याची आवश्यकता आहे.

प्रश्न बेवारस कुत्र्यांना मारण्याचा किंवा त्यांच्याशी क्रूरतेने वागण्याचा नाही. त्यांचे कायद्यानुसार निर्बीजीकरण, रेबीज प्रतिबंधक लसीकरण, संख्या नियंत्रण आणि आवश्यक त्या ठिकाणी सुरक्षित व्यवस्थापन करण्याची गरज आहे. स्थानिक पंचायत, पशुसंवर्धन विभाग आणि संबंधित सरकारी यंत्रणांनी समन्वय साधून मोरजीसह संपूर्ण किनारपट्टी भागात विशेष मोहीम राबवावी.

विशेषत: पर्यटन हंगामात किनारपट्टीवर देशी-विदेशी पर्यटकांची मोठी गर्दी असते. अशावेळी बेवारस कुत्र्यांच्या हल्ल्यात एखादा पर्यटक गंभीर जखमी झाल्यास त्याचा परिणाम पर्यटन क्षेत्राच्या प्रतिमेवरही होऊ शकतो. त्यामुळे हा केवळ प्राणी नियंत्रणाचा विषय नसून नागरिक सुरक्षा, सार्वजनिक आरोग्य आणि पर्यटन व्यवस्थापनाशी संबंधित प्रश्न म्हणून सरकारने त्याकडे पाहणे आवश्यक आहे.

सरकारने मोरजी पंचायत क्षेत्रापासून तातडीने सर्वेक्षण सुरू करून बेवारस कुत्र्यांची गणती करावी, निर्बीजीकरण व लसीकरण मोहीम प्रभावीपणे राबवावी आणि आक्रमक अथवा आजारी श्वानांच्या बाबतीत नियमानुसार आवश्यक कारवाई करावी. स्थानिक नागरिक आणि पर्यटकांना सुरक्षित वातावरण देतानाच मुक्या प्राण्यांशीही मानवीय पद्धतीने वागणारी कायमस्वरूपी व्यवस्था निर्माण करणे ही काळाची गरज आहे.

एखादी गंभीर दुर्घटना घडल्यानंतर प्रशासन जागे होण्यापेक्षा ती घडण्यापूर्वीच उपाययोजना करणे अधिक महत्त्वाचे आहे. मोरजीतील वाढत्या बेवारस श्वानांच्या प्रश्नाची सरकारने आता तरी तातडीने दखल घ्यावी, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

मोरजी ग्रामसभेत ठराव मंजूर

मोरजी पंचायतीची ग्रामसभा २३ रोजी सरपंच विलास मोर्जे यांच्या अध्यक्षतेखाली झाली होती. त्यावेळी मोरजी पंचायत क्षेत्रातील बेवारशी कुत्र्यांवर बरीच गरमागरम चर्चा होऊन या कुत्र्यांचा त्वरित बंदोबस्त करावा, अशी मागणी यावेळी सोनू शेटगावकर, तुकाराम शेटगावकर, निवृत्ती शिरोडकर यांनी केली होती. त्यावेळी तशा प्रकारचा ठराव मंजूर करून आपण याची कार्यवाही करण्यासाठी संबंधित विभागाला स्मरणपत्र देणार असल्याची माहिती सरपंच विलास मोरजे यांनी दिली होती.



मडगावसह परिसरात भटके कुत्रे, मोकाट गुरांचा उपद्रव

अपघातांच्याही घटना : प्रशासनाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
मडगाव

मडगाव शहरासह परिसरात मोकाट गुरांसह भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला आहे. शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठा तसेच अंतर्गत भागांत भटक्या कुत्र्यांचे कळप दिसत असून ते गाड्यांच्या मागे लागतात. तसेच मोकाट गुरे रस्त्यावर ठाण मांडून बसत असल्याने वाहनचालक, पादचारी आणि स्थानिक रहिवाशांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

मडगाव नगरपालिका क्षेत्राबरोबरच कोलवा, नावेली, बाणावली, फातोर्डा, जुने मार्केट परिसर तसेच मडगाव कुंकळ्ळी मार्गावरही मोकाट जनावरांचा वावर वाढला आहे. रात्रीच्या वेळी रस्त्यावर फिरणाऱ्या कुत्र्यांच्या कळपामुळे दुचाकीस्वारांना वाहन चालवणे कठीण होत आहे. कुत्र्यांकडून चावा घेण्याच्या घटनांत वाढ होत असल्याचे दिसून येते. राज्यात दररोज सरासरी ५० ते ६० श्वानदंशाच्या घटना नोंदवल्या जात असल्याचे सांगितले जाते. २०२४ अखेरपर्यंत राज्यात श्वानदंशाची प्रकरणे १७ हजार २०० पेक्षा जास्त होती. ऑगस्टपर्यंत १२ हजारांहून जास्त नागरिकांना कुत्र्यांनी चावा घेतल्याची नोंद असल्याचा दावा करण्यात आला आहे. कुत्र्यांनी चावा घेतल्यानंतर रेबीज प्रतिबंधक लस घेण्यासाठी दक्षिण गोवा जिल्हा रुग्णालयासह विविध आरोग्य केंद्रांमध्ये नागरिकांची गर्दी होत आहे. त्यामुळे आरोग्य यंत्रणेवरही अतिरिक्त ताण पडत आहे.

दरम्यान, कुत्र्यांच्या लसीकरणाचा मुद्दा लक्षात घेतल्यास २०२३ मध्ये १२७३०, २०२४ मध्ये १२०८९, २०२५ मध्ये १२३९३ कुत्र्यांचे लसीकरण झालेले होते. पण यावर्षी जुलै महिन्याअखेरपर्यंत केवळ २,०१३ कुत्र्यांचे लसीकरण झालेले आहे. गोवा स्मॉल ॲनिमल रेस्क्यू मॅनेजमेंट योजनेंतर्गत २०२३ मध्ये १.२८ कोटी, २०२४ मध्ये २.२० कोटी, २०२५ मध्ये १.११ कोटी तर २०२६ मध्ये ९२ लाखांचे अनुदान विविध संस्थांना दिलेले आहे. २०१९ मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार राज्यात २७,८६४ कुत्रे आढळून आलेले होते. त्यानंतरच्या सात वर्षांच्या काळात यात आणखी वाढ झालेली असून शकते, त्यामानाने लसीकरणाचा वेग पाहता ही चिंतेची बाब असल्याचे समोर येत आहे.

सासष्टी तालुक्यातील ग्रामीण तसेच किनारी भागांत रात्रीच्या वेळी कुत्र्यांचे कळप दुचाकीस्वारांचा पाठलाग करत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. अचानक रस्त्यावर धावून येणाऱ्या कुत्र्यांमुळे दुचाकीस्वारांचे नियंत्रण सुटून किरकोळ तसेच गंभीर अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. सकाळी फिरायला जाणारे ज्येष्ठ नागरिक तसेच शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांमध्येही या समस्येमुळे भीतीचे वातावरण आहे. केळशी सरपंच डिक्सन वाझ यांनी पर्यटकांना कुत्र्यांनी चावा घेतल्यानंतर भटक्या कुत्र्यांचा प्रश्न सोडवण्यासाठी दक्षिण गोवा जिल्हाधिकारी कार्यालयाला निवेदन सादर केले होते. त्यानंतर बैठकाही झाल्या पण ठोस उपाययोजना अजूनही अस्तित्वात नाही.

भटक्या कुत्र्यांबरोबरच मोकाट गुरांचाही प्रश्न गंभीर बनला आहे. राष्ट्रीय महामार्ग, मडगाव बायपास तसेच शहरातील विविध प्रमुख रस्त्यांवर गुरे रस्त्याच्या मध्यभागी बसलेली किंवा फिरताना दिसतात. रात्रीच्या वेळी अपुर्या प्रकाशामुळे ही गुरे वाहनचालकांच्या वेळीच लक्षात येत नसल्याने अपघातांचा धोका वाढतो. विशेषत: दुचाकीस्वारांसाठी रस्त्यावर अचानक समोर येणारी गुरे धोकादायक ठरत आहेत. जुलै महिन्यात रस्त्यावर बसलेल्या गुरांना दुचाकीची धडक बसून २६ वर्षीय रोहित कवळेकर या युवकाचा मृत्यू होण्याची घटना घडली होती. त्यामुळे मोकाट जनावरांमुळे होणार्या अपघातांमध्ये जीवितहानी होत असून या समस्येकडे गांभीर्याने पाहण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.


सासष्टीतील विविध ग्रामसभांमध्ये भटक्या कुत्र्यांचा तसेच मोकाट गुरांचा प्रश्न वारंवार उपस्थित केला जात आहे. आके बायश, रुमडामळ, नावेली आदी भागांतील ग्रामस्थांनी स्थानिक प्रशासनाच्या कारवाईबाबत नाराजी व्यक्त केली आहे. भटक्या प्राण्यांची संख्या वाढत असताना त्यावर प्रभावी नियंत्रण का ठेवले जात नाही, असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. भटक्या कुत्र्यांच्या संख्येचे सर्वेक्षण, त्यांचे जिओटॅगिंग आणि प्रभावी नसबंदी कार्यक्रम राबविण्याबाबत न्यायालयीन पातळीवरही निर्देश देण्यात आले आहेत. मात्र, प्रत्यक्षात या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे.



मोकाट गुरे सोडणाऱ्या मालकांवर दंडात्मक कारवाई करा!

मडगाव नगरपालिका तसेच संबंधित पंचायतींनी मोकाट गुरांचा बंदोबस्त करण्यासाठी तातडीने मोहीम राबवावी, गुरांना सुरक्षित ठिकाणी हलवावे आणि जनावरांना रस्त्यावर मोकाट सोडणाऱ्या मालकांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. त्याचबरोबर भटक्या कुत्र्यांची नसबंदी व लसीकरण मोहीम व्यापक स्वरूपात राबवून त्यावर नियमित देखरेख ठेवण्याची गरज व्यक्त केली जात आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेशी थेट संबंधित असलेल्या या प्रश्नावर केवळ तात्पुरती कारवाई न करता मडगाव शहरासह सासष्टीतील मुख्यत्वेकरुन किनारी भागात मोकाट गुरांसह भटक्या कुत्र्यांचा प्रश्न वाढलेला असून कायमस्वरूपी उपाययोजना आखाव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

कुत्र्यांच्या लसीकरणाची आकडेवारी



हरमल भागात रात्रीच्या वेळी भटक्या गुरांचा कळप रस्त्यात

अपघाताची भीती : बंदोबस्त करण्याची स्थानिकांची मागणी

गोवन वार्ता ■ वार्ताहर
हरमल

येथील पर्यटन किनारी भागात सध्या रात्रीच्यावेळेत भटक्या गुरांचे कळप रस्त्यात ठाण मांडून बसत असल्याने क्षेत्रात मोठ्या अपघातांची भीती स्थानिकांतून व्यक्त केली जात आहे.

अलीकडे कित्येक दिवस हरमल पंचायत क्षेत्रात श्री महापुरुष देवस्थान परिसर, भटवाडी प्रमुख रस्त्यात व मासळी मार्केट तसेच बँक ऑफ इंडिया नजिक रात्रीच्या वेळेत भटकी गुरे रस्त्यात ठाण मांडून बसलेली असतात. अलीकडे वाहनांची वर्दळ पाहता, या क्षेत्रात मोठ्या अपघातांची शक्यता असून मोठा अनर्थ घडण्यापूर्वी कारवाई करण्याची मागणी होत आहे.

दरम्यान, रात्रीच्या वेळेत पथदीप बंद झाल्यास, अंधारात गुरे दिसणे अवघड होईल. त्यामुळे अपघात घडण्याची भीती आहे. मुळात सरकारची कोंडवाडा योजना रखडली असून, त्यामुळे गुरे रस्त्यात बसून वाहन चालकांना डोकेदुखी तर, काहींसाठी कर्दनकाळ ठरत आहेत. त्यावर उपाययोजना करण्याची गरज असल्याचे मत नागरिक रामचंद्र नाईक यांनी व्यक्त केले.

गुरांचे कळप रस्त्यात रात्रीच्या वेळेत बसत असल्याने, पंचायत मंडळांनी चकाकता रंग किंवा अन्य प्रकारची उपाययोजना राबवावी. तसेच त्यांच्या मालकांची सविस्तर माहिती गोळा करून, संबंधिताकडून दंडात्मक कारवाई शुल्क आकारणी करावी अशी मागणी वाहन मालकांनी केली आहे.

शेतकरी गुरांबाबत जागरुक असले तरी रात्रीच्यावेळी शोधाशोध न करता गुरे मोकाट सोडून देत आहेत. ही कृती वाहनचालकांच्या जीवनमरणाचा प्रश्न बनला असल्याचे नाईक यांनी सांगितले.

संबंधित पंचायत मंडळांनी खबरदारी घेऊन ही समस्या सोडविण्यासाठी कडक पावले उचलावीत व पंचायत क्षेत्र अपघातमुक्त करण्याची मागणी होत आहे.

पंचायत- गोशाळा करार कुचकामी

गेल्यावर्षी पंचायत व गोशाळा यांच्यात सामंजस्य करार झाला होता. त्यावेळी कार्यवाही झाल्यानंतर, गोशाळेने गुरांना उचलून नेले होते. मात्र, ग्रामसभेत काही ग्रामस्थांनी पंचायतीस धारेवर धरले व गोशाळांतून गुरे आणून द्यावीत, असे सांगितले. त्यानंतर कराराकडे दुर्लक्ष झाले. सध्या त्याचा परिणाम रस्त्यारस्त्यात दिसत असल्याचे एका नागरिकाने सांगितले.



हरमल मधलावाडा श्री महापुरुष परिसरात रात्रीच्या वेळेत ठाण मांडून असलेली भटकी गुरे.

थोडक्यात

पाकिस्तानचे अफगाणिस्तानवर हवाई हल्ले; २८ ठार

गोवन वार्ता ■ काबूल :
पाकिस्तानने सोमवारी पहाटे पूर्व अफगाणिस्तानमधील कुनार आणि पक्तिका प्रांतांवर तीव्र हवाई हल्ले केले. या हल्ल्यांमध्ये २८ संशयित दहशतवादी मारले गेल्याचा दावा पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी केला आहे. मात्र, या हल्ल्यात नागरिकांना लक्ष्य करण्यात आल्याचे सांगत अफगाणिस्तानच्या तालिबान सरकारने संताप व्यक्त केला असून, या कृत्याला 'योग्य प्रत्युत्तर' देण्याचा इशारा दिला आहे. अफगाणिस्तानचे सरकारचे मुख्य प्रवक्ता जबिहमुल्ला मुजाहिद यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर पोस्ट करत या हल्ल्यांचा तीव्र निषेध केला आहे. पाकिस्तानच्या लष्कराने नागरिक वस्तीला लक्ष्य करून अफगाणिस्तानविरुद्धच्या गुन्ह्यांची पुनरावृत्ती केल्याचा आरोप त्यांनी केला.

एसआयटीचा अहवाल सर्वोच्च न्यायालयात सादर

राम मंदिरातील देणगी चोरीच्या १०५ घटना सीसीटीव्हीत कैद

गोवन वार्ता ■ न्यूज डेस्क
नवी दिल्ली

अयोध्या येथील ऐतिहासिक राम मंदिरातील देणगी चोरीच्या १०५ घटना मंदिरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये कैद झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकरणाचा तपास करणाऱ्या विशेष तपास पथकाच्या (एसआयटी) अहवालाचा संदर्भ देत सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सोमवारी सर्वोच्च न्यायालयात तपासाचा सविस्तर तपशील सादर केला.

एसआयटीचा तपास आता अंतिम टप्प्यात असून, येत्या २५ सप्टेंबरपर्यंत न्यायालयात आरोपपत्र (चार्जशीट) दाखल केले जाईल, अशी माहिती सॉलिसिटर जनरल यांनी न्यायालयाला दिली.



यावर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने संबंधित दंडाधिकाऱ्यांना नियमानुसार आरोपपत्रावर पुढील कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

सुनावणीदरम्यान न्यायालयाने एसआयटीच्या अहवालाचा सविस्तर आढावा घेतला. यामध्ये आतापर्यंत झालेली अटक, गोळा केलेले पुरावे, साक्षीदारांचे जबाब तसेच सीसीटीव्ही फुटेज आणि इतर पुराव्यांचे विश्लेषण करून आरोपींची ओळख कशी पटवली गेली, या सर्व बाबींचा तपशील न्यायालयासमोर मांडण्यात आला. न्यायालयाने ही सर्व माहिती नोंदीवर घेतली आहे.

याचिकाकर्त्यांची मागणी फेटाळली

काही याचिकाकर्त्यांनी एसआयटी अहवालाच्या प्रतीची मागणी केली होती, जी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने स्पष्ट केले की, हे प्रकरण सत्र न्यायाधीशांच्या हातातून काढायचे नाही आणि भविष्यात गरजेनुसार योग्य निर्देश दिले जातील.

'एसआयआर'च्या पार्श्वभूमीवर दिग्गज नेत्यांना नोटिसा

रेखा गुप्ता, केजरीवाल,एस. जयशंकर यांचा समावेश

गोवन वार्ता ■ न्यूज डेस्क
नवी दिल्ली

देशभरात सध्या सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या 'विशेष सखोल पुनरीक्षण' (एसआयआर) मोहिमेमुळे राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे. या प्रक्रियेदरम्यान देशातील काही दिग्गज नेत्यांना निवडणूक आयोगाकडून नोटिसा बजावण्यात आल्याने राजकीय गदारोळ उडाला होता. मात्र, या सर्व प्रकरणावर आता भारतीय निवडणूक आयोगाने अधिकृत आणि स्पष्ट भूमिका मांडली आहे.

मतदार यादी पडताळणीच्या या विशेष मोहिमेदरम्यान अनेक नामांकित व्यक्तींना निवडणूक आयोगाकडून नोटिसा पाठवण्यात आल्या. यामध्ये प्रामुख्याने रेखा गुप्ता (मुख्यमंत्री, दिल्ली), अरविंद केजरीवाल (माजी मुख्यमंत्री, दिल्ली), लालकृष्ण अडवाणी (ज्येष्ठ नेते, भाजप), एस. जयशंकर (परराष्ट्र मंत्री), एस. एस. संधू (निवडणूक आयुक्त) यांचा समावेश आहे.

दिग्गज नेत्यांना नोटिसा मिळाल्यानंतर मतदार यादीतून त्यांची नावे वगळली जाणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात होता. यावर मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या कार्यालयाने स्पष्ट केले आहे की, अर्जातील किरकोळ त्रुटींमुळे या नोटिसा पाठवण्यात आल्या आहेत. काही नेत्यांच्या अर्जांमध्ये नावांच्या स्पेलिंगमध्ये तफावत किंवा विसंगती आढळली आहे. तांत्रिक पूर्तता करण्यासाठी ही प्रशासकीय प्रक्रिया पार पाडली जात आहे.



निवडणूक आयोगाचा खुलासा

निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे की, नोटीस पाठवली म्हणजे संबंधित मतदाराचे नाव मतदार यादीतून वगळले जाईल, असा अर्थ काढणे चुकीचे आहे. आयोगाने स्पष्ट केले की, या नोटिसांमुळे कोणत्याही नेत्याच्या किंवा नागरिकाच्या मतदानाच्या अधिकारावर किंवा अस्तित्वावर कोणतेही संकट आलेले नाही. ही केवळ पडताळणीची एक नियमित प्रक्रिया असून त्रुटींची पूर्तता केल्यानंतर सर्व नावे कायम राखली जातील.

BEFORE THE JOINT MAMLATDAR-III OF BARDEZ TALUKA MAPUSA, BARDEZ GOA
Mutation No. 214973
City: Mapusa

1. Rosamma Fernandes, 2. Petunia Fernandes, 3. Leo Fernandes, r/o H. No. 96A Ruzai Vaddo Duler, Mapusa Bardez Goa, 403507 **....Applicants**

V/S

1. SHRI. YESHWANT VASSU KOTKAR 2. Geeta Yeshwant Kotkar 3. Dominic Fernandes **.....Opponents**

To all opponents / legal heirs/any other interested parties
PUBLIC NOTICE

Whereas the applicant Rosamma Fernandes, Petunia Fernandes, Leo Fernandes, r/o H. No. 96A Ruzai Vaddo Duler Mapusa Bardez Goa, 403507, have filed the application U/S 96 of Goa Land Revenue Code 1968 for Mutation in property bearing Chalta No. 26 of P. T. Sheet No. 16-B situated in Mapusa City Taluka Bardez Goa. Applicants have acquired right over the Property by virtue of Order in Inventory Proceeding No. 33/2023/A dated 02/09/2023 Passed in the Court of the Civil Judge Senior Division A Court Mapusa Goa. Applicant has also placed on record Deed of Sale dated 14/11/1990 and Deed of Sale dated 25/03/2015. Therefore applicants requested to include their names in the Form D of above mentioned Chalta No. and P. T. Sheet No.

And whereas the notices in Form no. X were served to all the interested parties by registered A/D. However some A. D. card returned back with the Postal remarks "Party Expired/Party Left/Not Known/Address out of Station" and he do not known the detailed addresses of the Legal heirs and whereabouts of the interested parties.

And whereas the applicant has prayed vide his application for substitute service, by publication of public notice in any one daily newspaper as required under Order V Rule 20(1A) of C.P.C. as the applicants does not know the legal heirs and the address of the intrested parties.

All the interested parties are hereby given notice of the said mutation entry and called upon to submit to me their objection if any to the mutation entry **within 15 days** from the date of publication of this notice failing which the suitable order under the provision of LRC shall be issued by the Certifying Officer.

Place: Mapusa,
Date: 21/09/2026.

Seal **Sd/-**
(Jenisa Pereira)
Joint Mamlatdar-III Bardez,
Mapusa - Goa.

राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचे आज वितरण

'आर्टिकल ३७०' सर्वोत्कृष्ट चित्रपट, यामी, मामुटी, कार्तिक यांनाही पुरस्कार

अजय लाड
गोवन वार्ता ■ एकता नगर



भारतीय चित्रपटसृष्टीतील प्रतिष्ठेच्या ७२ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. ज्येष्ठ अभिनेते अनंत नाग यांना २०२४ चा मानाचा 'दादासाहेब फाळके पुरस्कार' जाहीर झाला आहे. पुरस्कार सोहळा २२ सप्टेंबर रोजी गुजरातमधील एकता नगर, केवडिया येथे राष्ट्रपतींच्या हस्ते होणार आहे. राजधानी दिल्लीबाहेर या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन प्रथमच करण्यात येत आहे.

पाच दशकांहून अधिक काळाच्या कारकिर्दीत कन्नडसह भारतीय चित्रपटसृष्टीत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या अनंत नाग यांचा या पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे.

'आर्टिकल ३७०' या चित्रपटाने सर्वोत्कृष्ट कथात्मक चित्रपटाचा पुरस्कार पटकावला आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन आदित्य जांभळे यांनी केलेले आहे. या चित्रपटातील भूमिकेसाठी यामी गौतम हिला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. 'ब्रह्मयुगम'मधील अभिनयासाठी मामुटी आणि 'चंदू चॅम्पियन'मधील भूमिकेसाठी कार्तिक आर्यन यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार जाहीर झाला आहे.

'स्वातंत्र्यवीर सावरकर'साठी रणदीप हुड्डाला सर्वोत्कृष्ट पदार्पण दिग्दर्शकाचा पुरस्कार मिळाला आहे. कोकणातील 'मोग आसू' या चित्रपटाला कोकणी फिचर्स फिल्ममध्ये पुरस्कार प्राप्त झालेला आहे.

दिल्लीत १० वर्षीय चिमुकलीवर बलात्कार

स्टेशनरी आणायला गेलेल्या बालिकेसोबत घडली घटना

गोवन वार्ता ■ न्यूज डेस्क
नवी दिल्ली

दिल्लीच्या सदर बाजार परिसरात १० वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी पोलिसांनी ५६ वर्षीय नराधमाला अटक केली आहे. मक्सूद असे या आरोपीचे नाव असून, या घृणास्पद कृत्यमुळे परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना १६ सप्टेंबरच्या रात्री घडली. पीडित बालिका रात्री साडेअकराच्या सुमारास स्टेशनरी आणण्यासाठी बाहेर पडली होती. यादरम्यान, स्थानिक दुकानदार असलेल्या मक्सूदने तिला आमिष दाखवून स्वत:च्या दुकानात नेले. आरोपीने क्रौर्याची सीमा ओलांडत चिमुरुकीचे हात-पाय बांधले आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपीला अटक केली आणि त्याच दिवशी त्याला न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले.



आठवड्याभरात दुसरी घटना

८ दिवसांपूर्वीच दिल्लीतील स्वरूप नगर परिसरात एका १७ वर्षीय मुलीवर सामूहिक बलात्कार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आल्याची घटना घडली होती. १३ सप्टेंबर रोजी एका शेतात तिचा कुजलेला मृतदेह आढळला होता. या प्रकरणी दिल्ली महिला आयोगाच्या अध्यक्षा लता गुप्ता यांनी पीडित कुटुंबाची भेट घेऊन त्यांना कायदेशीर मदत आणि समुपदेशनाचे आश्वासन दिले होते. या प्रकरणी पोलिसांनी चार जणांना अटक केली असून, त्यातील तीन जण अल्पवयीन आहेत.

राशीभविष्य



मेष – कामाची गती वाढविण्यासाठी प्रयत्नांची आवश्यकता. आपल्या कला व छंदासाठी पुरेसा वेळ दिल्यास मन ताजेतवाने होण्यासाठी मदत होईल. जीवनसाथी आपल्याला सांभाळून घेईल.




वृषभ – आपल्या कार्यस्थळी आपल्या बुद्धी कौशल्याचे कौतुक होईल मुत्सद्दी पणाने निर्णय घ्याल. सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याची आवश्यकता इतरांना मदत कराल.



मिथुन – नोकरीधंद्यात चांगली परिस्थिती राहील नवीन संधी मिळतील पण त्यासाठी परिश्रम घ्यावे लागतील आर्थिक परिस्थिती समाधान कारक राहील.



कर्क – अनुकूल घटना घटित होतील कामात उत्साह राहील भाग्याची साथ राहील इतरांशी असलेले गैरसमज दूर करण्यात यश मिळेल पैशांची आवक चांगली राहील.



सिंह – घरगुती तसेच व्यवसाय धंद्यातील कामासाठी जास्त परिश्रम घेतले गेल्यामुळे दमछाक होईल कामे किचकट होतात असे वाटेल. प्रवासात वाहनाच्या वेगावर नियंत्रण आवश्यक.



कन्या – नोकरीत प्रगती होईल कामाचा आणि जबाबदारीचा सतत विचार करू नका घरातील सदस्यांसाठी वेळ द्या आपल्या आवडत्या छंदांसाठी व कलेसाठी वेळ द्या.



तुळ – आर्थिक आवक चांगली राहील. व्यवसाय धंद्यातील जुनी ऑडी वसूल होतील उत्पन्नातून काही शिल्लक राहील याची काळजी घ्या अनावश्यक खर्च टाळा.




वृश्चिक – जमीन जुमला स्थावर मिळकत याविषयीची कामे होतील नोकरीतील दिवस सर्वसामान्य असेल संघर्षातून शांतपणे मार्ग काढणे योग्य ठरेल. धार्मिक तसेच सामाजिक कार्यात सक्रिय भाग घ्याल.



धनु – यशाच्या वार्ता कानावरती पडतील चांगला काळ आहे आपली बाजू वरचढ ठरून इतरांवर आपला प्रभाव राहील मात्र व्यवसायात सामान्य स्थिती राहील.



मकर – अपेक्षेप्रमाणे कामे होणार नाहीत तसेच आरोग्याच्या बाबतीत जागरूक राहणे हितकारक ठरेल खाण्यापिण्याची काळजी घ्या.



कुंभ – नोकरीधंद्यात आपले वर्चस्व राहील वरिष्ठांशी संबंध चांगले राहतील हकाऱ्यांना सांभाळून घ्या आर्थिक बाबतीतील अंदाज बरोबर ठरतील.



मीन – जीवनसाथीला समजून घ्या घरामध्ये एखादे छोटेसे धार्मिक कार्य घडेल तरुण-तरुणींना प्रेमात यश लाभेल नोकरीत चांगली परिस्थिती राहील व्यवसायात भरभराट होईल.

कॅनडामध्ये विमान अपघातात दोन भारतीय ठार

गोवन वार्ता ■ न्यूज डेस्क
ओटावा

कॅनडामध्ये उड्डाण प्रशिक्षणादरम्यान झालेल्या भीषण विमान अपघातात तमिळनाडू आणि पुदुचेरी येथील दोन भारतीय विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे. व्हॉम्कुव्हर येथील भारतीय दूतावासाने रविवारी या अपघाताची पुष्टी केली असून, मृत विद्यार्थ्यांच्या पार्थिवांना भारतात आणण्यासाठी कुटुंबीयांना सर्वतोपरी मदत केली जाईल, असे जाहीर केले आहे.

कॅनडियन वृत्तसंस्था 'सीबीसी'ने दिलेल्या वृत्तानुसार, सॅस्काचेवान प्रांतात शनिवारी हा अपघात झाला. मनोज शिवकुमार आणि श्रीसरन थिरुग्नानशमबंथम अशी मृत विद्यार्थ्यांची नावे आहेत. हे दोघेही व्यावसायिक पायलट परवान्यासाठी आवश्यक असलेले उड्डाण तास पूर्ण करत होते. हर्झ एअर फ्लाईट स्कूलचे 'सेस्ना १७२' हे विमान भाड्याने घेऊन ते रेजिना ते मॅनिटोबा येथील स्टेनबॅक असा प्रवास करत होते.

संध्याकाळी ६ वाजण्याच्या सुमारास दुर्घटनाग्रस्त विमानाचा शोध लागला. पॅराशूटच्या मदतीने खाली उतरलेल्या जवानांना विमानात दोन्ही विद्यार्थी मृत अवस्थेत आढळले.

मागील उत्तर (६७२९)

मा	य	ना	■	श	हा	मृ	ग	■	त
गा	■	च	ट	प	ट	■	वा	व	र
स	द	रा	■	थ	■	घा	र	■	त
ले	■	■	अ	पू	र्वा	ई	■	सु	रा
ला	लू	च	■	र्व	■	ने	म	का	■
■	ट	■	आ	क	स	■	र	■	हि
बे	मा	लू	म	■	ता	र	ण	ह्व	र
फ्ल	र	■	वा	द	र	■	प्रा	■	व
म	■	मो	र	या	■	ल	य	लू	ट

आडवे शब्द – १) पाठोपाठ, ४) घोटाळा, ७) मारामारी, १०) पाणी पिण्याची इच्छा, १२) मदतगार, १४) असंस्कृत, १६) झाडाझडती, १८) पराभव, १९) चुंगी, २१) भक्तिभावाने पाहणे, २३) जास्त भाजलेला किंवा तळलेला, २६) अभाव, २८) खुळा, ३०) दर्दी, ३१) झिजलेला, ३२) लाजाळू.

शब्दवेध (६७३०)

1		2	3	■	■	4	5		6
	■	7		8	9	■		■	
10	11		■	12				13	■
■	14		15		■	■	16		
■	■	18		■	19	20	■		■
21			■	22	■	23	24		25
	■	■	26		27			■	
28	29			■		■	30		
31		■	32						

उभे शब्द – १) स्वाद; गोडी, २) किरकोळ, ३) अवस्था, ५) लोणी, ६) हकालपट्टी, ८) घामामुळे ओलसर व अस्वच्छ, ९) एक मुसलमानी सण, ११) बांबूचा टोपला, १३) आवेशाने वारंवार, १५) नवरा मुलगा, २०) तगादा, २१) दमदाटी, २२) शिक्षा (पैशाच्या रुपात), २४) तांदूळ शिजताना होणारा आवाज, २५) गळणे, २६) फिर्याद, २७) एक वाहन, २९) आर्यांनी (पूर्वी) केलेले समाजाचे चार भाग; रंग. **(उत्तर: पुढील अंकात)**

Village Panchayat Mauxi, Sattari, Goa

Ref. No. VPM/SAT/Quotation Notice /2026-27/ 1065 Date: 21/09/2026

QUOTATION NOTICE

The Sarpanch of this Village Panchayat Mauxi Sattari, Goa on behalf of V.P. Mauxi Sattari Goa, invites the sealed quotations from the interested suppliers / dealers / agency for Supply and Installation of CCTV Camera , for V.P. Office building of VP Mauxi Sattari Goa to be procured under XV F.C. Fund.

The details are as follows:

Sr. No.	Description	Quantity	Rate per Unit
1.	8 CH CP Plus DVR 0801F!V-I- 5 MP	1 Nos.	
2.	1 TB Surveillance Hard Disk	1 Nos.	
3.	CP Plus SMPS 10 AMS	1 Nos.	
4.	CP –URC-TC51PL3C BULLET 5 MP	1 Nos.	
5.	CP-URC-DC51PL3C DOM 5 MP	1 Nos.	
6.	CP Plus 2U RAKRK3535VM-2U-T	1 Nos.	
7.	CP Plus 3 +1Cable	1 per mt	
8.	19 inch Monitor	1 Nos.	
9.	Artist Spike Guard 4 socket	1 Nos.	
10.	Wall Mount Movable	1 Nos.	
11.	BNC Connector	1 Nos.	
12.	DC Connector	1 Nos.	
13.	Installation charges	Per Cam	

Terms and conditions: 1. Dealers should submit their sealed quotations along with GST, Pan card, Bank Account details on or before 03/10/2026 up to 5. P.. to this Panchayat Office. 2. The Quotations will be open on 05/10/2026 at 11.00. a.m. the lowest quotation will be accepted. 3. Payment shall be made through eGrmswaraj after the delivery of items/goods in good condition at Village Panchayat Mauxi Sattari Goa. 4.The rate shall be quoted per item and should be inclusive of all taxes with door delivery. 5. For complete description of above items/goods, specification details contact VP Office of V P Mauxi, Sattari, Goa.

The village Panchayat Mauxi,Sattari, Goa reserves the right to accepting or rejecting any or all quotations without assigning any reason there off. Seal Sd/- **Sarpanch, Village Panchayat Mauxi**

VILLAGE PANCHAYAT ANJUNA- CAISUA

Ref. No. VP/ANJ-CAI / 2026-27 / 2591 **PUBLIC NOTICE** Date : 19.09.2026

WARD-WISE SURVEY OF STRAY DOGS, PET DOGS AND STRAY CATTLE WITHIN THE JURISDICTION OF VILLAGE PANCHAYAT ANJUNA-CAISUA

Ref. No: 1. 15/DP/All VPS / Stray dog / Petsguy / Cattle / HC 2 of 2026/2026/8576 dated 11/09/2026 Memorandum issued by Directorate of Panchayats.
2. Suo Motu Writ Petition No. 2 of 2026 of the Hon'ble High Court of Bombay at Goa.

The Village Panchayat Anjuna-Caisua hereby informs all the residents of the Village of Anjuna-Caisua that, in compliance with the directions issued by the Hon'ble High Court of Bombay at Goa and the Directorate of Panchayats, Government of Goa, a ward-wise survey of stray dogs and stray cattle shall be conducted in the jurisdiction of the Village Panchayat.

The survey is being undertaken to collect accurate information regarding stray animals and to facilitate appropriate measures relating to animal birth control, sterilization, vaccination, responsible feeding and stray animal management.

Accordingly, all concerned are hereby informed as follows:

1. **Animal Feeders and Volunteers**: All animal feeders, animal welfare volunteers and persons involved in feeding stray dogs and stray cattle are requested to contact their respective Ward Member and provide information regarding stray animals in their ward on or before 25/09/2026
2. **Ward-Wise Survey**: A ward-wise survey shall be conducted by the respective Ward Members along with the nominated volunteers and local representatives during the period from 01/10/2026 to 15/10/2026.
3. **Information to be Collected**: The survey shall include, among other details
I. Total number of stray dogs in each ward. II. Gender identification.
III. Sterilization status. IV. Locations/clusters where stray dogs are found.
V. Details of stray cattle and locations where stray cattle frequently congregate.
VI. Photographs and geo-tagging of identified stray animals, wherever applicable.
4. **Cooperation of Residents**: All residents, animal feeders, volunteers and concerned persons are requested to extend their full cooperation to the Ward Members and Survey Teams during the survey.
5. **Information Regarding Stray Animals**: Residents are requested to share information regarding stray dogs and stray cattle in their respective wards with the concerned Ward Member to ensure that the survey data is complete and accurate.

The cooperation of all concerned is solicited for the successful completion of the survey.

Seal Sd/- **Surendra Govekar (Sarpanch)**
Village Panchayat Anjuna-Caisua

सार्वजनिक सूचना

ICICI Bank **नोंदणीकृत कार्यालय :** आयसीआयसीआय बँक टॉवर, चकली सर्कल जवळ, ओल्ड पादरा रोड, वडोदरा-390007 कॉर्पोरेट कार्यालय: आयसीआयसीआय बँक टॉवर्स, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - 400051.

सोन्याचा लिलाव आणि आमंत्रण सूचना

खाली नमूद केलेल्या कर्जदारांना आयसीआयसीआय बँक लिमिटेडकडून सोन्याच्या दागिन्यांवर घेतलेल्या कर्जाची थकबाकी भरण्यासाठी नोटीस बजावण्यात आली होती. थकबाकीची परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव 22 ऑक्टोबर, 2026 रोजी आयोजित केला जाईल. मृत कर्जदाराच्या बाबतीत, सर्व अटी व शर्ती संबंधित कायदेशीर वारसांना लागू होतील.

कर्ज खाते क्रमांक	कर्जदाराचे नाव	लिलाव शाखेचा पत्ता
शाखेचे नाव: मडगाव		आयसीआयसीआय बँक लि., पाणंदीकर चेंबर्स, न्यू फातिमा कॉन्व्हेंट, मिगुएल लोयोला फुर्तादो रोड, मडगाव गोवा. -403601
002357000482	टीना कायतानो डायस	
002357000487	टीना कायतानो डायस	
शाखेचे नाव: साखळी		आयसीआयसीआय बँक लि., दुकान क्रमांक 2,3,4, कारापूर तिस्क, साखळी डिचोली गोवा 403505
260357000081	शुभदा शिवानंद पेडणेकर	
260357000043	दीपेश तुळशीदास वडकर	

लिलाव वरील तक्त्यात नमूद केलेल्या पत्त्यावर आणि तारखेला आयोजित केला जाईल. वेळ: दुपारी 3 ते सायंकाळी 6. कृपया नोंद घ्यावी की, आयसीआयसीआय बँक कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय लिलावाची तारीख/स्थळ/पद्धत बदलण्याचा अधिकार राखून ठेवते. इच्छुक पक्ष लिलावाच्या सविस्तर अटी व शर्तींसाठी वर नमूद केलेल्या शाखेला भेट देऊ शकतात.

दिनांकित: 22.09.2026 । स्थळ: उत्तर गोवा, दक्षिण गोवा

आपला विश्वासू सही/- अधिकृत स्वाक्षरीकर्ता
आयसीआयसीआय बँक लिमिटेडच्या वतीने

SBI STATE BANK OF INDIA

स्टेट बँक ऑफ इंडिया एसएमईसी, पणजी

दुसरा मजला पणजी मुख्य शाखा, डीबी रोड पणजी
गोवा 403001 दूरध्वनी: 0832-2420337 फॅक्स: 2420229 ईमेल: sbi.10290@sbi.co.in

वाहन विक्रीसाठी निविदा सूचना

स्टेट बँक ऑफ इंडियाच्या ताब्यात असलेल्या वाहनाच्या विक्रीसाठी ऑफलाइन किंवा ई-लिलावाद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत. तपशील खालीलप्रमाणे आहेत:-

शाखा आणि संपर्क	वाहनाचे वर्णन	नोंदणी प्रकार	नोंदणी क्रमांक आणि नोंदणी तारीख	राखीव किंमत	अनामत रक्कम 10% (रु.)
पणजी सचिवालय (गोवा) शाखा 9529327541	एसएमएल इसूझू एक्झिकेटीव्ह एलएक्स 3335 एसी बस 23 सीटर एसी बस	व्यावसायिक	GA-11-T-6385 14.08.2024	18,50,000/-	1,85,000/-

विक्रीच्या अटी आणि शर्ती: 1. लिलाव **'जसे आहे जेथे'** आणि **'जसे आहे जे'** या तत्त्वावर ऑफलाइन / ई-लिलावाद्वारे **21.10.2026** रोजी सकाळी **11 वाजता** आयोजित केला जाईल. इच्छुक खरेदीदार/बोलीदाराने **17.10.2026 रोजी सायंकाळी 5 पर्यंत** किंवा त्यापूर्वी 'स्टेट बँक ऑफ इंडिया'च्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे अनामत रक्कम जमा करणे आवश्यक आहे., **2.** यशस्वी बोलीदार म्हणून घोषित झालेल्या व्यक्तीने लिलावानंतर सात दिवसांच्या आत, म्हणजेच 28.10.2026 पर्यंत, विक्रीच्या एकूण रकमेपैकी जमा केलेली ईएमडी वजा करून उर्वरित 100% रक्कम जमा करावी. , **3.** लिलाव **21.10.2026 रोजी सकाळी 11 ते दुपारी 1** या वेळेत एसएमईसी पणजी, दुसरा मजला (एसबीआय पणजी मुख्य शाखेच्या वर), डी. बी. रोड, पणजी 403001 येथे आयोजित केला जाईल. **4.** कोणतेही कारण न देता ऑफर स्वीकारण्याचा, नाकारण्याचा, रद्द करण्याचा किंवा पुढे ढकलण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवला आहे. **5.** रक्कम भरल्यानंतर/जमा केल्यानंतर विक्री निश्चित झाल्यावर, विकले जाणारे वाहन यशस्वी बोलीदाराला 'जसे आहे जेथे' या स्थितीत सुपूर्द केले जाईल. **6.** ज्या अयशस्वी बोलीदारांनी ईएमडी जमा केली आहे, त्यांना विक्री निश्चित झाल्यानंतर त्वरित कोणतीही व्याजाची आकारणी न करता ती अनामत रक्कम परत मिळण्याचा हक्क असेल. **7.** हायपोथिकेशनमधील (तारण व्यवहारातील) कोणत्याही त्रुटींसाठी बँक जबाबदार किंवा उत्तरदायी राहणार नाही आणि याबाबत कोणतीही वॉरंटी दिली जाणार नाही. **8.** लिलावात सहभागी होण्यापूर्वी बोलीदार/खरेदीदारांनी आटीओ कार्यालयाकडून देय असलेले रस्ते/प्रवासी कर इत्यादी आणि पार्किंग शुल्काची माहिती करून घेणे आवश्यक आहे; आरटीओ/विमा कंपनी/इतर कोणत्याही प्राधिकरणाकडे असलेली कोणतीही थकबाकी बोलीदारालाच भरावी लागेल. **9.** यशस्वी बोलीदाराने **28.10.2026** रोजी बोलीची उर्वरित रक्कम जमा करण्यात कसूर केल्यास, जमा केलेली ईएमडी बँक जप्त करेल आणि स्वीकारलेली बोली आपोआप रद्द होईल. **10.** बोलीदार इच्छित असल्यास, आठवड्याच्या कामकाजाच्या दिवसांत पूर्व-भेटीची वेळ (अपॉइंटमेंट) घेऊन विक्रीसाठी असलेल्या चल मालमत्तेची पाहणी करू शकतात; संपर्क क्रमांक: **8282944449**

सही/-
ठिकाण: पणजी अधिकृत अधिकारी
दिनांकित: 21.09.2026 स्टेट बँक ऑफ इंडिया

ई-लिलाव विक्री सूचना

एडलवाईस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड

सीआयएन: U67100MH2007PLC174759
रिटेल सेंट्रल आणि नोंदणीकृत कार्यालय: एडलवाईस हाऊस, सीएसटी रोड जवळ, कलिना, मुंबई 400098

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनाशियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, 2002 मधील नियम 8(6) व 9(1) मधील तरतुदींनुसार स्थावर तारण मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड (यापुढे 'एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड/मूळ कर्जदाता' म्हणून संबोधले जाईल) यांनी सरफेसी कायदा, 2002 च्या कलम 5 अन्वये, दिनांकित 28-02-2023 च्या हस्तांतरण करारानुसार, वित्तीय मालमत्ता एडलवाईस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेडकडे स्वत:हून / EARC-TRUST-SC-483 (यापुढे 'EARC' म्हणून संबोधले जाईल) चे विश्वस्त म्हणून आपल्या क्षमतेनुसार हस्तांतरित केली आहे. EARC ने मूळ कर्जदात्याची जागा घेतली आहे आणि कर्जदाराने घेतलेल्या आर्थिक सहाय्याच्या संदर्भात, मूळ कर्जदात्याचे आर्थिक मालमत्तेवरील सर्व हक्क, मालकी आणि हितसंबंध, तसेच त्यामागील सुरक्षा हितसंबंध, हमी आणि तारण, EARC कडे निहित झाले आहेत आणि EARC सुरक्षित धनको म्हणून आपल्या सर्व हक्कांचा वापर करते.

विक्री करणाऱ्या संस्थेने म्हणजेच मूळ कर्जदारासाठी आयोजित केलेला पूर्वीचा लिलाव बोली लावणाऱ्याच्या अभावी अयशस्वी झाला, म्हणून याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि विशेषत: कर्जदार आणि जामीनदारांना 30 दिवसांची सूचना देण्यात येत आहे की, सुरक्षित कर्जदाराच्या नावे गहाण ठेवलेली खाली वर्णन केलेली स्थावर सुरक्षित मालमत्ता, जिचा प्रत्यक्ष ताबा विक्री करणाऱ्या संस्थेच्या म्हणजेच मूळ कर्जदाराच्या अधिकृत अधिकाऱ्याने (AO) घेतला आहे, ती EARC ला देय असलेल्या खाली नमूद केलेल्या रकमेच्या वसुलीसाठी 'जे आहे जेथे', 'जे काही आहे ते' आणि 'जे काही असेल ते' या तत्त्वावर विकली जाईल. या रकमेतून कर्जदार आणि जामीनदारांकडून EARC ला मिळालेली कोणतीही रक्कम वजा करून पुढील व्याज आणि इतर खर्च/किंमत आकारली जाईल. मालमत्तेसाठी राखीव किंमत आणि बयाणा रक्कम खाली नमूद केली आहे.

**ई-लिलावासाठी ठेवलेल्या सुरक्षित मालमत्तेचा त

बाजारभाव

सोने	₹१,५६,४००	(१० ग्रॅम)
चांदी	₹२,४२,०००	(१ किलो)
डॉलर	₹ ९५.८१	+१५ पैसे
सेन्सेक्स	७४,८५८.९९	+५६४.०३
निफ्टी	२३,४१४.३०	+६७.९०

परदेशी निधीचे बाजाराला बळ

सेन्सेक्स ५६४ अंकांनी वधारला; निफ्टी सलग चौथ्या दिवशी तेजीत

मुंबई : कच्च्या तेलाच्या घसरत्या किमती, परदेशी संस्थागत गुंतवणूकदारांचा नवीन निधीचा ओघ आणि जागतिक बाजारातील सकारात्मक वातावरणामुळे सोमवारी प्रमुख शेअर बाजार निर्देशांक वाढीसह बंद झाले. यामध्ये सेन्सेक्स ५६४ अंकांनी वधारला. तर निफ्टीने सलग चौथ्या दिवशी तेजी नोंदवली.

बीएसई सेन्सेक्स ५६४.०३ अंकांनी वाढून ७४,८५८.९९ वर बंद झाला. व्यवहारादरम्यान त्याने ६९२.४४ अंकांची (०.९३ टक्के) उसळी घेत ७४,९८७.४० ची उच्चांकी पातळी गाठली होती. तर सलग चौथ्या दिवशी वाढ नोंदवताना एनएसई निफ्टी ६७.९० अंकांनी वाढून २३,४१४.३० वर बंद झाला.

शुक्रवारी सेन्सेक्स १९.६३ अंकांनी घसरून ७४,२९४.९६ वर बंद झाला होता. तर सलग तिसऱ्या दिवशी तेजी नोंदवत निफ्टी ७५.८० अंकांनी वाढून २३,३४६.४० वर बंद झाला होता.

११ सप्टेंबरअखेरच्या आठवड्यात परकीय चलन साठा ४.९२४ अब्ज डॉलरने घसरून ७८०.७८२ अब्ज डॉलरवर आला.



प्रमुख शेअर्समधील घडामोडी

सेन्सेक्समधील ३० कंपन्यांपैकी अल्ट्राटेक सिमेंटचा शेअर सर्वाधिक ४.११ टक्क्यांनी वधारला. याशिवाय एचसीएल टेक, इटर्नल, टायटन, आयटीसी आणि टेक महिंद्रा हे शेअर प्रमुख कमाई करणाऱ्यांमध्ये होते. तर भारती एअरटेल, पॉवर ग्रिड, इन्फोसिस आणि अदानी पोर्ट्स यांच्या शेअरसमध्ये घसरण पाहायला मिळाली.

जागतिक आणि इतर घटक

आशियाई बाजारात दक्षिण कोरियाचा कोस्पी, जपानचा निकेई २२५, शांघायचा एसएसई कंपोझिट आणि हाँगकाँगचा हँग सेंग हे निर्देशांक सकारात्मक स्थितीत बंद झाले. युरोपीय बाजार मोठ्या वाढीसह ट्रेड करत होते. तर शुक्रवारी अमेरिकन बाजार मुख्यतः वाढीसह बंद झाले होते.

`एनएसई आयपीओ`ला चार पट प्रतिसाद

नवी दिल्ली : नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया (एनएसई) च्या २२,५६९ कोटी रुपयांच्या इनिशियल पब्लिक ऑफरिंगला (आयपीओ) - जो देशातील दुसरा सर्वांत मोठा सार्वजनिक भरणा (पब्लिक इश्यू) आहे - सोमवारी बोलीच्या अंतिम दिवशी आतापर्यंत ३.९२ पट प्रतिसाद मिळाला आहे.

हा आयपीओ २०२४ मधील ह्युंदाई मोटर इंडियाच्या २७,८७० कोटी रुपयांच्या आयपीओनंतर भारतातील दुसरा सर्वात मोठा सार्वजनिक भरणा आहे. आयपीओने २०२२ मधील एलआयसीच्या २१,००० कोटी रुपयांच्या भरण्याला मागे टाकले आहे. मात्र ह्युंदाई मोटर इंडियाच्या विक्रमी भरण्यापेक्षा कमी आहे. बीएसईवर दुपारपर्यंत विक्रीसाठी ठेवलेल्या ८.८६ कोटी शेअरसच्या तुलनेत एनएसई आयपीओला ३४.७८ कोटी शेअरसाठी बोली प्राप्त झाली.



मूल्यांकन ४.४२ लाख कोटीपर्यंत

एनएसई आयपीओसाठी एक्सचेंजने प्रति इक्विटी शेअर १,७०० ते १,७८५ रुपये असा किंमत पट्टा निश्चित केला आहे. कमाल किंमतीनुसार एक्सचेंजचे मूल्यांकन ४.४२ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचेल. एनएसईचे शेअर २४ सप्टेंबर रोजी शेअर बाजारात लिस्ट होतील, अशी अपेक्षा आहे. ओएफएसचा आकार आधी नियोजित १४.९ कोटी शेअर्सवरून कमी केल्यामुळे सुरुवातीला अंदाजित केलेल्या ३०,००० कोटी रुपयांवरून आयपीओचा आकार कमी झाला आहे.

परकीय चलनातील ठेवी संजीवनी ठरणार

बँकांमधील गुंतवणुकीबाबत एस अँड पीला विश्वास

नवी दिल्ली : परकीय चलनातील ठेवी आकर्षित करण्यासाठी सुरू केलेल्या विशेष योजनेद्वारे भारतीय बँकांनी जमा केलेले १२७ अब्ज डॉलर्स हे देशातील बँकिंग क्षेत्रासाठी 'संजीवनी' ठरले असून यामुळे निधीची अडचण दूर होऊन तरलता वाढली आहे, असे एस अँड पी रेटिंग्सने म्हटले आहे.


८ जून ते ३१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत भारतीय बँकांनी एफसीएनआर (बी) खात्यांद्वारे ही विक्रमी परकीय चलनातील रक्कम उभी केली आहे.

अनिवासी भारतीयांना आकर्षित करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने ३ ते ५ वर्षांच्या या ठेवींवरील मुद्दलाचा पूर्ण हेजिंग खर्च स्वतः उचलला. यामुळे बँकांना डॉलर्समधील या ठेवींवर अधिक व्याजदर देणे शक्य झाले.

गेल्या चार वर्षांपासून कर्जाची वाढ ही ठेवींच्या वाढीपेक्षा जास्त होती. या नवीन ठेवींमुळे बँकांची निधी स्थिरता वाढेल आणि 'ॲसेट - लायबिलिटी' कालावधीतील तफावत भरून निघेल.

या ठेवींच्या तारणावर ग्राहकांना अधिक कर्ज घेण्याची मुभा देण्यात आल्यामुळे बँकांच्या बॅलन्स शीटचा आकार प्रत्यक्ष जमा रकमेपेक्षा मोठा होऊन तो १९० ते २२० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचू शकतो.

भारतीय बँका उच्च क्रेडिट-डिपॉझिट रेशो आणि ठेवींवरील तीव्र स्पर्धेचा सामना करत होत्या; या मध्यममुदतीच्या निधीमुळे हा ताण लक्षणीयरीत्या कमी झाला आहे.



जमा एकूण रक्कम : १२७ अब्ज डॉलर

ठेवींचा प्रकार	एफसीएनआर (बी)
कालावधी	८ जून ते ३१ ऑगस्ट २०२६
बँकिंग क्षेत्रातील वाटा	एकूण ठेवींच्या ४.५ टक्के
ठेवींची मुदत	३ ते ५ वर्षे (दीर्घकालीन सुनिश्चितता)
अपेक्षित प्रभाव	१९० ते २२० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढ होईल

भारतातील बँकांना एक प्रकारची संजीवनी मिळाली आहे. अनुकूल व्याजदरांमुळे अनिवासी भारतीय समुदायाने मोठी रक्कम मायदेशी पाठवली आहे. आम्ही या घडामोडीकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहतो. या आवकामुळे गेल्या चार वर्षांपासून कर्जाची वाढ ठेवींपेक्षा जास्त असणाऱ्या आव्हानात्मक परिस्थितीला मोठा दिलासा मिळाला आहे. या ठेवींचा कालावधी तीन ते पाच वर्षांचा असल्याने यामुळे बँकांच्या निधीची स्थिरता सुधारेल आणि अॅसेट-लायबिलिटी ड्युरेशनमधील तफावत कमी होण्यास मदत होईल.

- **गीता छाब्रा**, क्रेडिट ॲनालिस्ट, एस अँड पी ग्लोबल रेटिंग्स

दोन्ही सायबर भामट्यांची सशर्त जामिनावर सुटका

गोवन वार्ता ■ प्रतिनिधी
म्हापसा

मद्य वितरण कंपनीला दोन कोटींचा गंडा प्रकरण

गोव्यातील एका प्रसिद्ध मद्यवितरण कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा (सीईओ) व्हॉट्सॲप डीपी वापरून तसेच कंपनीच्या लेखापालाची दिशाभूल करून दोन कोटी रुपयांना गंडा घालण्यात आला होता. या प्रकरणी सायबर गुन्हे विभागाने अटक केलेल्या दीपक उद्धव म्हस्के (३८, रा. वडगाव, पुणे) आणि श्याम संदीप कासार (२९, रा. वडगाव, पुणे) या दोन्ही भामट्यांची म्हापसा न्यायालयाने सशर्त जामिनावर सुटका केली आहे.

प्रथमश्रेणी न्यायालयाचे न्यायाधीश योगेश गावकर यांनी प्रत्येकी २० हजार रुपये हमी रक्कम आणि तितक्याच रकमेचा हमीदार या अटीवर दोन्ही संशयितांचा जामीन मंजूर केला. न्यायालयाने संशयितांना पुराव्यांशी छेडछाड न करणे, साक्षीदार किंवा तक्रारदारांना न धमकाणे, देशाबाहेर पळून न जाणे, तपासात कोणताही अडथळा न आणणे, न्यायालय किंवा पोलिसांच्या आवश्यकतेनुसार हजर राहाणे, याशिवाय सायबर गुन्हे विभागात ४ दिवस सकाळच्यावेळी हजेरी लावण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. मद्य वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे सायबर गुन्हे विभागाने ८ सप्टेंबर रोजी भान्यासंच्या कलम ३१८(४), ३१९(२) व ३(५) तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६६-ड अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर १० सप्टेंबर रोजी पोलिसांनी पुणे विमानतळ परिसरातून दोन्ही संशयितांना अटक केली होती. पोलिसांच्या तपासानुसार, संशयितांनी कंपनीच्या लेखापालाला ई-मेल पाठवून त्यांचा लॅपटॉप हॅक केला. त्यानंतर कंपनीच्या सीईओचा व्हॉट्सॲप डीपी वापरून लेखापालाशी संवाद साधला आणि रक्कम हस्तांतरित करण्याच्या सूचना दिल्या. या सूचनांवर विश्वास ठेवून लेखापालाने आरटीजीएसच्या माध्यमातून दोन कोटी रुपये संबंधित खात्यात हस्तांतरित केले.

५० लाख रुपये जप्त करण्यात यश

फसवणुकीची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी संबंधित बँक खाते गोठवले. मात्र, त्यापूर्वी फसवणुकीतील सुमारे १.५० कोटी रुपये संशयितांनी आपल्या सहकाऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये जमा केल्याचे तपासात समोर आले. त्यामुळे पोलिसांना आतापर्यंत ५० लाख रुपये जप्त करण्यात यश आले आहे.

निवडक

एआय प्लस स्मार्टफोनचे नेटवर्क १,००० केंद्रांवर

पुणे : एआय प्लस स्मार्टफोनने भारतातील विक्रीनंतरची सेवा अधिक सक्षम करण्यासाठी देशभरातील सर्व्हिस सेंटर्सची संख्या १,००० हून अधिक करण्याची योजना जाहीर केली आहे. कंपनी दिवाळीच्या काळात दिल्लीत पहिले एक्सक्लुझिव्ह एआय प्लस सर्व्हिस सेंटर सुरू करणार आहे. भौतिक सेवा नेटवर्कच्या विस्तारासोबतच कंपनीने 'एआय प्लस असिस्टन्स ॲप'चीही घोषणा केली आहे. सध्या कंपनीचे देशभरात ८०० हून अधिक सर्व्हिस सेंटर्सचे नेटवर्क आहे. त्यात आणखी २०० हून अधिक केंद्रांची भर पडणार असून, त्यामुळे देशातील एआय प्लसच्या विक्रीनंतरच्या सेवेची व्याप्ती वाढणार आहे.

प्रेफरची लोन मोहिम सुरू

मुंबई : गणेशोत्सवात भक्त मूषकाच्या कानात इच्छा सांगून ती बाप्पापर्यंत पोहोचेल, असा विश्वास ठेवतात. यंदा प्रेफरने 'विश करा, प्रेफर करा' या संकल्पनेतून ११ दिवसांचे मूषक लोन अभियान सुरू केले आहे. अभियानाद्वारे लोकांना त्यांच्या इच्छा, योजना आणि सुरू करायच्या गोष्टी शेअर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

तोमास हेंड्रिक इल्वेस धोरणात्मक सल्लागार

मुंबई : बीएलएस इंटरनॅशनल सर्व्हिसेस लिमिटेड, सरकार आणि नागरिकांसाठी एक अग्रगण्य जागतिक एआय-चालित तंत्रज्ञान आणि विश्वसनीय डिजिटल सेवा भागीदार, एस्टोनियाचे माजी राष्ट्राध्यक्ष तोमास हेंड्रिक इल्वेस यांची जागतिक धोरणात्मक सल्लागार म्हणून नियुक्ती जाहीर करत आहे.

जसलीन कोहली 'फिनटेक पर्सन'

बेंगळुरू : डिजिट इन्शुरन्सच्या एमडी आणि सीईओ जसलीन कोहली यांना मुंबई येथे आयोजित ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२६ दरम्यान 'ग्लोबल फिनटेक पर्सन ऑफ द इयर - फीमेल' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. इनोव्हेशन, परिवर्तन आणि विकासासाठी योगदान देणाऱ्या नेत्यांचा गौरव केला जातो.

बीएमडब्ल्यू ७ सीरिजची नवी श्रेणी दाखल

गुरुग्राम : बीएमडब्ल्यू इंडियाने भारतात बहुप्रतीक्षित नवी बीएमडब्ल्यू ७ सीरिज सादर केली आहे. कंपनीची फ्लॅगशिप सेदान आता पेट्रोल तसेच ऑल-इलेक्ट्रिक पॉवरट्रेनच्या पर्यायात उपलब्ध होणार आहे. ऑल-इलेक्ट्रिक परफॉर्मन्स मॉडेल बीएमडब्ल्यू आय७ एम७० देखील भारतीय ग्राहकांसाठी उपलब्ध करण्यात आले असून ते बीएमडब्ल्यू ७ सीरिजमधील सर्वाधिक शक्तिशाली मॉडेल असल्याचे कंपनीने म्हटले आहे. नव्या बीएमडब्ल्यू ७ सीरिज सेदानमध्ये कंपनीच्या पारंपरिक डिझाइनची वैशिष्ट्ये कायम ठेवतानाच भविष्योन्मुख 'न्यू क्लास' स्टायलिंगचा वापर करण्यात आला आहे.

इन्व्हेस्टर कॉन्फिडन्स



'जेपी मॉर्गन इंडिया इन्व्हेस्टर कॉन्फरन्स'च्या निमित्ताने केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी 'जेपी मॉर्गन चेस अँड कंपनी'चे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जेमी डायमन यांच्यासोबत मुंबईत सोमवारी चर्चा केली.

भारत'-'कॅनडा'चर्चा'ऑक्टोबरमध्ये'

नवी दिल्ली : भारत आणि कॅनडा दरम्यानच्या सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करारासाठीच्या वाटाघाटी प्रगतीपथावर असून चर्चेची पुढील फेरी ५ ऑक्टोबरपासून आयोजित केली जाईल, अशी माहिती वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी सोमवारी दिली.

पुढील ९० दिवस कॅनडा-भारत संबंधांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतील, असे त्यांनी



पत्रकारांना सांगितले.

वाटाघाटींची चौथी फेरी १८ सप्टेंबर रोजी येथे पार पडली. दोन्ही देशांनी या वर्षाच्या अखेरपर्यंत चर्चा पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवल्यामुळे वाटाघाटी वेगाने पुढे सरकत आहेत.

न्यूझीलंड - भारत व्यापार करार २० ऑक्टोबरपासून

नवी दिल्ली : भारत आणि न्यूझीलंड दरम्यानचा मुक्त व्यापार करार २० ऑक्टोबरपासून लागू होईल, अशी माहिती वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी दिली. गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी दोन्ही देशांनी २७ एप्रिल रोजी मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी केली होती.

कमोडिटी फ्युचर्स



कच्चे तेल : ऑक्टोबर डिलिव्हरीच्या कच्च्या तेलाच्या दरात १३८ रुपये म्हणजेच १.५ टक्क्यांची घसरण होऊन दर प्रति बॅरल ९,०८५ रुपयांवर आला. या व्यवहारात ७,०६३ लॉट्सची उलाढाल झाली. प्रत्यक्ष बाजारातील मागणीतील नरमाई आणि जागतिक बाजारातील नकारात्मक संकेतांमुळे मोठ्या प्रमाणावर पोझिशन्स कमी करण्यात आल्याने दरावर दबाव आल्याचे विश्लेषकांनी सांगितले.

सोने : ऑक्टोबर डिलिव्हरीच्या सोन्याच्या दरात ७७३ रुपये म्हणजेच ०.५ टक्क्यांची घसरण होऊन दर प्रति १० ग्रॅम १,५३,६०८ रुपयांवर आला. या व्यवहारात ९९८ लॉट्सची उलाढाल झाली. प्रत्यक्ष बाजारातील मागणी मंदावल्याने गुंतवणूकदारांनी आपली पोझिशन्स कमी केल्यामुळे सोन्यावर विक्रीचा दबाव राहिला.

चांदी : डिसेंबर डिलिव्हरीच्या चांदीच्या दरात २,०२४ रुपये म्हणजेच ०.८४ टक्क्यांची घसरण होऊन दर प्रति किलो २,३९,५७९ रुपयांवर आला. व्यवहारात २,०९६ लॉट्सची उलाढाल झाली. बाजारातील नाजूक स्थितीच्या पार्श्वभूमीवर गुंतवणूकदारांनी लीव्हरेज्ड पोझिशन्स कमी केल्याने चांदीवर मोठ्या प्रमाणात विक्रीचा दबाव आला.

तांबे : ऑक्टोबर डिलिव्हरीच्या तांब्याच्या दरात २.६० रुपये म्हणजेच ०.४५ टक्क्यांची वाढ होऊन दर प्रति किलो १,४१४ रुपयांवर पोहोचला. या व्यवहारात ७६१ लॉट्सची उलाढाल झाली. प्रत्यक्ष बाजारातील मागणीविषयक चौकशी वाढल्याने तांब्यामध्ये नव्याने सट्टेबाज खरेदी झाली.



ॲल्युमिनियम : ऑक्टोबर डिलिव्हरीच्या ॲल्युमिनियमच्या दरात ५५ पैसे म्हणजेच ०.१६ टक्क्यांची घसरण होऊन दर प्रति किलो ३५१.४० रुपयांवर आला. व्यवहारातील उलाढाल १११ लॉट्स होती. प्रत्यक्ष बाजारातील स्थिती नरम राहिल्याने गुंतवणूकदारांनी पोझिशन्स कमी केल्या आणि त्यामुळे ॲल्युमिनियमवर मर्यादित विक्रीचा दबाव राहिला.

झिंक : ऑक्टोबर डिलिव्हरीच्या झिंकच्या दरात २.१० रुपये म्हणजेच ०.५ टक्क्यांची वाढ होऊन दर प्रति किलो ४१९.२० रुपयांवर पोहोचला. या व्यवहारात २५५ लॉट्सची उलाढाल झाली. प्रत्यक्ष बाजारातील मागणी मजबूत झाल्याने गुंतवणूकदारांनी पोझिशन्स वाढवल्यामुळे झिंकला आधार मिळाला.

कॉटनसीड ऑइल केक : डिसेंबर डिलिव्हरीच्या कॉटनसीड ऑइल केकच्या दरात १४ रुपये म्हणजेच ०.३५ टक्क्यांची घसरण होऊन दर प्रति क्विंटल ३,३०५ रुपयांवर आला. खुला व्यवहार ८,६३० लॉट्सचा होता.

गवार बी : ऑक्टोबर डिलिव्हरीच्या ग्वारसीडच्या दरात १७ रुपये म्हणजेच ०.२५ टक्क्यांची घसरण होऊन दर प्रति क्विंटल ६,८८१ रुपयांवर आला.

गवार गम : ऑक्टोबर डिलिव्हरीच्या ग्वारगमच्या दरात १३ रुपये म्हणजेच ०.१० टक्क्यांची घसरण होऊन दर प्रति क्विंटल १३,२८० रुपयांवर आला. बाजारातील सहभाग ७६,०४५ लॉट्स होता.

धणे : ऑक्टोबर डिलिव्हरीच्या धण्याच्या दरात २२२ रुपये म्हणजेच १.५५ टक्क्यांची मोठी घसरण होऊन दर प्रति क्विंटल १४,०८८ रुपयांवर आला.

नियुक्तीदारांचा प्रतिसाद मात्र कमी; जाहिरात क्षेत्रात महिलांना प्राधान्य

फ्रंटलाइनसाठी महिला उमेदवार अधिक

नवी दिल्ली : फ्रंटलाइन नोकऱ्यांसाठी अर्ज करणाऱ्यांमध्ये आता महिलांचे प्रमाण ४३.५ टक्के झाले आहे (मागील वर्षी हे प्रमाण ४०.४ टक्के होते).

केवळ १३ टक्के जाहिरातींमध्ये विशेषतः महिलांना लक्ष्य केले जाते. यामुळे उमेदवारांची उत्सुकता आणि नियुक्तीदारांचा प्रतिसाद यातील तफावत स्पष्ट होते.

जून आणि जुलै २०२६ मध्ये नोकरीच्या अर्जांमध्ये वर्षागणिक ६५ टक्के वाढ झाली. तर नोकरीच्या जाहिरातींमध्ये ४० ते ४८ टक्के वाढ नोंदवण्यात आली.

विक्री श्रेणीला सर्वाधिक ५६



आमच्यासाठी सर्वात प्रत्साहक निष्कर्षांपैकी एक म्हणजे अधिक महिला आता सक्रियपणे कामाच्या शोधात आहेत. रोजगार हा केवळ एका व्यक्तीचे उत्पन्न बदलत नाही. तर तो संपूर्ण कुटुंबाचा आर्थिक प्रवास बदलू शकतो. परंतु नियुक्तीदारांच्या मागणीमध्ये अजूनही सुधारणेला वाव आहे, असे डेटा दर्शवतो. उद्योगांनी सुलभता, लवचिकता, सुरक्षितता आणि कामाच्या ठिकाणाची रचना यासारख्या अडचणी दूर केल्या तर भारताच्या वाढत्या फ्रंटलाइन अर्थव्यवस्थेसाठी महिला हा एक अत्यंत महत्त्वाचा गुणवत्ता स्रोत बनू शकतात.

- **निलेश डुंगरवाल**, सह-संस्थापक आणि सीईओ, वर्कइंडिया

लाखांहून अधिक अर्ज प्राप्त झाले. यानंतर कार्यालयीन भूमिका तसेच प्रवास आणि आदरातिथ्य क्षेत्राचा क्रमांक लागतो.

सौंदर्य तज्ज्ञ भूमिकांसाठी ८६.६ टक्के आणि शिक्षक भूमिकांसाठी ८०.७ टक्के अर्ज महिलांचे होते.

महिला आता विक्री, कार्यालयीन कामे, विपणन आणि ग्राहक सेवा यांसारख्या व्यापक फ्रंटलाइन संधींचा वेगाने शोध घेत आहेत.

माहिती तंत्रज्ञान, मनुष्यबळ विकास, अकाउंट्स, सेल्स, ऑफिस-बेस्ड रोल्समध्ये स्पर्धा आहे; तर डिलिव्हरी, ड्रायव्हिंग आणि मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात तुलनेने कमी अर्ज येत आहेत, असे अहवालात म्हटले आहे.

महिला विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढवण्याचे उद्दिष्ट

शुल्क माफी, स्वतंत्र वसतिगृह, विशेष सुविधांची मारुती सुझुकीची घोषणा

नवी दिल्ली : मारुती सुझुकी इंडियाने आपल्या मानेसर (हरियाणा) येथील 'जपान-इंडिया इन्स्टिट्यूट फॉर मॅन्युफॅक्चरिंग'मध्ये महिला विद्यार्थ्यांचे प्रमाण शैक्षणिक वर्ष २०२८-२९ पर्यंत ३० टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट ठरवले आहे.

सध्या या संस्थेमध्ये महिला विद्यार्थ्यांचा प्रवेशाचे प्रमाण ९ टक्के आहे. चालू शैक्षणिक वर्षापासून महिला विद्यार्थ्यांसाठी शुल्क माफी लागू करण्यात आली आहे.



त्यांच्यासाठी एक स्वतंत्र महिला वसतिगृह उभारले जात आहे. जपान-इंडिया इन्स्टिट्यूट फॉर मॅन्युफॅक्चरिंग हा भारत आणि जपान सरकारचा एक संयुक्त उपक्रम आहे. याचा मुख्य उद्देश भारतातील उत्पादन क्षेत्रासाठी कुशल मनुष्यबळ तयार करणे हा आहे.

महिलांची नावनोंदणी वाढवण्यासाठी सर्वसमावेशक दृष्टिकोन स्वीकारत आहोत. यामध्ये त्यांना आधारभूत आणि अनुकूल असे शिक्षण वातावरण तयार करण्यावर मुख्य भर दिला जात आहे. प्राध्यापक, सहाय्यक पदांवर महिलांचे प्रतिनिधित्व वाढवणे हे उपाय आहेत.

- **राहुल भारती**, वरिष्ठ कार्यकारी अधिकारी, कॉर्पोरेट अफेयर्स, मारुती सुझुकी इंडिया

नमस्कार आमुचा या ज्ञानमंदिरा!




प्रा. जयवंत पाटील

ज्ञान, संस्कार आणि नवोन्मेषाची सांगड घालत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला दिशा देणारे अंबरनाथमधील ज्ञानामृत विद्यालय परिवर्तनशील शिक्षणाचा आदर्श निर्माण करीत आहे.

परिवर्तन शिक्षण संस्थेचे 'ज्ञानामृत विद्यालय'





'शिक्षण हे परिवर्तनाचे साधन आहे' हे ध्येय मनाशी ठरवून विद्यार्थ्यांना ज्ञानामृत पाजणारे परिवर्तन शिक्षण संस्थेचे 'ज्ञानामृत विद्यालय' (अंबरनाथ, जि. ठाणे) गेल्या अनेक वर्षांपासून शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात दिमाखात कार्य करत आहे. शिक्षण हे परिवर्तनाचे साधन आहे, या उद्देशाने परिवर्तन शिक्षण संस्थेची स्थापना १ जानेवारी १९९५ रोजी करण्यात आली. संस्थेचे संस्थापक मा. किसनजी अमृत वराडे हे आहेत.

परिवर्तन शिक्षण संस्थेची स्थापना झाल्यावर प्रथम ज्ञानामृत विद्यालय (माध्यमिक), अंबरनाथ ही शाळा शासनाच्या परवानगीने सुरू करण्यात आली. सुरुवातीला इयत्ता आठवीचा वर्ग साई विभाग, अंबरनाथ येथे एका इमारतीच्या बेसमेंटमध्ये सुरू झाला. थोड्याच दिवसांत ही शाळा अंबरनाथमधील दुर्गादेवी पाडा या झोपडपट्टी परिसरात शासनाच्या परवानगीने स्थलांतरित करण्यात आली. इयत्ता दहावी मार्च १९९९ च्या शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस शाळेची प्रथम बॅच प्रविष्ट झाली; तेव्हापासून आजतागायत या शाळेचा निकाल ९०% ते १००% च्या दरम्यान कायम आहे.

सध्या ज्ञानामृत बालवाडी विभागात ११८ विद्यार्थी, प्राथमिक विभागात (मातोश्री देवकाबाई वराडे प्राथमिक विद्यालय) ३५० विद्यार्थी आणि माध्यमिक विभागात ६८७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. दुर्गादेवी पाडा, अंबरनाथ (पूर्व) येथे एका वर्गापासून सुरू झालेली ही शाळा आज एका परिपूर्ण बैठ्या स्वरूपाच्या इमारतीमध्ये पूर्ण क्षमतेने सुरू आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी लागणाऱ्या सर्व सुविधा आज शाळेत उपलब्ध असून, या शाळेमुळे संपूर्ण परिसरात शिक्षणाचे महत्त्व पटले आहे.

शाळेतील भौतिक सुविधा व तंत्रज्ञान शाळेला आज ३२ वर्षे पूर्ण झाली असून, शाळेत संगणक कक्ष, प्रयोगशाळा, ग्रंथालय, ई-लर्निंगकरिता दोन दूरदर्शन संच, दोन प्रोजेक्टर आणि पिण्याच्या पाण्याकरिता अद्ययावत फिल्टर व थंड पाण्याकरिता कुलर उपलब्ध आहे. विद्यार्थी त्याचा दैनंदिन लाभ घेतात. मुलींकरिता सॅनिटरी पॅड मशिन महिला शिक्षकांच्या कक्षात ठेवण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या संरक्षणाकरिता संपूर्ण शाळा सी.सी.टीव्ही. युक्त करण्यात आली असून मुलांसाठी अद्ययावत स्वच्छतागृहाची बांधणी करण्यात आली आहे. सर्व प्रकारच्या भौतिक सुविधा शाळेत देण्याचा नेहमी प्रयत्न असतो. विद्यार्थ्यांना लैंगिक अत्याचारापासून सावध करण्यासाठी मार्गदर्शनपर कार्यक्रमांतून विद्यार्थ्यांनी कोणती सावधगिरी बाळगावी, याविषयी विविध तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाते.

शाळेच्या गुणवत्तेत नेहमी वाढच होत आहे. २००२-२००३ या शैक्षणिक वर्षात शाळेतील इ. ९ वीच्या वर्गातील विद्यार्थी जयेश किसन वराडे आणि हरेश वाघ हे 'झी टीव्ही'च्या 'अल्फा स्कॉलर' या Live कार्यक्रमामध्ये उपान्त्य फेरीपर्यंत पोहोचले होते. तसेच शैक्षणिक वर्ष २००२-२००३ मध्ये तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात 'पाणी टंचाईत वनस्पतींना पाणी पुरविणे' या विज्ञान प्रकल्पाला द्वितीय क्रमांक मिळून तो जिल्हास्तरावर पोहोचला होता. शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये तालुकास्तरीय विज्ञान व गणित प्रदर्शनात 'गणित विज्ञानातील गमती' या प्रकल्पास प्रथम क्रमांक मिळून तो जिल्हास्तरावर पोहोचला होता. परिवर्तन शिक्षण संस्थेने ज्ञानामृत विद्यालयात अंबरनाथमधील पहिले बालसाहित्य संमेलन भरविले होते. एका इमारतीच्या बेसमेंटमध्ये सुरू होऊन एक वर्गखोली ते १६ खोल्या, अद्ययावत स्वच्छतागृह आणि झाडांच्या सान्निध्यात दुमदार बैठ्या इमारतीत ही शाळा दिमाखात उभी आहे नाविन्यर्ण उपक्रम परिवर्तन शिक्षण संस्थेच्या ज्ञानामृत विद्यालयात (माध्यमिक) दरवर्षी मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. दरवर्षी रक्षाबंधनानिमित्त शाळेतील विद्यार्थी स्वतःच्या हाताने बनवलेली राखी सीमेवरील जवानांना पोस्टाने पाठवतात. वसुंधरा संरक्षणानिमित्त मुलांना घरी अथवा शालेय परिसरात वृक्ष-लागवड करण्यास प्रवृत्त केले जाते. याशिवाय काव्यगायन व काव्यलेखन स्पर्धा घेतल्या जातात.





पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मुलांकडून दरवर्षी 'फटाकेमुक्त दिवाळी' हा उपक्रम राबवला जातो आणि त्यातून बचत झालेल्या पैशांतून गरजू व्यक्तींना मदत करण्यास मुलांना प्रवृत्त केले जाते. वाईट विचारांची प्रतिकात्मक होळी केली जाते. दरवर्षी गुढीपाडव्यानिमित्त शाळेत विविध ग्रंथ व पुस्तकांची एकत्रित 'ज्ञानस्वरूपी गुढी' उभारली जाते. १ जानेवारीला संस्थेच्या वर्धापनदिनानिमित्त 'आनंद मेळाव्याचे' आयोजन करून मुलांना स्व-कमाईची प्रेरणा दिली जाते.

राष्ट्रीय, राज्य व जिल्हा स्तरावरील यश ज्ञानामृत विद्यालयातील विद्यार्थी राज सावंत याने जिल्हास्तरीय वाहतूक विभागाकडून घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत ५,००० चित्रांतून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. या स्पर्धेचे बक्षीस वितरण ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या हस्ते डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह, ठाणे येथे झाले. तसेच 'राज सावंत' व 'यश म्हस्के' यांना बालाजी किणीकर प्रतिष्ठान आयोजित चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे (प्रत्येकी १०,००० रुपये, ट्रॉफी व प्रशस्तीपत्र) बक्षीस मिळाले. आमदार बालाजी किणीकर आयोजित चित्रकला स्पर्धेत निखिल मदने या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक (७,००० रुपये रोख, ट्रॉफी व प्रशस्तीपत्र) मिळवला. शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये NMMS स्पर्धा परीक्षेत श्रावणी विकी आगळे या विद्यार्थिनीने जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान पटकावले.

विज्ञान, तंत्रज्ञान आणि AI ची गोडी विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यांची गोडी वाढवण्यासाठी व भावी शास्त्रज्ञ घडवण्यासाठी शाळा प्रात्यक्षिक शिक्षण व हँड्स-ऑन प्रोजेक्ट्सवर भर देते.

■ **विज्ञान प्रदर्शन व व्याख्याने :** २८ फेब्रुवारी (विज्ञान दिन) रोजी विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन केले जाते, ज्यामध्ये विद्यार्थी टाकाऊ पदार्थांपासून टिकाऊ मॉडेल बनवतात. गैरसमज दूर करण्यासाठी शास्त्रज्ञांची व्याख्याने आयोजित केली जातात.

■ **प्रयोगातून विज्ञान व क्षेत्रभेटी :** 'प्रयोगातून विज्ञान' उपक्रमांतर्गत विद्यार्थी प्रत्यक्ष कृती करतात. वज्रेश्वरी येथे दिलेल्या क्षेत्रभेटीत विद्यार्थ्यांनी गरम पाण्याच्या झऱ्यांमागील विज्ञान समजून घेतले.

■ **स्मार्ट शिक्षण व स्पर्धा :** विज्ञान मॅरेथॉन व मराठी विज्ञान स्पर्धांचे आयोजन केले जाते. सौर ऊर्जा, कंपोस्ट खत यांसारखे छोटे मॉडेल तयार केले जातात. तसेच स्मार्ट टीव्हीच्या माध्यमातून विज्ञानाचे नियम परिणामकारकरित्या शिकवले जातात.

कौशल्य विकास व तंत्रज्ञान वापर विद्यार्थ्यांना संगणक साक्षरतेसाठी प्रत्यक्ष संगणक हाताळणीचा अनुभव दिला जातो. इंटरनेट, विविध Apps आणि Zoom meeting द्वारे तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेतले जाते. विविध स्पर्धांचे बॅनर तयार करण्यासाठी विद्यार्थी व शिक्षक ChatGPT चा वापर करतात. याशिवाय रंगकाम, कागदकाम, मातीकाम, माळीकाम, भरतकाम आणि शिलाईकाम यांसारखे व्यवसायाभिमुख व कार्यानुभावाधारित शिक्षण दिले जाते.

शाळेचे वेगळेपण मुलांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी म्हणून २७ फेब्रुवारी २०२३ रोजी अंबरनाथमधील पहिले 'बालसाहित्य संमेलन' भरविण्यात आले. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त बालसाहित्यिक एकनाथ आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली हे संमेलन पार पडले.

■ **शैक्षणिक गुणवत्ता :** इ. ९ वी व १० वीसाठी जादा तासिका, दर रविवारी १० वीची सराव परीक्षा, कमकुवत व स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त मार्गदर्शन दिले जाते.

■ **इतर उपक्रम :** अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातून प्रात्यक्षिके, ग्रंथदिंडी, साहित्यिकांच्या गाठीभेटी, करिअर मार्गदर्शन, अंध-अनाथ आश्रम व वृद्धाश्रमांना भेटी, आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप केले जाते.

■ **विशेष सन्मान :** दरवर्षी SSC परीक्षेत शाळेतून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला १५ ऑगस्ट (स्वातंत्र्यदिनी) ध्वजारोहण करण्याचा सन्मान दिला जातो. मार्च-२०१९ च्या परीक्षेत देविदास रणजीत पाटोळे हा विद्यार्थी मराठी माध्यमातून अंबरनाथ तालुक्यातून प्रथम आला होता.

हसत-खेळत शिक्षण व क्रीडा क्षेत्र आनंददायी शनिवार, कवायत, योगा, वर्गमंत्रिमंडळ, बालसभा, आणि सणांच्या निमित्ताने (राखी, आकाशकंदील, दिवे रंगवणे, रांगोळी) शैक्षणिक वातावरण आनंददायी केले जाते.

■ **मैदानी व इनडोअर खेळ :** शाळेत कबड्डी, खो-खो, क्रिकेट, धावणे, बुद्धिबळ, बॅडमिंटन व कॅरम खेळांचा सराव घेतला जातो. ५ दिवसांच्या क्रीडा स्पर्धेत सर्व विद्यार्थी उत्साहाने भाग घेतात.

■ **क्रीडा क्षेत्रातील उत्तुंग भरारी :** कबड्डी संघात दिपाली भोजने, पूजा गजाई, किर्ती पांडे, अस्मिता पंदीरकर व देविता कदम यांनी यश मिळवले. मयुरी जगन्नाथ भोसले (२००९-१०), सोनू अशोक गायकवाड (२०१२-१३ - विशाखापट्टणम), देविका दत्तात्रय कदम (२०१५-१६ - केरळ व राजस्थान राष्ट्रीय स्पर्धा), पूजा कल्याणराव गजाई (२०१०-११) आणि मोहिनी केशव सोर (२०१३-१४) यांनी राज्य व राष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करून शाळेचे नाव उज्ज्वल केले.

सामाजिक बंधुभाव व राष्ट्रीय एकात्मता विद्यार्थ्यांवर सुसंस्कार व्हावेत म्हणून प्रभातफेरी, पथनाट्य, सर्वधर्म प्रार्थना, देशभक्तीपर समूहगीते, वादविवाद स्पर्धा, ऐतिहासिक किल्ले व संग्रहालयांना सहली आयोजित केल्या जातात.

सरकारकडून अपेक्षा

■ शिक्षणात व्यवसायाभिमुख व प्रात्यक्षिक शिक्षणाचा समावेश करावा.

■ मुलांना सरसकट उत्तीर्ण न करता गुणदान पद्धत व अनुत्तीर्णतेचा नियम पुनरुज्जीवित करावा.

■ पुस्तकी ज्ञानापेक्षा जबाबदार नागरिक बनवणारे शिक्षण द्यावे.

■ शिक्षकांवरील बिन-शिक्षण कामे (शासकीय कामे) कमी करावीत.

■ ग्रामीण, आदिवासी व झोपडपट्टी परिसरातील शाळांना शासनाने आर्थिक मदत करावी.

मराठी शाळा टिकवण्यासाठी उपाययोजना मराठी शाळांची गळती थांबवण्यासाठी सेमी-इंग्लिश माध्यम, पुरेसे अनुदान आणि मराठी भाषेचा अभिमान जागवणारे उपक्रम राबवले पाहिजेत. आधुनिक व गुणवत्तापूर्ण डिजिटल अध्यापन, इंग्रजी भाषेचे उत्तम ज्ञान, पालकांमध्ये मातृभाषेच्या शिक्षणाविषयी जागृती आणि पायाभूत सुविधांचा विकास करून मराठी शाळा सक्षम केल्या पाहिजेत.

संस्थेचे नेतृत्व अध्यक्ष लक्ष्मण अमृत वराडे, सचिव किसन अमृत वराडे आणि कोषाध्यक्षा मालती बाळू वराडे यांच्या कुशल नेतृत्वाखाली तसेच माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक विजय भिका राणे व देवकाबाई वराडे प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मालती वराडे यांच्या उत्तम साथीतून शाळेच्या प्रगतीचा आलेख उत्तरोत्तर उंचावत आहे.

सेवानिवृत्त प्राचार्य,
अध्यक्ष, शिक्षक साहित्य संमेलन संस्था.



सुरेश वांदिले

करिअर कन्सेप्ट

नव्या संकल्पना, नवे उद्योग!

कल्पनेला उद्योगाची जोड, कौशल्याला रोजगाराची संधी आणि तरुणाईला स्वावलंबनाची दिशा देण्यासाठी केंद्र सरकारच्या विविध योजना महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. स्टार्टअपपासून रोजगारनिर्मितीपर्यंतच्या या योजनांमधून उपलब्ध संधींचा वेध...



'स्टार्टअप इंडिया' योजनेला जानेवारी २०२६ मध्ये १० वर्षे पूर्ण झालीत. या दशकात या योजनेने २१ लाखाच्या आसपास तरुणांच्या नवसंकल्पनांना पंख दिले, रोजगारनिर्मितीला चालना दिली. योग्य नियोजन, चिकाटी आणि नवकल्पनांची साथ असल्यास या योजनेच्या माध्यमातून यशस्वी उद्योजक बनता येतं, हे अनेक तरुण-तरुणींनी सिध्द केलं.

जागतिकीकरण आणि डिजिटल क्रांती यामुळे तरुण पिढी आत्मविश्वासानं उद्योजकतेकडे वळू पाहतेय हे लक्षात घेऊन केंद्र सरकारने ही योजना सुरू केली. नव्यानं उद्योजकतेत येऊ पाहणाऱ्या पिढीसाठी इज ऑफ डुईंग बिझिनेस (व्यवसाय सुलभता), नवोपक्रम, संशोधन व विकास यावर भर देण्यात आला.

योजनेची उद्दिष्टे – (१) देशात नवउद्योगांची संख्या वाढवणं, (२) तरुणांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणं, (३) तंत्रज्ञानाधारित व नवकल्पनांवर आधारित उद्योगांना प्रोत्साहन देणं, (४) गुंतवणूकदार आणि उद्योजक यांच्यात दुवा निर्माण करणं, (५) स्टार्टअप्ससाठी सुलभ कायदेशीर व प्रशासकीय वातावरण तयार करणं.

एखादी कंपनी पुढील अटी पूर्ण करत असल्यास तिला भारत सरकारमार्फत 'स्टार्टअप' म्हणून मान्यता दिली जाते – (१) नोंदणी झाल्यापासून १० वर्षांपेक्षा कमी कालावधी असावा, (२) वार्षिक उलाढाल १०० कोटी रुपयांपेक्षा कमी असावी,(३) नवकल्पना, उत्पादन किंवा सेवा विकसित करण्यावर भर असावा, (४) आधीपासून अस्तित्वात असलेल्या व्यवसायाचं विभाजन केलेलं नसावं.

मिळणारे लाभ आणि सुविधा

१. स्टार्टअप इंडिया सीड फंड (सुरुवातीचे भांडवल) योजना – ही योजना सुरुवातीच्या टप्प्यातील स्टार्टअप्ससाठी आहे. अशा स्टार्टअप्सना संकल्पना सिद्ध करणं, प्रोटोटाइप (नमूना) तयार करणं किंवा बाजारपेठेत प्रवेश करण्यासाठी भांडवलाची गरज असते. त्यांना या योजनेमार्फत २० लाख ते ५० लाख रुपयांपर्यंत आर्थिक मदत दिली जाते. यामुळे सुरुवातीच्या काळात कर्ज घेण्याची गरज पडत नाही.

२. फंड ऑफ फंड्स फॉर स्टार्टअप्स : सरकारने १०,००० कोटी रुपयांचा एक निधी तयार केला आहे. हा निधी थेट स्टार्टअपला न देता सेबी (सेक्युरिटीज अॅण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया-

भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ) कडे नोंदणी झालेल्या असलेल्या 'व्हेंचर कॅपिटल(जोखमीचे भांडवल') कंपन्यांना दिला जातो. चांगल्या आणि प्रगती करण्याची क्षमता असलेल्या स्टार्टअप्समध्ये या कंपन्या गुंतवणूक करतात. यामुळे स्टार्टअप्सना विस्तार करण्यासाठी भांडवल उपलब्ध होते.

३. क्रेडिट गॅरंटी स्कीम फॉर स्टार्टअप्स : या योजनेअंतर्गत, स्टार्टअप्सना बँकांकडून किंवा वित्तीय संस्थांकडून विनातारण कर्ज मिळवून दिलं जातं. या कर्जाची हमी सरकार घेते. यामुळे स्टार्टअप्सना बँका सुलभतेने कर्ज देतात.

४. मुद्रा योजना आणि इतर बँक कर्ज : लघु उद्योगांसाठी असलेल्या 'मुद्रा योजने'चा लाभ स्टार्टअप्स घेऊ शकतात. यामध्ये 'शिशु', 'किशोर' आणि 'तरुण' अशा तीन श्रेणींमध्ये ५०,००० ते १० लाख रुपयांपर्यंतचं कर्ज दिलं जातं.

५. कर सवलतीद्वारे होणारी बचत : आयकरात मिळणारी ३ वर्षांची सवलत स्टार्टअपला त्यांचं उत्पन्न पुन्हा व्यवसायात गुंतवण्यास मदत करते. यामुळे सुरुवातीच्या काळात स्टार्टअपचा कॅश-फ्लो (व्यवसायातील रोख भांडवलाची आवक-जावक)चांगला राहतो. भांडवली नफ्यावर काही प्रमाणात सूट दिली जाते.

६. स्वयं प्रमाणीकरण (सेल्फ सर्टिफिकेशन) : अंतर्गत कामगार व पर्यावरण कायदे, ट्रेडमार्क व डिझाइन नोंदणीवर सवलत दिली जाते.

७. पेटंटमध्ये सवलत : बौद्धिक संपदा नोंदणीसाठी लागणाऱ्या शुल्कात ८०% पर्यंत सूट दिली जाते.

८. सरकारी कंत्राटे : अनेक सरकारी निविदांमध्ये स्टार्टअप्सना अनुभवाच्या अटीतून सूट दिली जाते.

९. शासकीय व खासगी इनक्युबेशन सेंटर्स- तज्ज्ञ मार्गदर्शन (मेंटॉरशीप), उद्योग-जोडणी कार्यक्रम यांचा लाभ लाभार्थींना अधिक प्रमाणात स्टार्टअप्स पुढे आले.

योजनेचा लाभ कसा घ्यावा?

टप्पा १ : कल्पनेची निश्चिती- यामध्ये समस्येची ओळख, नाविन्यपूर्ण व व्यवहार्य उपाय, बाजारपेठेचा अभ्यास यांचा समावेश होतो.

दिला जातो.

गेल्या दहा वर्षात भारतात दोन लाखाच्या आसपास स्टार्टअप्सची नोंदणी झाली. आयटी, फिनटेक, हेल्थटेक, ॲग्रीटेक, एडटेक, क्लीन एनर्जी, स्पेस टेक्नॉलॉजी अशा विविध क्षेत्रांत या स्टार्टअप्सनी भरीव कामगिरी केल्याचं दिसून येते. अनेक 'युनिकॉर्न' कंपन्या (१ अब्ज डॉलरपेक्षा जास्त मूल्यांकन) उदयास आल्या. टियर-२ व टियर-३ शहरांमधूनही निम्म्याहून

टप्पा २ : कंपनी नोंदणी- यामध्ये प्रायव्हेट लिमिटेड(खाजगी मर्यादित कंपनी) / लिमिटेड लायबिलीटी पार्टनरशीप- मर्यादित दायित्व भागिदारी संस्था/ पार्टनरशिप (भागिदारी) नोंदणी , आवश्यक कायदेशीर कागदपत्रे तयार करणे या बाबींचा समावेश होतो.

टप्पा ३ : स्टार्टअप इंडिया पोर्टलवर नोंदणी-startupindia.gov.in वर लॉगिन करा, त्यानंतर आवश्यक माहिती व कागदपत्रे अपलोड करा, त्यानंतर डीपीआयआयटी (डिपार्टमेंट फॉर प्रमोशनकडून ऑफ इंडस्ट्री अँड इंटरनल ट्रेड)-मान्यता मिळेल.

टप्पा ४ : निधी व मार्गदर्शन- यामध्ये इनक्युबेटरशी संपर्क, सरकारी / खासगी निधी योजनांसाठी अर्ज, उद्योग तज्ज्ञांचं मार्गदर्शन या बाबींचा समावेश होतो.

आवश्यक कागदपत्रे

(१) कंपनी नोंदणी प्रमाणपत्र, (२) पॅन कार्ड, (३) संचालक / भागीदारांचे ओळखपत्र, (४) व्यवसाय संकल्पना, (५) बँक खाते तपशील, (५) नवकल्पना दर्शवणारे दस्तऐवज

संपर्क- स्टार्टअप इंडिया पोर्टल : startupindia.gov.in,टोल फ्री क्रमांक: १८००-११५-५६५, ईमेल: dipp-startups@nic.in

रोजगार,कौशल्य विकास आणि सामाजिक सुरक्षा

भारत हा सध्या जगातील सर्वात मोठा तरुणांचा देश ठरला आहे. दरवर्षी लाखो तरुण-तरुणी रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या शोधात कार्यरत असतात. या पार्श्वभूमीवर रोजगारनिर्मिती आणि कौशल्यविकासाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारने एक विशेष पॅकेज जाहीर केलं. त्याचाच महत्त्वाचा भाग म्हणून प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना (पीएमव्हीबीआरवाय) सुरू करण्यात आली.

ही योजना १ ऑगस्ट २०२५ पासून कार्यान्वित करण्यात आली असून तिचा कालावधी ३१ जुलै २०२७ पर्यंत निश्चित करण्यात आला आहे. या दोन वर्षांच्या कालावधीत देशातील तरुण-तरुणींना औपचारिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातील. उद्योग-व्यवसायांना रोजगारनिर्मितीसाठी प्रोत्साहन दिलं जाईल. ही योजना केवळ रोजगारपुरती मर्यादित नसून, तिच्यामार्फत देशाच्या आर्थिक विकासाला गती देण्यात येईल. औपचारिक रोजगार वाढल्यास सामाजिक सुरक्षा कवच विस्तारेल, कर संकलन मजबूत होईल आणि विविध क्षेत्रांतील उद्योगांना विस्तारासाठी पूरक वातावरण मिळेल.

योजनेची रचना

प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेअंतर्गत कर्मचारी आणि नियोक्ता, दोघांनाही प्रोत्साहन देण्यात येईल. प्रथमच औपचारिक क्षेत्रात नोकरी करणाऱ्या तरुण-तरुणींना आर्थिक प्रोत्साहन देण्यात येईल. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संस्था (एम्प्लॉयमेंट प्रॉव्हिडंट फंड ऑर्गनायझेशन – ईपीएफओ) मध्ये नोंदणी करणाऱ्या पात्र युवकांना या योजनेचा थेट लाभ मिळेल. ठराविक कालावधीपर्यंत नोकरी टिकवून ठेवल्यास प्रथमच नोकरी करणाऱ्या तरुणांना दोन हप्त्यांत थेट १५,००० रुपये इतकी प्रोत्साहन रक्कम दिली जाईल.

नवीन कर्मचारी भरती करून रोजगारनिर्मिती करणाऱ्या उद्योगांना वेतन-संलग्न प्रोत्साहन देण्यात येईल. पात्र नियोक्त्यांना प्रति कर्मचारी दरमहा कमाल ३,००० रुपयांपर्यंत सहाय्य किमान दोन वर्षांसाठी दिलं जाईल. विशेषतः उत्पादन क्षेत्रातील उद्योगांनी रोजगार टिकवून ठेवल्यास आणि निर्धारित नियमांचं पालन केल्यास काही प्रकरणांत हे सहाय्य तिसऱ्या व चौथ्या वर्षातही मर्यादित स्वरूपात दिलं जाईल. ही योजना राष्ट्रीय उत्पादन मिशन (नॅशनल मॅन्युफॅक्चुरिंग मिशन) ला पूरक आहे. श्रमप्रधान उद्योगांना चालना देत नवीन उद्योगांसोबतच सध्या कार्यरत उद्योगांना विस्तारासाठी मदत केली जाईल.

अर्ज प्रक्रिया

या योजनेसाठी स्वतंत्र पीएमव्हीबीआरवाय ऑनलाइन पोर्टल सुरू करण्यात आले आहे. अर्ज करण्यासाठी मोबाईल क्रमांक किंवा ई-मेलद्वारे खाते तयार करून ओटीपीद्वारे पडताळणी करावी लागते. आधार कार्ड, बँक खाते तपशील, नियुक्ती पत्र तसेच नियोक्त्याची कंपनी नोंदणी व ईपीएफओ कोड, ही कागदपत्रे आवश्यक आहेत.

प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेमुळे तरुणांसाठी रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील. त्याचबरोबर उद्योगांसाठी विकासाचा नवा मार्ग खुला होणार आहे. रोजगार, कौशल्य विकास आणि सामाजिक सुरक्षा या तिन्ही घटकांना एकत्र आणून देशाच्या आर्थिक प्रगतीला गती देण्याचा संकल्प या योजनेतून व्यक्त करण्यात आला आहे.

संपर्क:-pmvbry.epfindia.gov.in, pmvbry.labour.gov.in

करिअर समुपदेशक

थोडक्यात

फोंड्यात १८ ऑक्टोबर रोजी मॅरेथॉन स्पर्धा

गोवन वार्ता ■ फोंडा : गोव्यात फिटनेस, निरोगी जीवनशैली आणि आरोग्याबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी 'फि फिटनेस कॉन्शियस गोवा' या संस्थेच्या वतीने १८ ऑक्टोबर रोजी ७ किलोमीटर लांबीच्या मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.



फोंड्यातील फर्मागुडी येथील फर्मागुडी रेसिडेन्सी येथे ही स्पर्धा पार पडणार आहे. ही स्पर्धा १८ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजता सुरू होईल. फर्मागुडी येथील फर्मागुडी रेसिडेन्सी हे या स्पर्धेचे ठिकाण आहे. ही स्पर्धा विविध वयोगटातील नागरिकांसाठी खुली असून, यामध्ये १२ ते २९ वर्षे, ३० ते ४४ वर्षे, ४५ ते ५९ वर्षे, ६० वर्षे आणि त्यावरील वयोगट यांचा समावेश आहे. सर्व नोंदणीकृत स्पर्धकांना आयोजकांकडून टी-शर्ट, फिनिशर मेडल, सहभागाचे प्रमाणपत्र आणि नाश्ता दिला जाणार आहे. इच्छुक स्पर्धक https://fitnessconsciousgoa.in या अधिकृत वेबसाइटवर जाऊन आपली नोंदणी करू शकतात. या स्पर्धेविषयी अधिक माहिती किंवा नोंदणीसाठी संपर्क साधण्यासाठी कुणाल नाईक (७५०७०१४८३८) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. आरोग्याची आवड असणाऱ्या नागरिकांनी या उत्स्फूर्त उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

गोवा विद्यापीठ महिला क्रिकेट संघाची निवड चाचणी

गोवन वार्ता ■ पणजी : पश्चिम विभाग आंतरविद्यापीठ महिला क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धा २०२६-२७ मध्ये गोवा विद्यापीठाचा महिला संघ सहभागी होणार आहे. ही स्पर्धा गुजरातच्या सुरत येथील पी. पी. सवाणी विद्यापीठात २३ ते २९ नोव्हेंबर या कालावधीत पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर, गोवा विद्यापीठ महिला क्रिकेट संघाची निवड करण्यासाठी विशेष निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. ७ ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजता ही निवड चाचणी सुरू होईल. इच्छूक विद्यार्थिनींनी दुपारी १.३० वाजता पूर्ण क्रिकेट गणवेशात गोवा विद्यापीठ मैदान, ताळगाव येथे उपस्थित राहणे अनिवार्य आहे. संबंधित महाविद्यालयांनी जर त्यांची कोणतीही महिला क्रिकेट खेळाडू या निर्धारित दिवशी अनुपस्थित राहणार असेल, तर त्याचे कारण देऊन sports@unigoa.ac.in या ईमेल आयडीवर क्रीडा विभागाला पूर्वकल्पना द्यावी, जेणेकरून त्या खेळाडूचाही निवडीसाठी विचार करता येईल. यासंदर्भात कोणतीही शंका किंवा अडचण असल्यास महाविद्यालयीन विद्यार्थी गोवा विद्यापीठाच्या क्रीडा विभागाशी संपर्क साधू शकतात.



आशियाई क्रीडा स्पर्धेचा अंतिम सामना : भारतीय महिला पदक कायम राखण्यासाठी सज्ज


सुवर्णपदकासाठी भारत-श्रीलंका आमनेसामने

गोवन वार्ता ■ न्यूज डेस्क
नवी दिल्ली

आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मधील महिला क्रिकेटचा अंतिम सामना मंगळवारी भारत आणि श्रीलंका यांच्यात खेळवला जाणार आहे. जपानमधील कोरोगी स्पोर्ट्स पार्क, निशिन येथे हा सामना होणार असून, हाँगझोऊ २०२३ च्या सुवर्ण-पदक सामन्याची पुनरावृत्ती या निमित्ताने पाहायला मिळणार आहे. गतविजेता भारतीय संघ टी-२० मधील सलग आठव्या विजयासाठी आणि सुवर्णपदक कायम राखण्यासाठी मैदानात उतरणार आहे.

गतविजेत्या भारतीय महिला संघाने या स्पर्धेत आपल्या खेळाची जबरदस्त छाप सोडली आहे. उपांत्यपूर्व फेरीत भारताने यजमान जपानचा ८ गडी राखून पराभव केला, तर उपांत्य फेरीत बांगलादेशविरुद्ध तब्बल ११४ धावांच्या मोठ्या फरकाने दणदणीत विजय मिळवून अंतिम फेरीत धडक मारली.

दुसरीकडे, श्रीलंका संघानेही अत्यंत प्रभावी कामगिरी केली आहे. उपांत्यपूर्व फेरीत मलेशियन संघाचा ८६ धावांनी पराभव केल्यानंतर, उपांत्य फेरीत त्यांनी पाकिस्तानचा ८ गडी राखून सहज पराभव केला. या निकालांमुळे आयची-नागोया २०२६ मधील महिला क्रिकेटचे अंतिम चित्र अगदी हांगझोउ स्पर्धेसारखेच पाहायला मिळत आहे. यापूर्वी, याच महिन्याच्या सुरुवातीला दुबईत झालेल्या आशिया कपच्या अंतिम फेरीतही भारत आणि श्रीलंका संघ आमनेसामने आले होते. त्या सामन्यात भारताने ७२ धावांनी दणदणीत विजय मिळवत आशिया कप उंचावला होता.



भारतीय संघाची सलामीवीर शेफाली वर्मा सध्या भरात असून ती अत्यंत घातक फॉर्ममध्ये आहे. आशिया कपच्या उपांत्य आणि अंतिम फेरीत सलग अर्धशतके झळकावणाऱ्या २२ वर्षीय शफालीने आशियाई क्रीडा स्पर्धेतही जपानविरुद्ध नाबाद ४० आणि बांगलादेशविरुद्ध स्फोटक शतक ठोकत आपली क्षमता सिद्ध केली आहे. याशिवाय, स्मृती मानधाना हिनेही वेळोवेळी संघासाठी मोलाचे योगदान दिले आहे.

गोलंदाजीत भारताची मदार अनुभवी फिरकीपटू दीप्ती शर्मा आणि युवा गोलंदाज श्री चरणी यांच्यावर असेल. या दोन्ही गोलंदाजांनी संपूर्ण स्पर्धेत सातत्यपूर्ण कामगिरी करत महत्त्वाच्या वेळी विकेट्स मिळवून दिल्या आहेत. कर्णधार हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ सुवर्णपदक कायम ठेवण्यासाठी पूर्णपणे सज्ज झाला आहे.

श्रीलंका संघाची मदार प्रामुख्याने त्यांची कर्णधार आणि दिग्गज अष्टपैलू खेळाडू चामरी अटापट्टू हिच्यावर असेल. चामरी ही सध्या या स्पर्धेत सर्वाधिक धावा करणारी फलंदाज असून तिने २ सामन्यांत १४६ धावा केल्या आहेत. तसेच, गोलंदाजीतही तिने ३ बळी टिपले आहेत. भारतीय संघाला पराभूत करायचे असेल, तर चामरी अटापट्टूला लवकर बाद करणे श्रीलंकेसाठी अत्यंत गरजेचे ठरणार आहे.

भारत आणि श्रीलंका यांच्यातील हा अटीतटीचा सुवर्णपदकाचा सामना भारतीय वेळेनुसार सकाळी १०.३० वाजता सुरू होईल. क्रिकेटप्रेमींसाठी या सामन्याचे थेट प्रसारण खालील-प्रमाणे उपलब्ध असणार आहे. सोनी लिव्ह या ॲप आणि वेबसाइटवर सामन्याचे थेट प्रक्षेपण पाहता येईल. भारतात सोनी स्पोर्ट्स १ या टीव्ही चॅनेलवर हा सामना थेट पाहता येईल. हिंदी भाषेतून पाहण्यासाठी सोनी स्पोर्ट्स ३ आणि सोनी स्पोर्ट्स ३ एचडी, तर तमिळ, तेलगू आणि कन्नड भाषांसाठी सोनी स्पोर्ट्स ४ वर सामन्याचा आनंद घेता येईल. या महामुकाबल्यात दोन्ही संघांच्या दोन सर्वात स्फोटक आणि आक्रमक फलंदाजांवर सर्वांच्या नजरा टिकून असणार आहेत. श्रीलंकेची कर्णधार चामरी अटापट्टू आणि भारताची युवा सलामीवीर शेफाली वर्मा या दोघीही सध्या जबरदस्त लयमध्ये असून, त्या अंतिम सामन्याचा निकाल पालटण्याची क्षमता बाळगून आहेत. श्रीलंका संघाची कर्णधार चामरी अटापट्टूने स्पर्धेत आपल्या अष्टपैलू खेळाने जबरदस्त प्रभाव पाडला आहे.

हेड-टू-हेड आकडेवारी

महिला टी-२० क्रिकेटच्या इतिहासात भारत आणि श्रीलंका यांच्यातील सामने नेहमीच रंगतदार झाले आहेत. मात्र, या आकडेवारीवर नजर टाकल्यास भारतीय संघाचे पारडे खूप जड असल्याचे दिसून येते. दोन्ही संघांमध्ये आतापर्यंत ३१ टी-२० सामने खेळले गेले आहेत. यातील तब्बल २५ सामन्यांत भारतीय संघाने विजय मिळवला आहे. श्रीलंका संघाला ५ सामन्यांत विजय मिळवता आला आहे, तर १ सामना अनिर्णित राहिला. भारताने श्रीलंकेविरुद्ध सलग शेवटचे ७ सामने जिंकले असून, २०२४ नंतर श्रीलंका संघ भारताला एकदाही पराभूत करू शकलेला नाही.

भारतीय महिला संघ :
हरमनप्रीत कौर (कर्णधार), ऋचा घोष (यष्टिरक्षक), गुनालन कमलिनी (यष्टिरक्षक), स्मृती मानधाना, शेफाली वर्मा, भारती फुलमाळी, दिप्ती शर्मा, अरुंधती रेड्डी, श्रेयंका पाटील, श्री चरणी, नंदानी शर्मा, क्रांती गौड, रेणुका सिंह ठाकूर, राधा यादव

श्रीलंका महिला संघ
चामरी अटापट्टू (कर्णधार), कौशानी नुथ्यांगना (यष्टिरक्षक), अनुष्का संजीवनी (यष्टिरक्षक), इमेषा दलानी, हसिनी परेरा, हर्षिता समरविक्रमा, हांसिमा करुणाकरत्ने, संजना कवींदी, काविशा दिलहारी, रश्मिका सेववंदी, मिथाली अयोध्या, काव्या कवींदी, चामुडी प्रबोधा, सुगंधिका कुमारी, निमाशा मीपागे

झहीर खान बनला चेन्नई सुपर किंग्सचा नवा मुख्य प्रशिक्षक

१७ वर्षे संघाची धुरा सांभाळणाऱ्या स्टीफन फ्लेमिंग यांची घेणार जागा

गोवन वार्ता ■ न्यूज डेस्क
चेन्नई

आयपीएलमधील सर्वात यशस्वी संघ मानल्या जाणाऱ्या चेन्नई सुपर किंग्स'च्या (सीएसके) मुख्य प्रशिक्षकपदी भारताचे माजी वेगवान गोलंदाज झहीर खान यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आयपीएल २०२६ च्या हंगामापूर्वी फ्रँचायझीने लांब काळापासून प्रशिक्षक असलेले स्टीफन फ्लेमिंग यांच्याशी फारकत घेतल्यावर, आता झहीर खान यांच्याकडे संघाची धुरा सोपवण्यात आली आहे. फ्लेमिंग यांनी २००९ ते २०२६ या काळात तब्बल १७ वर्षे सीएसकेचे मुख्य प्रशिक्षक म्हणून काम पाहिले आणि त्यांच्या मार्गदर्शना-खाली संघाने पाच वेळा आयपीएलचे विजेतेपद पटकावले.

आयपीएल २०२६ च्या हंगामात चेन्नई सुपर किंग्सची कामगिरी अतिशय निराशाजनक झाली होती. १४ सामन्यांत केवळ ६ विजयांसह संघ गुणतक्त्यात आठव्या स्थानी राहिला होता. सीएसकेने २०२३ मध्ये आपले पाचवे आणि शेवटचे जेतेपद जिंकले होते, त्यानंतर सलग तीन वर्षे संघाला प्लेऑफमध्ये धडक मारता आलेली नाही. या खराब कामगिरीनंतर संघ व्यवस्थापनाने मोठा बदल करत फ्लेमिंग यांच्याशी संबंध संपवण्याचा निर्णय घेतला. निवडणूक प्रक्रियेदरम्यान माइक हसी आणि हेमंग बदानी यांच्या नावांचीही चर्चा होती. मात्र, फ्रँचायझीने अखेर झहीर खान यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. नवे प्रशिक्षक निवडण्यात संघाचा माजी कर्णधार एम. एस. धोनी याने महत्त्वाची भूमिका बजावल्याचे वृत्त आहे. धोनीच्याच नेतृत्वाखाली भारताने २०११ चा विश्वचषक जिंकला होता आणि त्या ऐतिहासिक विजयात झहीर खान हे भारताचे सर्वाधिक गडी बाद करणारे गोलंदाज होते.



झहीर खान यांची कारकीर्द

झहीर खान यांनी भारतासाठी ९२ कसोटी, २०० एकदिवसीय आणि १७ टी-२० सामन्यांमध्ये अनुक्रमे ३११, २८२ आणि १७ बळी टिपले आहेत. १४ वर्षांच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत त्यांनी सर्व फॉरमॅट मिळून एकूण ६१० बळी घेतले. याशिवाय, आयपीएलमध्ये त्यांनी मुंबई इंडियन्स, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि दिल्ली कॅपिटल्स या तीन संघांचे प्रतिनिधित्व करत १०० सामन्यांत १०२ बळी घेतले आहेत.

आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताची एकाच दिवसात ४ पदकांची कमाई

हॉकीत भारताचा इंडोनेशियाविरुद्ध १७-१ ने विजय

गोवन वार्ता ■ न्यूज डेस्क
दिल्ली

आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये सोमवारी भारतीय खेळाडूंनी धमाकेदार कामगिरी करत एकाच दिवसात तब्बल चार नवीन पदके आपल्या नावावर केली. या नेत्रदीपक कामगिरीमुळे स्पर्धेतील भारताचे एकूण पदकांचे संख्याबळ आता सहावर पोहोचले आहे. नेमबाजीत भारताच्या पदकांचा सपाटा सुरूच असून, त्यात मिक्स्ड मार्शल आर्ट्स-मध्ये भारताने ऐतिहासिक पदक जिंकत नवा इतिहास रचला आहे.

भारताच्या नेमबाजांनी सोमवारी पुन्हा एकदा देशाची मान उंचावली. पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल सांघिक प्रकारात रुद्रांश पाटील, हिमांशू धिल्लून आणि पार्थ माने या त्रिकुटाने १८९०.१ गुणांची कमाई करत देशाला रौप्य पदक मिळवून दिले. या प्रकारात चीनने सुवर्ण, तर दक्षिण कोरियाने कांस्य पदक पटकावले. याच प्रकारच्या वैयक्तिक अंतिम फेरीत हिमांशू धिल्लूनने शानदार कामगिरी करत रौप्य पदक, तर रुद्रांश पाटीलने कांस्य पदक पटकावून भारताच्या पदकांमध्ये भर घातली.



आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. महिलांच्या पारंपरिक ६० किलो वजनी गटातील मिक्स्ड मार्शल आर्ट्स प्रकारात भारताच्या सुचिका तरियाल हिने कांस्य पदक जिंकले आहे. उपांत्य फेरीत तिला सिंगापूरच्या तियो हुई हून हिच्याकडून २-० असा पराभव स्वीकारावा लागला असला, तरी तिने भारतासाठी या क्रीडा प्रकारातील पहिलेवहिले एमएमए पदक जिंकून इतिहास रचला आहे.

रविवारच्या दोन रौप्य पदकांसह आता भारताच्या खात्यात एकूण सहा पदके जमा झाली आहेत.

गिफू प्रिफेक्चरल ग्रीन स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या हॉकी सामन्यात भारतीय महिला संघाने इंडोनेशियाचा १७-१ असा दारूण पराभव केला. मध्यांतरापर्यंत भारताने ९-० अशी भक्कम आघाडी घेतली होती. दीपिका, सुनेलिटा टोप्पो, लालरेम्सियामी, ऋतुजा पिसाळ, साक्षी राणा, सलमा टेटे, नवनीत कौर आणि इशानिका चौधरी यांनी गोल नोंदवले.

आशियाई क्रीडा स्पर्धा २०२२६ पदक तालिका

क्रम	देश	सुवर्ण	रौप्य	कांस्य	एकूण
१	चीन	२३	१०	५	३८
२	जपान	८	१२	१२	३२
३	दक्षिण कोरिया	५	३	१५	२३
४	कझाकस्तान	४	१	३	८
५	थायलंड	३	१	०	४
६	हाँगकाँग, चीन	२	३	३	८
७	चिनी ताइपेय	१	३	२	६
८	मकाऊ, चीन	१	३	०	४
९	म्यानमार	१	१	१	३
१०	उझबेकिस्तान	१	१	१	३
११	कुवेत	१	०	२	३
१२	**भारत**	**०**	**४**	**२**	**६**

टेबल टेनिसमध्ये पाकिस्तानचा पराभव

महिलांच्या टेबल टेनिसच्या 'ग्रुप एफ' सामन्यात भारताने पाकिस्तानचा ३-० असा दणदणीत पराभव केला. सुतीर्था मुखर्जी आणि सिंद्रेला दास यांनी सुरुवातीलाच भारताला २-० अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर श्रीजा अकुला हिने फातिमा खानचा ११-४, ११-४, ११-५ असा सहज पराभव करत सामना भारताच्या झोक्यात टाकला आणि संघाने उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

देश-परदेश वार्ता

बेकायदेशीर अटकेबाबत कडक निर्देश; पुन्हा अटकेसाठी दंडाधिकाऱ्यांची मंजुरी बंधनकारक

सर्वोच्च न्यायालय : कारणे न दिल्यास कारवाई 'बेकायदेशीर'

गोवन वार्ता ■ न्यूज डेस्क
नवी दिल्ली

एखाद्या व्यक्तीला अटक करताना अटकेची कारणे लेखी स्वरूपात आणि समजेल अशा भाषेत देणे अनिवार्य असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. जर कारणे न दिल्यामुळे एखादी अटक बेकायदेशीर ठरवली गेली, तर पोलिसांना त्या व्यक्तीला पुन्हा अटक करण्यापूर्वी सक्षम दंडाधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील, असा अत्यंत महत्त्वाचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान आणि न्यायमूर्ती अतुल एस. चंदुरकर यांच्या खंडपीठाने हे निर्देश दिले असून, या निकालाची प्रत देशातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या पोलीस महासंचालकांना पाठवण्याचे आदेश दिले आहेत.

अटक करताना अटकेची कारणे लेखी स्वरूपात आणि आरोपीला समजेल अशा भाषेत दिलीच पाहिजेत. त्याची एक प्रत अटक केलेल्या व्यक्तीला देणे बंधनकारक आहे.



नियमांचे उल्लंघन करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई केली जावी, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

राज्यघटनेच्या अनुच्छेद २२(१) नुसार मिळालेला मूलभूत हक्क अतिशय पवित्र असून, कोणत्याही परिस्थितीत त्याचे उल्लंघन केले जाऊ शकत नाही. या नियमाचे पालन न झाल्यास अटक बेकायदेशीर ठरवून आरोपीची तात्काळ सुटका केली जाईल. तसेच, केवळ आरोपपत्र दाखल केल्याने बेकायदेशीर अटकेला वैधता प्राप्त होत नाही.

तांत्रिक त्रुटी किंवा प्रक्रियात्मक चुकीमुळे एखादी अटक रद्द झाली आणि आरोपी तुरुंगातून बाहेर आला, तर पोलीस त्याला परस्पर पुन्हा अटक करू शकत नाहीत. पुन्हा अटक करण्यासाठी पोलिसांना दंडाधिकाऱ्यांकडे अर्ज करून लेखी परवानगी घ्यावी लागेल.

ऐतिहासिक खटल्याचा संदर्भ

सुनावणीच्या शेवटी न्यायालयाने ऐतिहासिक 'खत्री खटला'चा उल्लेख करत, अटक केलेल्या व्यक्तीला २४ तासांच्या आत न्यायालयात हजर करणे हा कधीही न बदलणारा आणि अत्यंत कडक नियम असल्याचे अधोरेखित केले. या निकालान्वये न्यायालयाने पोलिसांच्या मनमानी आणि सदोष अटकेच्या प्रक्रियेवर मोठा कायदेशीर अंकुश ठेवला असून, नागरिकांच्या मूलभूत स्वातंत्र्याची हमी अधिक बळकट केली आहे.

ममता बॅनर्जींच्या गटाकडून नवीन पक्षीय लोगोचे अनावरण

६ ऑक्टोबरच्या पोटनिवडणुकीसाठी रणधुमाळी

गोवन वार्ता ■ न्यूज डेस्क
कोलकाता

निवडणूक आयोगाने 'ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस' (टीएमसी) पक्षाचे नाव आणि त्यांचे पारंपारिक 'फुले आणि गवत' (जोडा घासफूल) हे चिन्ह तात्पुरत्या स्वरूपात गोठवल्यानंतर, ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील टीएमसी गटाने सोमवारी आपला नवीन अधिकृत लोगो जाहीर केला. या नवीन लोगोमध्ये 'फुटबॉल खेळाडू' या तात्पुरत्या निवडणूक चिन्हाचा समावेश करण्यात आला आहे.

६ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या पोटनिवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या या नवीन ओळखीचा प्रचार करण्याचे निर्देश सर्व पदाधिकारी आणि नेत्यांना देण्यात आले आहेत. अंतर्गत राजकीय विवाद आणि पक्षीय नियंत्रणाच्या लढाईनंतर निवडणूक आयोगाने दोन्ही गटांना स्वतंत्र नावे आणि चिन्हे वाटप केली आहेत. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ममता यांच्या गटाला 'ममता ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस' हे नाव देण्यात आले आहे. या नवीन लोगोच्या केंद्रस्थानी फुटबॉल खेळणाऱ्या खेळाडूचे चित्र आहे. निळ्या पार्श्वभूमीवर पांढऱ्या अक्षरामध्ये 'ममता ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस' असे लिहिण्यात आले असून डिझाइनमध्ये केशरी, पांढरा आणि हिरवा या रंगांचाही समावेश केला गेला आहे. ६ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या रेजिनगर आणि नंदीग्राम विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत नवीन राजकीय ओळख प्रस्थापित करण्यासाठी ममता गटाकडून हा प्रयत्न केला जात आहे. रेजिनगर मतदारसंघात तृणमूलचे दोन्ही गट आमनेसामने उभे ठाकले आहेत. तर नंदीग्राम मतदारसंघात ममता यांच्या गटाने काँग्रेस उमेदवाराला पाठिंबा देत आपली निवडणूक माघार घेतली आहे. पक्षाचे कार्यकर्ते, नेते आणि लोकप्रतिनिधींना हा नवीन लोगो आपापल्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर आणि इतर माध्यमांवर प्रसारित करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



आयआयटी बॉम्बेमधील विद्यार्थी आत्महत्या प्रकरणी प्राध्यापक निलंबित

संस्थेची जाहीर माफी : गेल्या २० वर्षांत १६० विद्यार्थ्यांच्या आत्महत्या

गोवन वार्ता ■ न्यूज डेस्क
मुंबई

आयआयटी बॉम्बेचा बीटेकचा विद्यार्थी साहिल वाकोडे याच्या दुर्दैवी मृत्यूनंतर कॅम्पसमध्ये संतापाची लाट उसळली आहे. याप्रकरणी प्रशासनाने कारवाई करत प्रा. सूर्यनारायण डुला यांना डीन पदावरून निलंबित केले आहे. तसेच साहिलच्या मृत्यूपूर्वीच्या घडामोडींवर यापूर्वी दिलेल्या विधानांबद्दल संस्थेने जाहीर माफी मागितली आहे. तपास पूर्ण होण्यापूर्वी असे दावे करणे योग्य नव्हते, असे आयआयटी प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

२२ वर्षीय साहिल वाकोडे हा आयआयटी बॉम्बेच्या एनर्जी सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागाचा द्वितीय वर्षाचा विद्यार्थी होता. १८ सप्टेंबरच्या रात्री त्याचा मृतदेह हॉटेलातील खोलीत आढळला होता. १९ सप्टेंबर रोजी जारी केलेल्या अधिकृत निवेदनात, साहिलला परीक्षेदरम्यान मोबाईल वापरताना पकडल्याचा दावा संस्थेने केला होता. तसेच त्याने प्रश्नपत्रिका चॅटजीपीटीवर अपलोड करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करत त्याने नैराश्येतून टोकाचे पाऊल उचलल्याचे म्हटले होते. या विधानामुळे विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला होता.

साहिलच्या पालकांनी १९ सप्टेंबर रोजी प्रा. डुला आणि इतरांविरोधात एफआयआर दाखल केला आहे.



आयआयटी संस्थांमधील वाढती नैराश्याची समस्या

आयआयटी बॉम्बेमधील ही तिसरी, तर देशातील या वर्षातील नववी घटना आहे. ग्लोबल आयआयटी अल्युमिनी सपोर्ट ग्रुपनुसार, गेल्या २० वर्षांत तब्बल १६० आयआयटी विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. एका सर्वेक्षणानुसार, ६१ टक्के विद्यार्थ्यांनी शैक्षणिक ताणाला यामागील मुख्य कारण मानले आहे. विशेषतः परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांवर येणारा दबाव जीवघेणा ठरत असल्याचे दिसून आले आहे. २०२४ मध्ये शिक्षण मंत्रालयाने दर १ हजार विद्यार्थ्यांमागे १ समुपदेशक नेमण्याचे लक्ष्य दिले होते. मात्र, प्रत्यक्षात आयआयटी खडकपूरमध्ये १५००, दिल्लीत १२१४ आणि कानपूरमध्ये १०५८ विद्यार्थ्यांमागे १ समुपदेशक अशी स्थिती आहे. गेल्या ५ वर्षांत आयआयटी खडकपूरमध्ये सर्वाधिक आत्महत्यांची नोंद झाली आहे.

आपले राज्य, आपले दैनिक

गोवन वार्ता

WE ARE PROUD TO BE GOA'S

FASTEST GROWING MARATHI DAILY

DIGITAL NEWSPAPER



Click here to join our official

WHATSAPP GROUP

and receive your free PDF copy today

Follow us

facebook.com/goanvarta

goanvarta.net

https://tinyurl.com/govanvarta

@goanvarta